मिळून सारजणी

पुणे । वर्ष चोविसावे । अंक बारावा । जुलै २०२५ । पृष्ठसंख्या ६० । किंमत ₹ ५०/-
Miloon Saryajani | Pune | Vol. 24 | Issue 12th | July 2025 | Pages 60 | Price Rs. 50

हम भारत की नारी हैं, फुल नहीं चिंगारी हैं।

'ती', 'ते' आणि 'तो' यांचा स्वतःशी आणि परस्परांशी
नव्यानं संवाद होण्यासाठी... मासिक नव्हे चळवळ!

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी
भारतीय शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे जनक

डॉ. शरदचंद्र कुलकर्णींच्या क्रमान्वित अध्ययनाने सुरु झालेल्या अनेक प्रयोगांचे फलित म्हणजे आजची "शैक्षणिक तंत्रविज्ञान" ही अतिशय उपयुक्त अशी ज्ञानशाखा. या विषयासंबंधी मला भावलेले डॉ. कुलकर्णी यांचे तीन महत्वाचे विचार येथे मांडते.

विद्यार्थ्याला केंद्रीभूत मानणारी शिक्षण प्रणाली हे डॉ. कुलकर्णींचे ध्येय होते. पण विद्यार्थ्याला सतत काही ना काही मदत करीत राहून त्याला आपल्यावर शेवटपर्यंत अवलंबून ठेवण्याऐवजी अध्ययन कौशल्ये शिकवावीत म्हणजे नवीन विषयही त्यांना स्वतःच शिकता येईल आणि आयुष्यभरासाठी ते उपयोगी पडेल. ते म्हणत, टेकडी चढतांना विद्यार्थ्यांबरोबर शेवटपर्यंत जाण्यात काहीच अर्थ नाही. याची दोन कारणे: एक, अशाने ते विद्यार्थी स्वतः टेकडी आत्मविश्वासपूर्वक शेवटपर्यंत चढू शकणार नाहीत, आणि दुसरे, शिक्षकाच्या उणीवा (कमतरता) विद्यार्थ्यांच्या पुढे जाण्यात अडचण ठरू शकतात.

डॉ. कुलकर्णींना शिक्षकाची कुंभाराशी केलेली तुलना अजिबात मान्य नव्हती. ते म्हणत, विद्यार्थी हा मातीचा गोळा नाही आणि शिक्षक म्हणजे या मातीच्या गोळ्याला आकार देणारा कुंभार नाही. प्रत्येक रोपाप्रमाणेच प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतःची आवड, पात्रता असते. शिक्षक म्हणजे माळी आहे आणि माळी ज्याप्रमाणे प्रत्येक रोपाकडे काळजीपूर्वक लक्ष देतो, प्रत्येक रोपाला किती सूर्यप्रकाश हवा, किती पाणी, किती खत हवं ते पाहतो, आणि त्यांच्या गरजेप्रमाणे प्रत्येकाला त्या त्या गोष्टी पुरवितो तसेच शिक्षकाने देखील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गरजा समजावून घेऊन त्याला स्वतःचा नैसर्गिरीत्या पूर्ण विकास करून घेण्यासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे.

त्यांनी मांडलेला आणखी एक महत्वाचा विचार म्हणजे **डेटा (data) ते शहाणपण (Wisdom) प्रतिमान.**

विद्यार्थ्यांना आधी Data चे रूपांतर Information मध्ये करण्यास शिकवावे. पण यापेक्षाही महत्वाचे कौशल्य आहे ते माहितीपासून ज्ञान निर्मिती करण्याचे. माहिती मिळविणे, त्याचे ज्ञानात रूपांतर करणे, तसेच ज्ञानाबद्दलचे विश्वसनीय स्रोत शोधण्याच्या क्षमता विकसित करणे ही खूप महत्वाची उद्दिष्टे आहेत. केवळ खूप माहिती मेंदूत साठवून ठेवणे अनुत्पादक ठरते. त्यांच्या मते "**शहाणपण**" हे शिक्षणाचे सर्वोच्च उद्दिष्ट असले पाहिजे. फारसे ज्ञान नसलेली पण **शहाणपण** असलेली व्यक्ती एकवेळ समाजाचा फारसा विकास कदाचित करू शकणार नाही, पण **शहाणपण** नसलेले ज्ञान मात्र समाजाला हानीकारक ठरू शकते याबद्दल त्यांना खात्रीच होती.

प्रा. डॉ. जयश्री शिंदे
अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (अति. भार)
प्राध्यापक, शैक्षणिक तंत्रविज्ञान विभाग, श्रीम. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

MKCL
www.mkcl.org
MS-CIT
अंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण संगणक कोर्स
mscit.mkcl.org
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
iLike
ilike.mkcl.org

संस्थापक-संपादक
स्मृतिशेष विद्या बाळ

संपादक : गीताली वि. मं.

संपादन साहाय्य : पूनम बा. मं.

व्यवस्थापकीय सल्लागार :
स्मिता हेमलता

कार्यालयीन साहाय्य :
पूर्वा भिंगे, उषा चव्हाण

मुखपृष्ठ छायाचित्रं
मकामच्या साऱ्याजणी

मुखपृष्ठ मांडणी :
राजू देशपांडे

अंक जुळणी-अंक मांडणी :
सारद मजकूर, पुणे

आतील सुलेखन व चित्रं :
गिरीश सहस्त्रबुद्धे,
कमलाकर पाटील आणि
इंटरनेटवरून साभार

मुद्रितशोधन : हृषीकेश पाळंदे आणि
साऱ्याजणी

सल्लागार : दीपा देशमुख,
जमीर कांबळे

कार्यालयीन पत्ता :
फ्लॅट नं. १०१, पहिला मजला,
नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी,
प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४,
एरंडवणा, पुणे ४११००४

कार्यालयीन संपर्क :
८००७८१४००५

वर्गणीसाठी संपर्क:
saryajani@gmail.com

साहित्य पाठवण्यासाठी :
milunsaryajani@gmail.com
(कृपया, या नव्या
बदलाची नोंद घ्याल.)

कार्यालयीन वेळ :
सोम. ते शुक्र. दुपारी १२ ते ५

वार्षिक वर्गणी :
व्यक्तीसाठी ५०० रु.
संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. २५ वर)

मिळून साऱ्याजणी
www.miloonsaryajani.in | आरंभ-ऑगस्ट १९८९

४ **शांतिसंवाद** \ गीताली

६ **यशोधरा : मैत्र जीवाचे!** \ नीला भागवत

१० **दुसरं महिला किसान संमेलन : एका दशकाच्या वाटचालीचा दस्तऐवज आणि नव्या शक्यता** \ गार्गी मांगुळकर, श्रुती वाघमोडे, निऋती चव्हाण

१७ **माध्यमांतर... \ गट्टी शब्दांची**
फुले माळणे \ डॉ. नीलिमा गुंडी

२० **कथा** \ असूया \ अंजली बुटले

२२ **एकेक दीप विझू विझू...\माध्यमांतर...**
प्रोफेसर जयंत नारळीकर (१९३८-२०१५)
वरुण सहानी, अनुवाद : शर्मिष्ठा खेर

२४ नारळीकर सर व त्यांच्या कुटुंबियांचे आयुकामुळे आलेले अनुभव
कल्याणी गाडगीळ – अभ्यंकर

२६ आठवणीतले डॉ. जयंत नारळीकर
साधना दधिच, अनुवाद : सरिता आवाड

२९ चांदणे तुझ्या स्मरणाचे...
डॉ. सुनीला गोंधळेकर

३० स्मरण पुष्प - माधव वझेसर \
गजानन परांजपे

३१ **कविता** \ सत्य प्रयागबाई कुटे, रमजान मुल्ला, विलास गावडे

३४ **नोटबुक** \ मी नाकारलेलं 'स्थळ!'
अपर्णा महाजन

३७ **काफिला...** \ सुभाष
रोहिणी भट-साहनी

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २

१४ **इराणी स्त्री – भाग १**
सुलभा पाटील

१८ **द कोड ब्रेकर्स : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्त्री संशोधक** \ तज्ज्ञ प्रणालींचा उदय आणि त्या घडवणाऱ्या महिला (१९८५-१९९५) (भाग २) \
चिन्मय गवाणकर

३२ **# हॅशटॅग लैंगिकता** \ बाईपणाचा अवघड प्रवास \ सारिका उबाळे

४० **देशोदेशीचे स्त्री रंग** \ नसलेल्या (नासलेल्या) नात्यांचे असलेले आभास
प्रतिमा अग्निहोत्री

४२ **माध्यमांतर... / भीमा तुझ्या मताचे...!**
बसपचा 'क्राऊड पूलर':
राहुल अनविकर \ केशव वाघमारे

४६ **शब्द शब्द वेचू या** \
'रिंगण' रुंदावणाऱ्या प्रत्येकीची कविता
डॉ. सुजाता शेणई

४८ **विरासत - पुष्प सहा**
चहाचा इतिहास आणि विरासत
सुगंधा जोहर

५६ **संवाद - स्पंदनं... चलो मुंबई...**
महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद
अमोल केरकर

५८ **प्रतिनिधी यादी**

निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : गीताली वि. मं.**

'MiloonSaryajani' Monthly is owned by Niramaya Public Charitable Trust, Printed and Published by Geetali V. M., Printed at Unique Offset, 1523, Sadashiv Peth, Anandshilp, Pune 411030 and Published at Flat No.101, 1st floor, Nachiket CHS, Prabhat Road, Lane No.4, Erandawana, Pune 411004. **Editor - Geetali V. M.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

शांतिसंवाद

प्रिय वाचक,

सबरंगी जयभीम !

एक जुलै कृषीदिनाच्या सर्व अन्नदात्या शेतकरी मायबापांना आणि त्यांच्या श्रमावर जीव तगवणाऱ्या आपणा सर्वांना अनंत शुभेच्छा!!

हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त एक जुलैला कृषी दिन १९८९मध्ये मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला. बारा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिलेले वसंतराव नाईक हरितक्रांती, पंचायत राज, तसेच श्वेत क्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात. शेतकऱ्यांशी आणि शेतीशी नाळ जुळलेले ते महाराष्ट्राचे पहिले शेतकरी मुख्यमंत्री होते. शेतकऱ्यांचा जाणता राजा, हरित योद्धा आणि शाश्वत विकासाची एक लोकाभिमुख विचारधारा असणारा हा मुख्यमंत्री सिंहासनावर देहाने जरी असलो तरी माझे चित्त मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर असते, हा वसंत विचार मांडणारे होते. त्यामुळे शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व शेतकऱ्यांना आत्मबळ देण्यासाठी जाहीर झालेला कृषी दिन थेट शेतकऱ्यांच्या बांधावर साजरा करण्याची संकल्पना एकनाथराव पवार यांनी रुजवली. अजूनही कृषी दिन अशा पद्धतीनं साजरा होतो का? की कृषीदिन आता कृषीदीन झाला आहे?

कृषी प्रधान असलेल्या आपल्या देशात गेल्या काही वर्षात आणि विशेषतः जागतिकीकरणानंतर शेती विषयक धोरणांमुळे शेती आणि गरीब व मध्यम शेतकऱ्यांची हालत अतिशय हलाखीची झाली आहे. शेतकरी आत्महत्या कमी व्हायचं नावच घेत नाहीत. याचा आपण गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

१२ मे १८७५ रोजी पुणे जिल्ह्यातल्या सुपा या गावी बाजाराच्या दिवशी शेतकऱ्यांनी त्यांचं अपरिमित शोषण करणाऱ्या स्थानिक सावकार व व्यापाऱ्यांना मारहाण केली. त्याचं लोण पुढं सातारा, सोलापूर, नाशिक येथे पसरत गेलं. दख्खनची दंगल या नावानं इतिहासात प्रसिद्ध असलेल्या या लढ्यानंतर ब्रिटिशांनी सहकारी पतसंस्थेची कल्पना अमलात आणली. म्हणजे १५० वर्षांपूर्वी सहकाराची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली गेली. पुढे सहकार चळवळीनं जोर धरत महाराष्ट्राची प्रगती झाली. पण आज सहकार कल्पनेचं स्वाहाकारात रुपांतर कसं आणि का झालं? त्याला जबाबदार कोण? हे कळीचे प्रश्न आहेत. शेतीचे कॉर्पोरेटायझेशन, हमी भावाची हमी नाही, बियाण्याच्या खरेदीत होणारी फसवणूक, खत आणि कीटकनाशकांच्या आभाळाला भिडणाऱ्या किंमती या सुलतानी संकटाबरोबरच हवामान बदलाचं अस्मानी संकटही आहे. या सगळ्यामुळे ग्रासलेले शेतकरी अनेकदा आत्महत्या करून या संकटातून स्वतः ला मुक्त करतात. नंतर बायका मुलांची अवस्था आणखीनच हलाखीची होते. उद्या हाच शेतकरी समाजाविरुद्ध पेटून उठला तर? आत्महत्या करण्यापेक्षा समोरच्याला मारायला, त्याच्या जीवावर उठला तर काय होईल? दीडशे वर्षांपूर्वीचं वर्तुळ पूर्ण होईल का? असं होऊ नये असं वाटत असेल तर आत्ताच जागे व्हा. शेती आणि शेतकऱ्यांचा गांभीर्यानं विचार करा, त्यांचं शोषण करणारी धोरणं बदला, शेतकरी आंदोलनाला सकारात्मक प्रतिसाद द्या, अन्नदात्याच्या मागे ठामपणे उभे रहा. असं राजकारणी, समाजकारणी मंडळीना सांगण्याची वेळ आली आहे. यात आपणही आहोत हे विसरायला नको. अन्यथा...

शेतीत ७०% हून अधिक काम करणाऱ्या शेतकरी महिलांना तर शेतकरी मानलंही जात नाही. याविरुद्ध लढत महिला किसान मंचाची स्थापना दहा वर्षांपूर्वी झाली. ही ऐतिहासिक बदलाची सुरुवात मानायला हवी. आता शेतकरी महिला या फक्त शेती करणाऱ्या म्हणूनच नव्हे तर राज्यकर्त्या, प्रश्नांची मांडणी करणाऱ्या आणि चळवळी उभ्या करणाऱ्या महिला असणार आहेत. भारताच्या शेतीचं भविष्य इथून पुढे कोणत्याही बोर्डरुम मध्ये लिहिलं जाणार नाही तर ते शेतात आणि त्यांची लागवड करणाऱ्या महिलांकडून लिहिलं जाईल अशी ग्वाही दुसरं महिला किसान संमेलन देत होतं त्याविषयीची या अंकातली कव्हर स्टोरी जरूर वाचा.

भारतीय अर्थव्यवस्थेनं जपानच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकून जगात चौथ्या क्रमांकाचं स्थान पटकावलं, अशा बातम्या मध्ये झळकत होत्या. त्याचा उत्सव साजरा करण्यात आघाडीवर असणाऱ्या लोकांना 'अर्थ'सत्य काय आहे याचा विचारही करावा असं वाटत नाही ही देशाची शोकांतिका आहे. खरं तर आज जपानची लोकसंख्या १२.३ कोटी असून दरडोई उत्पन्न ३३ हजार ९०० अमेरिकी डॉलर आहे तर भारताची लोकसंख्या सुमारे १४६ कोटी असून दरडोई उत्पन्न फक्त २८८० डॉलर इतकं कमी आहे.

याचा अर्थ समजून घ्यायला हवा. २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या वर्ड इनइक्वलिटी रिपोर्ट नुसार भारतीय लोकसंख्येतील वरच्या एक टक्का लोकांच्या हातात देशाच्या एकूण संपत्तीतील चाळीस टक्के संपत्ती एकवटली आहे. तर तळाच्या पन्नास टक्के लोकांच्या हातात फक्त तीन टक्के संपत्ती आहे. याचा अर्थ देशाचे सत्तावन टक्के उत्पन्न फक्त दहा टक्के लोक कमावतात. याचं कारण जी क्षेत्रे देशाच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचं योगदान देत आहेत, उदाहरणार्थ माहिती तंत्रज्ञान, वित्त, ई-कॉमर्स, रियल इस्टेट मोठे उद्योग वगैरे ती रोजगार निर्मितीत मागे पडली आहेत. कामगार वर्गातील ५० टक्के लोक कृषी क्षेत्रात आहेत ज्याचा जीडीपीतील हिस्सा फक्त १७ ते १८ टक्के आहे. या भीषण विषमतेत जगात सुरू असलेल्या जकात युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता, त्याचा भारतीय निर्यातीवर व पर्यायानं उत्पादन क्षेत्राला बसणारा फटका, हवामान बदलाचे दुष्परिणाम, वाढलेली बेरोजगारी व मंदावलेली मागणी हे घटक लक्षात घेतले तर २५, २६ मध्ये भारतीय आर्थिक वाढीचा दर अनेकांच्या अपेक्षेपेक्षा कमीच असण्याची शक्यता आहे असं मत या क्षेत्रातील जाणकार सांगत आहेत. याचा विचार करून सत्याला सामोरं जाण्याचं शहाणपण समाज म्हणून आपण आता तरी शिकणार आहोत का नाही हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

३१ मेला अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी झाली. त्यांचा थक्क करून सोडणारा राजकीय आणि सामाजिक कार्याचा अलौकिक प्रवास याची सर्वत्र वाहवा होत आहे. सामान्य जनतेचे प्रश्न ऐकून त्यांची सोडवणूक करण्यासाठी नियमित जनता दरबार त्यांनी सुरू केला. शेतकरी आणि स्त्रियांच्या समस्या आणि प्रश्नांना विशेष प्राधान्य दिले. शेतकरी आणि गृहिणी जर सुखी राहिले तर समाज आनंदाने बहरून येईल हा लोकमानस अहिल्यादेवींच्या ठिकाणी होता. त्यामुळे या दोन घटकांनी सुधारण्यासाठी अहिल्याबाईंनी प्राधान्य दिलं. शेतकऱ्यांसाठी ठिकठिकाणी विहिरी आणि तलाव बांधून सिंचनाची व्यवस्था त्यांनी केली. शेतकऱ्यांना छोटे उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिलं. गावोगावी शेतकरी जागृतीसाठी मेळावे घेऊन लोकप्रबोधन केलं. विधवांना दत्तक पुत्र घेण्याचा अधिकार, वडिलोपार्जित किंवा पतीची शेती आणि संपत्ती त्या स्त्रियांच्या नावावर लावण्यासाठी आग्रही राहिल्या आणि तशी सरकार दरबारी नोंद घेण्यासाठी महसूल विभागात आदेश दिले. विशेष म्हणजे त्यांची राजधानी म्हणजे संगीत, कला, संस्कृतीचे आनंद भवन झाले. याशिवाय चोर दरोडेखोर भिल्ल आणि अन्य चोरी लूटमार करणाऱ्या लोकांचे मन आणि मत परिवर्तन करून त्यांना गाई, म्हशी, जमिनी देऊन शेती उद्योग करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे चोऱ्या दरोड्यांचं प्रमाण कमी झालं. सामान्य लोकांना तात्काळ न्याय मिळावा म्हणून जिल्हा न्यायालयं स्थापन करून न्यायासाठी राजदरबार २४ तास लोकांसाठी खुला ठेवला. सर्वांना मोफत शिक्षण, सरकारी तिजोरीतून सामान्य लोकांना आरोग्य सुविधा आणि बेरोजगार तरुणांना नोकरी देऊन सामाजिक स्थिती सुधारली. खरा धर्म केवळ पूजा अर्चा, अनुष्ठानात नसून माणूससेवा ही सर्वश्रेष्ठ पूजा आहे असे त्या म्हणत. समाज तेव्हाच सक्षम होऊ शकतो जेव्हा स्त्री पुरुषांना समान संधी असते. हे विचार व्यक्त करताना ते सर्वच विचार कृतीत आणण्याचा त्यांनी आजीवन प्रयत्न केला. राजमातेच्या जयंतीला एवढा मोठा जल्लोष होत असताना खरंच स्त्री सुरक्षित आहे का? शिक्षण महाग होत चाललं आहे, शेतमालाला भाव नाही, शेतकरी स्वहत्या वाढतच आहेत. गुन्हेगारीचं प्रमाण हाता बाहेर जात आहे. सर्व धर्मातील मूळ मानवतावादी तत्व बाजूला करून विषमतावादी कर्मकांडाचे स्तोम माजवले जात आहे. अशा वेळेला फक्त इतिहासातल्या अहिल्यादेवींची विभूती पूजा करत राहण्यापेक्षा त्यांचे आचार विचार प्रत्यक्षात आणायलाच हवेत, यासाठी काय करायचे याचा विचार कृतिशीलपणे अंमलात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात आली तरच ती त्यांच्या ओजस्वी कार्यकर्तृत्वाला खरी आदरांजली ठरेल हे लक्षात घेऊ या. इतिहासाच्या अशा घटनांकडे समतोल दृष्टीने बघायला हवं विजयासोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि पराभवातून मिळणारी शिकवण आत्मसात करायला हवी. इतिहासातून सत्यशोधन, मानवता, सहिष्णुता आणि विवेक या मूलभूत मूल्यांची रुजवण व्हायला हवी. त्यातूनच जिज्ञासू चिंतनशील, सजग नागरिक तयार होतील हे लक्षात ठेवूया.

देशाचं सशस्त्र दल केवळ लष्करी शक्तीसाठी नाही तर ते सन्मान, कर्तव्य आणि त्यागासाठी सुद्धा ओळखलं जातं. अशा या सशस्त्र दलात सामील होण्यासाठी N.D.A.तील १४८व्या तुकडीतून १७ महिला छात्रांची तुकडी यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण करून दीक्षांत संचलनानंतर अंतिम पाऊल टाकत नवा इतिहास रचत आहे. श्रीती दक्ष हिनं संधीचं सोनं करत सिल्वर मेडल मिळवलं आहे. हे सर्व दिलासा देणारं आहे.

पुण्यात एल जी बी टी आय क्यू ए यांची प्राईड परेड दिमाखात पार पडली. त्यामध्ये नेहमीप्रमाणे मिळून साऱ्याजणी सहभागी झालं होतं. माणूसपणाच्या या चळवळीत आपण सर्वांनी सहभागी होण्याची गरज आहे.

सत्य शांति अहिंसा की जय हो! जय जगत!!

मीनाक्षी

१८/६/२०२५

यशोधरा : मैत्र जीवाचे!

नीला भागवत

कलेचा सर्वांगीण विचार करणारी लेखिका यशोधरा आणि शास्त्रीय गायनात पुरुषप्रधानते विरुद्ध बंडखोरी करणारी कलाकार नीला भागवत यांचं ४०-५० वर्षांपूर्वी जुळलेलं मैत्र! मात्र नुकत्यात यशोधराच्या पुस्तकांमुळे कलांकडे, कलाकारांकडे आणि संगीताकडे पाहताना एका वेगळ्याच ममत्वाचा नीलाच्या मनात प्रवेश झाला. त्या पुस्तकांची ही काहीशी चिकित्सक अशी अनोखी ओळख जरूर वाचा.

आम्ही कुठे भेटलो ते नेमकं आठवत नाही, पण १९७२ वा ७३ मध्ये भेटलो आणि आजवर भेटणं होतच राहिलंय. मैत्री ही मोठी विलक्षण गोष्ट आहे. घरांमध्ये जसं वारं खेळत राहतं, एका दिशेनी येतं, घरात असणाऱ्यांना सुखावतं दुसऱ्या दिशेनी बाहेर जातं. अशी खेळती हवा मैत्रीत असते. जगाचा अनुभव घ्यावा, मैत्रीच्या दरवाजातून मोकळेपणानी वाहू द्यावा, पुन्हा बाहेरचं जग पाहू लागावं. मैत्री अशी निरंतर वाहती असते. त्यात विश्वास असतो, कौतुक असतं, खरेपणानी केलेली टीका असते, रसग्रहण असतं, खेळत्या-वाहत्या हवेत मुळीच प्रदूषण नसावं, अशी मैत्री असते. या संग्रहात अशा अनेक विशुद्ध मैत्रींबद्दल मी लिहिलं आहे. यशोधराबरोबर अशीच मैत्री मी अनुभवली आहे. त्याच्या जोडीला एकमेकींच्या कामाला आम्ही मनापासून दाद दिली आहे.

१९७२ साली ती पत्रकार म्हणून दिल्लीहून मुंबईला आली आणि इंडियन एक्सप्रेसमध्ये काम करू लागली. त्याचवेळी मसी उर् रहमान फ्री प्रेसमध्ये काम करत होता. असं झालं की ते दोघं एकाच प्रॉजेक्टवर काम करत होते. त्यामळे त्यांच्यात मैत्रीचं नातं निर्माण झालं. काही काळानी यशोधरा टाइम्स ऑफ इंडियामध्ये काम करू लागली. मसी देखील नव्यानी सुरू झालेल्या संडे ऑब्झर्वरमध्ये रुजू झाला. पुढे इंडियन एक्सप्रेसमध्ये त्यानी काम करायचं ठरवलं. पत्रकारितेच्या व्यवसायात अशी स्थलांतर होतच असतात. यशोधरानी मात्र स्थलांतराचा आशयच बदलून टाकायचं ठरवलं. सतत वेगवेगळ्या विषयांवर लिहायचं, म्हणजे कुठल्याच विषयात सखोल अवगाहन करता येत नाही. त्यापेक्षा एखाद्या विषयावर पुस्तक लिहिलं, तर त्याचा सर्वांगीण अभ्यास करता येईल. त्यातून अधिक समाधान मिळेल, अशा विचारानी तिनी नोकरी सोडली. त्याच वेळी तिला एक लेख लिहायला सांगितलं गेलं. त्याचा विषय होता-डहाणूच्या वारली या आदिवासींचं सांस्कृतिक स्वरूप. हे एक निमित्त झालं, आणि यशोधराचं पुस्तक लेखन सुरू झालं.

नवी सखोल भूमिका : वारली आदिवासींवरचा तिचा लेख छापून आला. त्याला वाचकांकडून चांगलीच दाद मिळाली. तेव्हा यशोधरानी या कामासाठी अनुदान मिळवण्यासाठी ललित कला ॲकॅडमीकडे अर्ज सादर केला. तिला एक वर्षासाठी अनुदान मिळालं, आणि तिनी संशोधनाला प्रारंभ केला. या कामासाठी वसुधा आंबिये या मराठी भाषेचा आणि साहित्याचा अभ्यास केलेल्या मैत्रिणीनी मदत केली. हा इतका नवीन अनुभव होता! शहर सोडून एका आदिवासी गावात जाऊन राहायचं, तिथल्या स्त्री-पुरुषांशी बोलायचं, त्यांची आयुष्य पाहायची, त्यांची कला पाहायची, त्या कलेच्या मागच्या प्रेरणा काय असाव्यात त्याचा विचार करायचा, दोघींनी त्यावर चर्चा करायची, हा अतिशय सुंदर पण पूर्णतः नवीन अनुभव होता. तिथे जाणं हे काही सोप नव्हतं. ट्रेन घेऊन ठाण्याला जायचं. पुढे जे मिळेल ते वाहन घेऊन डहाणूला पोचायचं, कधी ट्रक, कधी गाडी, जे त्या त्या वेळी उपलब्ध असेल, ते ते वाहन घेऊन डहाणू मुक्कामी पोचायचं. त्यातनं कधी भले-बुरे अनुभव यायचे. एकदा एका ट्रक ड्रायव्हरचं लक्षण वसुधाला काही ठीक दिसेना. ती हात जोडून ड्रायव्हरला म्हणाली, "दादा, मी तुमची बहीण आहे. माझ्या कामाच्या ठिकाणी तुम्ही पोचवलंत, तरच मला काम करता येईल. बहीण मानून माझी काळजी घ्या." हा प्रसंग कठीणच होता. वसुधानी प्रसंगावधान राखलं. आणि त्यातून ती पार पडली. हा प्रसंग सांगताना वसुधाचा ताण जाणवत होता आणि सुटकेचा नि:श्वासही चेहऱ्यावर दिसत होता.

मातृसत्ताक ते पितृसत्ताक : दोघींनी ताण-तणाव आणि कष्ट अनुभवले, सहन केले, आणि Painted World of the Warlis हे सुंदर पुस्तक तयार झालं. त्यातली चित्रं, त्यातली गाणी, सुंदर आहेतच. पण लक्षणीय गोष्ट म्हणजे एकेक मिथ्थकथा मातृसत्ताक समाजातून पितृसत्ताक समाजाची निर्मिती कशी झाली त्याची कहाणी एका कथेत आहे. तिथल्या अनेक देवदेवतांमधल्या कहाण्यांमध्ये नरन्देवाची कहाणी या संदर्भात महत्त्वाची आहे, तसं पाहिलं तर सर्व नैसर्गिक शक्तींना देवत्त्व बहाल करणं हेच देवादिकांच्या अस्तिवाचं सूत्र आहे. वारली लोकांनी त्यात आणखी देवत्त्व निमार्ण केलं. वाघ हा त्यांचा एक देव आहे तो भीतीपोटी वाघाला प्रसन्न करण्यासाठीच मानला असला पाहिजे. नरन्देव

हा नंतर जन्माला आलेला देव आहे. नंतर म्हणजे नैसर्गिक शक्तींना देवत्त्व बहाल केल्यानंतरचा हा देव आहे.

कथा दुष्काळाची : गोष्ट सुरू होते, ती एका स्त्रीच्या मासिक पाळीच्या कपड्यांपासून, तिला ते कपडे धुवायचे असतात. ती जाते नदीकडे, नदी नकार देते. मग ती जाते समुद्राकडे. तो देखील तिला नकार देतो. बिचारी अगतिकपणे ते कपडे जमिनीत पुरते. कालांतरानी त्यातून नरन्देवाचा जन्म होतो. नरन्देवाला योग्य काळात ही गोष्ट कळते. तो आईवर भयंवर चिडतो. आणि मेघराजाला - म्हणजे इंद्राला सांगतो, "इथे आता पाऊस पडूच देऊ नका!" अशी चोवीस वर्षं जातात. तहानेनी सर्व लोक व्याकुळ होतात. देवसुद्धा ही तहान सहन करू शकत नाहीत. मग ते नरन्देवाला विनंती करतात. त्यानुसार तो मेघराजाला विनंती करतो. पाऊस पडू लागतो. तहान भागू लागते. स्त्रीच्या स्त्रीत्त्वामधून निर्माण झालेला पुरुष नरन्देव सर्वांचं रक्षण करतो. मातृत्त्व ते पितृत्त्व किंबहुना मातृसत्ताक ते पितृसत्ताक अशी मानवी जीवनाची यात्रा सुरू होते.

हा अर्थ लावण्याचं काम निश्चितपणे आधुनिक शहरी दृष्टिकोनातून होतं, पण शेतकी समाजातल्या श्रमविभागणीतून पुरुषप्रधान समाज कसा घडत गेला आणि प्रस्थापित झाला हे लक्षात घेतानाच वारली मिथ्यकथेचा आधार घेणं, हेही संयुक्तिक वाटतं.

वारली समाजाची खरी ओळख म्हणजे त्यांची चित्रकला : त्याबद्दल एक स्वतंत्र लेख या पुस्तकात आहे. परंतु विशेष म्हणजे त्यांच्यातला पहिला चित्रकार जिव्या सोमा माशे याच्यावर सविस्तर लेख आहे. त्यात त्याचं चरित्र येतं, तसंच त्याच्या चित्रकलेची इत्थंभूत -चर्चा, विश्लेषण देखील येतं. त्याच्याशी केलेल्या संवादाचा लेखात अंतर्भाव केल्यामुळे लेखाला सजीवता प्राप्त होते.

जिव्याची कागदावरची कला (मूलतः ही चित्रं भिंतीवर गेरू किंवा शेणानी सारवलेल्या जमिनीवर तांदुळाच्या - किंबहुना पॅडीच्या पिठात पाणी टाकून ते कालवून त्या पांढऱ्या रंगानी रंगवलेली असत.) प्रथम १९७४ मध्ये ही चित्रं भारतात दाखवली गेली, त्याचं भारतात जे स्वागत झालं, त्याचा परिणाम म्हणजे ते भारताबाहेरही दाखवलं जाऊ लागलं. यशोधरानी एका औत्सुक्यापायी सुरू केलेल्या संशोधनाच्या कामातून जिव्यासारख्या कलाकाराला गावापलीकडचं केवढं मोठे व्यापक आकाश गवसलं, त्यातून त्याचे जगण्याचे मार्ग पुष्कळ सुकर झाले, ही मोठी आणि महत्त्वाची गोष्ट आहे. परंतु यशोधरानी कला, कलाकार आणि त्या भोवतालचा आर्थिक आणि व्यावहारिक विचार या संदर्भात जिव्याशी केलेला संवाद इथे द्यायलाच हवा.

तिच्या असं लक्षात आलं, की विक्री चांगली व्हावी म्हणून लोकांना आवडणारी पेंटिंग्ज जिव्या करतो. त्याच्या आर्थिक लाभासाठी आणि लोकप्रियता मिळवून अधिक काम मिळवण्यासाठी तो हे करतो. तिला कलात्मक निष्ठेच्या दृष्टिकोनातून हे पटत नाही. पण दिल्लीला किंवा बेल्जीयमला जायला मिळतं, म्हणून जिव्या ही तडजोड करतो. अशा तडजोडी अनेक कलांमध्ये, कलाकारांकडून होत असतात -पण यातली विसंगती लक्षात घेताना यशोधरा म्हणते, "But to what extent will he be able to sustain this position? This could only depend on Jivya's own ability to not only accept contradictions but to comprehend them and then work towards synthesis." परंतु पुढे जिव्याला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, आणि त्याला वारली समाजातल्या मुला-मुलींसाठी शैक्षणिक शिबीर द्यायला सांगितलं गेलं. त्यातून वारली कलेमधल्या पुष्कळ शक्यता दिसू लागल्या. अनेक बायकांना आपली कला शहरात सादर करण्याची संधी मिळाली. बाळूसारखा एक तरुण चित्रकार पुढे आला.

यशोधरा दालमिया

The Making of Modern Indian Art : यशोधरा कलेचा सर्वांगीण विचार करणारी लेखिका आहे. वारली चित्रांचा, चित्रकारांना त्यांच्या परिस्थितीचा सर्वतोपरी विचार करणाऱ्या यशोधरानी आधुनिक कलेचा आणि चित्रकारांचा कसा विचार केला आहे, ते आता पाहू. The Making of Modern Indian Art, हे या संदर्भात अतिशय महत्त्वाचं पुस्तक आहे. या विषयातली तिची सहा पुस्तकं आहेत, कित्येक प्रदर्शनांमधल्या कलाचित्रांची निवड, संकलन आणि संयोजन तिनी केलेलं आहे, हे तिचं नित्याचं आणि आवडतं काम आहे. तिचं मुंबईत असलेलं संकलन पाहायला मी नेहमी गेले आहे. दिल्लीला जाणं मात्र अशक्य होतं. हे जितकं कठीण तितकाच तिच्या सहा पुस्तकांचा प्रवास करणं कठीण आहे. तिचं वारली पेंटिंग्ज वरचं पुस्तक, अमृता शेरगिलचं जीवनचित्र मी पूर्वीच वाचली होती. पण मॉडर्न आर्टवरची पुस्तकं या लेखाच्या निमित्तानी वाचणं देखील कठीण आहे. तरीही वर उल्लेख केलेलं The Making of Modern Indian Art हे पुस्तक वाचायचा मी प्रयत्न केला. त्यातल्या ब्रिटिश कालखंडाबद्दल लिहिणं अतिशय आवश्यक आहे. कलविश्वासाठी ब्रिटिशांनी केलेलं काम, पुढे जर्मन कलाकार आणि रसिक यांचं काम याविषयी वाचताना वर्तमान काळात दिसणाऱ्या कलासंस्कृतीचा मूलभूत प्रारंभ कसा झाला, कलेचा हा वृक्ष पुढे कोणी कसा वृध्दिंगत केला, त्याची जागतिक पार्श्वभूमी काय होती, हा आलेख डोळ्यांसमोर एक व्यापक सूक्ष्म आणि सखोलसुंदर विश्व दाखवू लागतो. सांस्कृतिक चिंतनाच्या सुंदर मार्गावर आपल्याला घेऊन जातो. स्वांतत्र्यपूर्व काळातल्या या घटना पाहणं अर्थातच अपरिहार्य होतं.

स्वातंत्र्यपूर्व काळातले ब्रिटिश सत्तेविरूद्ध झालेले लढे

आपल्याला माहीत असतात, पण त्या इतिहासाच्या अनुषंगानी आपल्या संस्कृतीत किती प्रकारची भर ब्रिटिशांनी टाकली, हे आपण जाणत नाही. हाँ! १८५३ साली मुंबई-ठाणे या दरम्यान पहिली रेल्वे सुरू झाली. हे आपल्याला माहीत असतं, नेहमीच आपण रेल्वेतून प्रवास करत असतो ना! पण नित्याच्या नसलेल्या पण फार महत्त्वाच्या सांस्कृतिक घटना ब्रिटिशांनी कशा सुरू केल्या, हे, यशोधराच्या, प्रस्तुत पुस्तकांत स्पष्ट होते. अरेच्चा! किती छान! असं सहजच वाटून जातं.

भारतात प्रारंभी कला-विद्यालयं स्थापन झाली, ती तीन ठिकाणी. १९ व्या शतकाच्या मध्यावर १८५० मध्ये मद्रासला, १८५४ साली कलकत्त्याला आणि १८५७ मध्ये मुंबईत, अशी ही कला विद्यालयं. आपण त्यांना आर्टस् स्कूलस् असंच म्हणतो. ते सोपं वाटतं. (कला विद्यालयं म्हणणं तसं कठीण नाही. पण हा इंग्रजीचा संस्कार अंगवळणी पडलाय खरा.)

गंमत अशी होती की भारतीय हस्तकला आणि ब्रिटिश आधुनिक कला यांचा संगम होणं हे कठीण होतं. परंतु या विद्यालयांमध्ये जे शिकायला मिळेल, त्याच्याबरोबर परस्पर प्रक्रियांमधून जरूर काही निष्पन्न होईल, अशी कल्पना या विद्यालयांच्या स्थापनेमागे होती. हस्तकला निर्माण करणाऱ्यांना या विद्यालयांमध्ये शिकून आधुनिक संस्कारित कला (नि कलाकार) निर्माण करता येईल, अशीही एक कल्पना या मागे होती. परंतु प्रत्यक्षात अभ्यासक्रम आखणं ही प्रक्रिया वेगळीच होत गेली. हस्तकला निर्माण करणाऱ्यांचा आर्थिक वर्ग, त्यांची मातृभाषा आणि विद्यालयातलं शिक्षण, यात अंतर होतं. विद्यालयात दाखल झालं, तरी इंग्रजी भाषेत शिकणं सोपं नव्हतं.

आणखी एक संघर्ष असा होता, की युरोपियन तंत्रकौशल्य शिकायची आणि ती भारतीय संदर्भात वापरायची हा तिढा सोडवणं कठीण होतं. त्यात अपेक्षा अशी होती, की या परस्पर नात्यामधून जी कलाकृती निर्माण होईल, ती 'भारतीय' या वर्गातच गणली गेली पाहिजे.

१८५१ साली लंडनमध्ये जे कला-प्रदर्शन योजलेलं होतं, ते पाहण्यासाठी जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट, फ्रामजी कावसजी अशी भारतातली सुसंस्कृत, सधन आणि उदार धोरण अंगिकारलेली मंडळी गेली होती, तिथे मांडलेली भारतीय कला-कौशल्याची सुंदरता पाहून जमशेटजी जीजीभाई यांनी १८५७ मध्ये कला-विद्यालय स्थापन केलं. विद्यालयात जे इंग्लिश शिक्षक होते, त्यांच्या लक्षात आलं, की भारतीय कलाकारांना सूक्ष्म दृष्टी आणि उत्तम हस्तकौशल्य साधू शकतं. जमशेटजी जीजीभाई यांचं औदार्य ब्रिटिशांनी लक्षात घेतलं आणि त्यांना नाइटहूड बहाल केलं. कालांतरानी ते पहिले भारतीय बॅरोनेट म्हणून मान्यता पावले.

मुंबईतील करामत : इतिहासाचे नवे रूप : १८६०च्या सुमाराला तीन ब्रिटिश उत्साही आणि सृजनशील लोकांनी कला-विकासाच्या प्रक्रियेला प्रारंभ केला. जॉन ग्रिफिथ हा एक व्हिक्टोरियन चित्रकार होता, त्याचा भारतीय वास्तवाशी उत्तम परिचय होता. लॉक्वूड किपलिंग (रुडयार्ड किपलिंग, प्रसिद्ध पत्रकार आणि कादंबरीकार यांचे वडील) ट्रेन्ट स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रशिक्षण घेऊन भारतात आला होता. जॉन हिगिन्स त्यांच्याबरोबर होता (त्याची माहिती मिळत नाही) मुंबईच्या रहिवाशाला अत्यंत परिचयाची व्हिक्टोरिया टर्मिनसची बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई विद्यापीठातलं राजाबाई टॉवर या इमारतींवरची रिलीफ स्कल्पचर्स या तिघांनी घडवलेली आहेत. किती विलक्षण गोष्ट आहे! या इमारतींची भव्यता आणि त्यावरचं शिल्प इतकं सुंदर आहे! इतकी वर्षं ते पावसापाण्याला पुरून उरलेलं आहे! लॉक्वूड किपलिंगला भारतीय कलेची चांगलीच जाणीव असल्यामुळे एतद्देशीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांनीच घेतली होती. त्यांना स्वतंत्र आत्माविष्कार करता यावा यासाठी प्रयत्न करीत होते.

ब्रिटिशांची कलासक्त भूमिका : १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात १८४३च्या सुमाराला ब्रिटिश आर्मीनी तत्कालीन हैदराबाद राज्यातल्या अजिंठ्याची चित्रं आणि वेरूळची लेणी आणि शिल्पं शोधून काढली. त्यांचं फर्ग्युसननी केलेलं वर्णन रॉयल एशियाटिक सोसायटीतल्या मंडळींना अतिशय आवडलं. परिणामी १८७२ मध्ये ग्रिफिथस्वर अजिंठ्याच्या लेण्यांमधली चित्रं अभ्यासण्याची कामगिरी सोपवली गेली. त्याच्या पाहणीनुसार या चित्रांची प्रतिकृती करण्याचं काम तत्काळ हाती घेणं आवश्यक होतं. त्यांची अवस्था आधीच काळाबरोबर विनाशाकडे झुकू लागली होती. या बाबतीत आवश्यक तो निर्णय घेतला गेला. अनुदानाची योजना झाली. नुकत्याच स्थापन झालेल्या कला-विद्यालयातल्या विद्यार्थ्यांची एक समिती नियुक्त झाली. त्यांना या कामासाठी विशेष प्रशिक्षण दिलं गेलं. १८७२ मध्ये या कलेच्या विद्यार्थ्यांनी हे काम सुरू केलं, ते १८८४ साली संपवलं. ग्रिफिथस् या कामाच्या व्यवस्थापनात गुंतलेला असल्यामुळे पेस्तनजी बोमनजी या एका विद्यार्थ्याकडे या कामाकडे लक्ष देण्याची कामगिरी सोपवली गेली. ही कामगिरी त्यांनी इतकी चांगल्या तऱ्हेनी पार पाडली! त्यात हिंदू, पारशी आणि गोवेकर विद्यार्थी एकजुटीनी काम करत होते. याबद्दल ग्रिफिथस्नी जे लिहिलं आहे, ते उद्धृत केल्याखेरीज मला राहवत नाही.

"Rigorous fidelity was insisted on with the result that after some practice peculiarities of handling and treatment grew to be second nature and I am persuaded that no European, no matter how skilful, could have completely caught the spritit of the original."

या कला विद्यालयातून चांगले चित्रकार घडू शकले. त्यात (१८७१) मंचरशा फकीरजी पीठावाला यांचा विशेष उल्लेख करायला

हवा. फ्रामजी पटेल (१९०८), यांचं कामही उल्लेखनीय आहे. १९०५ मध्ये क्वीन मेरीच्या भारत भेटीच्या निमित्तानी पीठावाला यांनी हिंदू, मुस्लिम, पारसी अशा वेगवेगळ्या समूहांमधल्या स्त्रियांची त्यांची विशिष्ट पोषाखांमधली चित्रं काढली. ती क्वीन मेरीसमोर सादर केली. पाश्चिमात्य चित्रकलेचा संस्कार आत्मसात करून भारतीय चित्रं काढणाऱ्या पीठावाल्यानी १९११ मध्ये युरोपला प्रयाण केलं. लंडनमध्ये आपली कला प्रदर्शित करणारा तो पहिला चित्रकार होता.

भारतीयांची कलात्मता : शिल्पकार गणपतराव म्हात्रे : शिल्पकार गणपतराव म्हात्रे (१९७६ ते १९४७) यांचा उल्लेख विशेष सन्मानानी केला जातो. किंबहुना रवि वर्मा या चित्रकाराच्या जोडीनी त्यांचं नाव मानलं जातं. जे.जे.स्कूलमधल्या ब्रिटिश चित्रकारांची- प्रिन्सिपल ग्रीनवुड सारख्यांची भारतीय चित्रकारांकडून इतक्या गुणवत्तेची अपेक्षाच नव्हती. परंतु कोणतंही प्रशिक्षिण न घेता 'टू द टेम्पल (१८९६)' हे म्हात्र्यांनी केलेलं शिल्प पाहून ग्रीनवुड चकित झाले. प्राचीन ग्रीक-रोमन कला भारतीय कलाकार सहज आत्मसात करू शकतील, याची त्यांना खात्री पटली. बर्डवुड नावाच्या चित्रकारांनी या शिल्पाचा फोटो पाहून 'ग्रीक ऑफ द ग्रीक्स' असं त्यांचं वर्णन केलं. अभिजात आर्यन् अंतःप्रेरणा आणि नुकतंच शिकलेलं तंत्रकौशल्य यांचा म्हात्र्यांनी साधलेला मेळ पाहून त्यांच्यातली अकृत्रिम अस्सल अभिजातता जपणं किती महत्त्वाचं आहे, असा अभिप्राय बर्डवुडनी त्यांच्या हितचिंतकांना दिला. भारतातल्या पूर्वापार चालत आलेल्या शिल्पकलेच्या पुष्कळ पुढे जाणारी कला म्हात्र्यांनी हस्तगत केली आहे, हे ग्रिफिथ्सच्याही लक्षात आलं. म्हात्र्यांचा उत्कर्ष मात्र यानंतर थांबल्यासारखा झाला. त्यांच्या कामात पाश्चिमात्य संस्कार अधिक दिसू लागता.

कलेच्या मोकळ्या विश्वात : १९व्या शतकातली प्रारंभीची कला आणि तिच्यातल्या विविध प्रेरणांचे आविष्कार पाहणं हे आज २१ व्या शतकातही लक्षणीय मानलं पाहिजे.

आधुनिक पुरोगामी कलांचा प्रारंभ : या नंतरचा महत्त्वाचा कालखंड हा भारताच्या स्वातंत्र्यानंतरचा मानला पाहिजे. (१९४७) एकीकडे देशाच्या राजकीय स्वातंत्र्यामुळे नव्या प्रगतीशील दृष्टिकोनातून सामाजिक जडणघडण व्हावी यासाठी प्रयत्न होत होते. तर दुसरीकडे कदाचित याच वातावरणाचा संस्कार आत्मसात करीत कलेचं आधुनिक प्रगतीशील रूप निर्माण करण्याचे उत्कट, ज्वलंत आणि तरीही संवेदनशील प्रयत्न चित्रकार एकत्रितपणे करू लागले होते. त्याला धर्म, प्रदेश, भाषा अशी कोणतीही बंधनं नव्हती. एकीकडे आर्थिक ओढाताण पण दुसरीकडे नव्या रूपाची चित्रकला निर्माण करण्याची जबरदस्त आंतरिक ओढ असा हा लढा सर्वांनी मिळून प्रत्यक्षात आणला, आणि प्रतिभावंत प्रांगणात प्रस्थापित केला. त्याचे निर्माते, नायक होते, एफ्.एन्.सूझा, एम्.एफ् हुसेन, एस्.एच्.रझा, के.एच्.आरा, एस्.के.बाक्रे, एच्.ए.गाडे. यांच्या आयुष्यात स्वस्थपणा नव्हता, स्टूडिओची जागा नीटशी नव्हती, त्यामुळे सर्वांना भेटण्याची, वाद-संवाद करण्याची जागा म्हणजे मुंबईतलं चेतना रेस्टॉरन्ट, किंवा बॉम्बे आर्ट सोसायटी, किंवा मरीन ड्राइव्हच्या किनाऱ्यावरचे कठडे. वैयक्तिक आयुष्यातल्या समस्यांकडे 'ठीक आहे', म्हणून पाहणं त्यांना शक्य झालं, ते कलात्मक ध्येयाबद्दलची आत्यंतिक तळमळ असल्यामुळेच.

जर्मन रसग्रहण : कदाचित हे निर्मितीसाठी होणारे प्रयत्न ज्यांच्या लक्षात आले, त्यापैकी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे प्रो.वॉल्टर लांघमार. टाइम्स ऑफ इंडियाचे आर्ट डायरेक्टर असलेले लांघमार व्हिएन्ना सोडून आपल्या पत्नीसह भारतात आले होते. नाझी आक्रमणापासून मुक्त होण्यासाठी १९३८ मध्ये ते भारतात आले. आणि तेव्हापासून या चित्रकारांशी त्यांची मैत्री झाली. चित्रकार रझा यांना त्यांनी खूपच मदत केली. काम करण्यासाठी त्यांना आपला स्टुडिओ दिला. रझांच्या कामाबद्दल ते आपली प्रतिक्रिया सांगत. इतकंच नाही, तर रॅफेल, ग्रेको, मोने, सेझान यांच्या चित्रांची त्यांनी विशेष ओळख करून दिली. शिवाय वेगवेगळी पर्शियन, राजपूत, मुघल मिनिएचर पेंटिंग्ज याबद्दल ते रझांना काय वाटतं, इथे नेमकं काय घडतंय या विषयी विचारत, जाणून घेत. रुडी व्हॉन लेडन हा कला समीक्षक (टाइम्स ऑफ इंडियात काम करणारा) सुद्धा पुष्कळ माहिती देत असे. एक नवं, उत्साही आणि प्रेरणादायी वातावरण त्यामुळे निर्माण होत होतं. लेडन आणि लांघमार हे दोघं बॉम्बे आर्ट सोसायटीच्या कमिटीचे सदस्य होते. त्यांनी के.एच्.आरांना खूप मदत केली. पोट भरण्यासाठी मोटर धुण्याचं काम करणारे आरा हळूहळू चित्रकार या भूमिकेत जगू लागले. आपली योग्यता त्यांनी प्रस्थापित केली. श्लेसिंगर हा एका वैद्यकीय उद्योगाचा मालक होता. या सर्व आधुनिक आणि प्रगतीवादी चित्रकारांची चित्रं विकत घेऊन श्लेसिंगरनी फारच मोठी मदत केली. युरोपमधल्या फॅसिझम्पासून पलायन करून भारतात आलेल्या ज्यू बुद्धिवाद्यांमुळे इथल्या कलाजगताला युरोपमधल्या या कलाप्रेमी मंडळींना खूपच अनुभव लाभू शकला. त्यांचं मार्गदर्शन, त्यांचा उत्साही पाठिंबा या गोष्टींचा त्यांना लाभ झाला. तो देखील अगदी योग्य वेळी, ही खूप महत्त्वाची घटना होती.

बॉम्बे आर्ट सोसायटी : बॉम्बे आर्ट सोसायटी १८८८ साली भारतीय अंगणात कलात्मक जाणीव रुजावी या हेतूनी स्थापन झाली. त्यात आपल्या कलात्मक प्रयोगांना चालना देण्यासाठी काही ब्रिटिश स्त्रिया देखील सामील झाल्या. १८९२मध्ये एम्.व्ही.धुरंधर या एका कलेच्या विद्यार्थ्याला बक्षीस मिळालं, तेव्हा इतरांनाही त्यातून स्फूर्ती मिळाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी कलेच्या क्षेत्रात ज्यांनी मुहूर्तमेढ रोवली, त्यांच्यात पीठावाला, पेस्तनजी बोमनजी, त्रिंदादे, आबालाल रहमान, एस्.एल्.हळदणकर **(पान ५१ वर)**

१ जुलै कृषीदिनानिमित्त...

दुसरं महिला किसान संमेलन

एका दशकाच्या वाटचालीचा दस्तऐवज आणि नव्या शक्यता

गार्गी मांगुळकर, श्रुती वाघमोडे, निऋती चव्हाण

"हम भारत की नारी हैं, फूल नहीं चिंगारी हैं," अशा घोषणांनी दुसऱ्या राष्ट्रीय महिला किसान संमेलनाला सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे हे संमेलन ७ ते ९ मे २०२५ रोजी पार पडलं. महिला किसान अधिकार मंचने हे संमेलन स्त्री व लिंगभाव अभ्यास विभाग यांच्या सहकार्यानं आयोजित केलं होतं. महिलांची शेतकरी म्हणून ओळख, त्यांचे हक्क व नेतृत्व अशी परिवर्तनवादी भूमिका घेऊन मकाम सलग दहा वर्ष कार्यरत आहे. महिला शेतकरी अशी ओळख नसलेल्या समुदायाला इतर सर्व चळवळींशी जोडून घेत त्यांच्या समस्या-हक्क-अधिकार इतर चळवळींनी समजून घेतले पाहिजेत. हे मकामने आयोजित केलेल्या या संमेलनाचं वेगळं वैशिष्ट्य! शेतीत काम करण्याचा अनुभव असणाऱ्या महिलांच्या प्रश्नांची समाज, हक्कांसाठी पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध लढण्याचा संघर्ष आणि त्या संदर्भातल्या गुंतागुंतीचा अभ्यास असणारे तज्ज्ञ यांनी एकत्र येऊन मंथन केल्यामुळे काय चमत्कार घडला याचं दर्शन घडवणारा हा लेख. त्यांची ऊर्जा अशीच तेवत राहण्यासाठी आपणही प्रयत्न करायला हवा.

या संमेलनासाठी भारतातील १७ राज्यांमधून ५०० पेक्षा अधिक बहुभाषीय तसेच विविध क्षेत्रांमधून येणारे लोक सहभागी झाले होते. या संमेलनाची पूर्वतयारी व नियोजन हे आधीच सुरू झाले होते. त्यासाठी मकामच्या राष्ट्रीय पातळीवरील समन्वयक गटाने अनेक वेळा चर्चा करून संपूर्ण संमेलनाची रचना व सत्रे आखली. यातील प्रत्येक सत्राचे संचालन हे दोन किंवा तीन सदस्यांद्वारे करण्यात आले.

अंतरामधून डॉ. नित्या घोटगे, WGWLO/SWAL, गुजरात नेटवर्कमधील डॉ. एलिस मॉरिस आणि नीता हर्डीकर, डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीमधील डॉ. दिव्या वेलुगुरी आणि चेतना विकास येथील डॉ. निरंजना मारू; या मकामशी जोडलेल्या विविध विषयातील तज्ज्ञांना समांतर सत्रांची आखणी आणि सूत्रसंचालन करण्यासाठी आमंत्रित केले गेले होते.

प्रत्येक सत्राच्या नोंदी त्या त्या सुत्रासंचालकांद्वारे सहभागींना देण्यात आल्या. संमेलनाच्या खर्चासाठी लागणारे पैसे नोंदणी शुल्कातून, ऑनलाइन निधी संकलनातून आणि मुख्यतः काही सदस्य संस्थांनी मोठ्या प्रमाणात दिलेल्या योगदानातून उभारण्यात आले. मोठ्या संख्येने संमेलनात सहभाग नोंदवता यावा यासाठी स्थानिक संस्था आणि व्यक्तींनी स्वतः त्यांच्या राज्यातील किंवा विभागातील महिला शेतकऱ्यांच्या प्रवास खर्चाची तरतूद घेतली.

शेतकीय प्रतिपादन आणि स्त्रीवादी अभिव्यक्तीचा दशकपूर्ती सोहळा : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापिका डॉ. स्वाती देहड्राय यांनी संमेलनाचे उद्दिष्ट व भाव स्पष्ट करत सहभागी झालेल्यांचे स्वागत केले; त्याच बरोबर आपल्याला ज्ञानशाखेच्या वैचारिक चौकटींची तृणमूल शहाणीवेशी सांगड घालायची आहे, असे आवाहन करत या मेळाव्याची सुरुवात झाली.

महिला किसान अधिकार मंचच्या राष्ट्रीय समन्वय गटाच्या सदस्य, सीमा कुलकर्णी यांनी मंचाच्या मागील दशकभराच्या प्रवासावर आपले विचार मांडले. ज्यामधून महिलांची 'शेतकरी' म्हणून ठळक ओळख पटवून देण्यासाठी संशोधनाची साथ आणि महिलांचे संघटन यांची सांगड का गरजेची आहे ते सांगितले. मानवाधिकाराच्या कार्यकर्त्या आणि भारत जोडो यात्रा अभियानाच्या सदस्या उल्का महाजन यांनी रुजलेल्या संकल्पना नाकारत स्त्रीत्वाला प्रदान केलेल्या दैवी स्वरूपाच्या मिथकाला पालटून लावत विचारले - महिलांना देवी म्हणून पूजणारा हा समाज त्यांना त्यांच्या जमीनी, महिला शेतकरी म्हणून त्यांचे अधिकार आणि समाजातील त्यांच्या अस्तित्वाची मान्यता कशी नाकारू शकतो? 'हम बेचारी नहीं हैं' (आम्ही लाचार नाही आहोत), असे त्यांनी आवाहन केल्याबरोबर तीच ऊर्जा पूर्ण संमेलन संपेपर्यंत पाहायला मिळाली.

शेतकरी चळवळीशी जोडलेल्या नवशरण सिंह यांनी राज्यकर्ते स्वतःच्या सोयीनुसार स्त्रीवादी भाषेचा वापर कसा करतात व मूलगामी मागण्यांना निकामी करतात, याबद्दल राजकीय ताकीद दिली, 'आपकी मांगें भुला दी जाएंगी और एक नया महौल, एक नया संदर्भ

आपके उपर लाद दिया जाएगा' (तुमच्या मागण्या विसरल्या जातील, त्यात हस्तक्षेप केला जाईल आणि तुमची दिशाभूल करून तुमचे लक्ष दुसऱ्या आणखी वेगळ्या गोष्टींकडे ओढले जाईल). आसाममधील मून बोरा यांनी, विशेषतः अनौपचारिक ग्रामीण अर्थव्यवस्थांमध्ये शेतकरी महिलांच्या वेतनातील तफावत उघडकीस आणली. स्थलांतर आणि वनक्षेत्राच्या मर्यादित केलेल्या पट्ट्यांमुळे आदिवासी महिलांच्या फक्त जमीनीच नव्हे तर त्यांच्या ओळखीदेखील कशा हिरावून घेतल्या जात आहेत आणि बोटावर मोजता येतील एवढ्याच महिलांची नावे वन हक्कांवर असल्याचे महाराष्ट्रातील कुमारी जमकातन यांनी आदिवासी महिलांच्या परिस्थितीचे वर्णन केले. ज्या वक्त्यांना प्रत्यक्ष संमेलनात येऊन मार्गदर्शन करणे शक्य नव्हते त्यांनी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधला.

अशाच डॉ. अरुणा रॉय झूमच्या माध्यमातून सामील झाल्या आणि त्यांनी संमेलनाला सामूहिक संघटनेच्या एकत्रीकरणातून ताकद व बळ मिळवण्याचे आवाहन केले. तसेच, त्यांनी सर्वांना आठवण करून हिरीरीने सांगितले की महिलांचे श्रम जरी वेगवेगळ्या भागात, विखुरलेले असले तरी त्यांची एकता परिवर्तनवादी आहे.

दिशा दर्शवणारी, विचारांना भिडणारी आणि पुढील वाटचालीची योजना आखणारी अशी सत्रे : उद्घाटनाच्या पहिल्या प्लेनरी सत्रानंतर, चार विषयगत प्लेनरी सत्रांचे आयोजन करण्यात आले होते: महिला शेतकऱ्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठीचे संघटन, शेतीतील महिलांवर होणारा हिंसाचार, वन अधिकार, प्रशासन आणि सामाईक संसाधने; आणि स्त्रीवादी दृष्टीकोनातून पर्यावरणस्नेही शेती.

प्रत्येक सत्राची रचना संपूर्ण देशभरातील प्रादेशिक भाव समोर आणून, सामूहिक मागण्यांना महत्त्व देऊन त्या मागण्या अंमलात आणण्यासाठी स्त्रीवादी दृष्टिकोन मांडण्यात आला.

पहिल्या सत्रात - महिला शेतकऱ्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठीचे संघटन, या विषयावर चर्चा करण्यात आली तसेच सामूहिक संघटन हे रूढ असमानतेचे रूपांतर करण्यासाठी आणि हक्क मिळवण्यासाठी का आवश्यक आहे यावर चर्चा झाली. सेजल दंड यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या ब्रीदवाक्याला धार लावत 'संघर्ष करायचा असेल तर संघटना करण्याशिवाय पर्याय नाही.' असे बोलून त्यांनी या सत्राची सुरुवात केली. या सत्राच्या संचालक सेजल दंड व वैशाली पाटील या मूलभूत पातळीवरील संघर्षांभोवती चर्चा करत सांगतात की, महिलांनी फक्त स्वतःच्या अधिकारांसाठी आवाज उठवला नाही तर स्वतःच्या हिमतीवर जमिनी, कामे आणि प्रतिष्ठा देखील सुरक्षित ठेवली. महिला संघटनेत सामील झाल्यामुळे जमिनीचे हक्क मागण्यास आणि कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करण्यास कसे बळ मिळाले हे गुजरातच्या जशोधरा वंजारा यांनी

'रचनात्मक हिंसाचार' सत्रातील मान्यवर : सीमा कुलकर्णी, महाराष्ट्र, विजय रुक्मिणी राव, तेलंगणा, गीथा रामकृष्णन, तामिळनाडू, मनीषा टोकले, महाराष्ट्र, मंजूलता, छत्तीसगढ, यदम्मा, तेलंगणा, सुखविंदर कौर, पंजाब, मीरा संघमित्रा आणि एस.आशालता, तेलंगणा

सांगितले. शांती गंगाधरन यांनी तामिळनाडूमधील दलित महिलांनी संघटीत होऊन जात आणि लिंगभावाच्या उतरंडीला कसे आव्हान दिले, तसेच सहकार सेंद्रिय शेतीचे उपक्रम उभारण्याच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकला.

महाराष्ट्रातील सरपंच डॉ. कविता वारे यांनी, सरकारने आकारलेल्या करावर सवलती तसेच जमिनीचे मालकी हक्क आणि इतर कल्याणकारी योजनांमध्ये स्थानिक प्रशासनाद्वारे महिलांचा समावेश कसा वाढवता येईल याचे व्यवहारात्मक दिशासूचक सांगितले. दलित महिलांनी तळागाळावर राबवलेल्या मोहिमांमधून असे लक्षात येते की राज्याचे कामकाज हे सोयीसुविधा देण्यामध्ये असमर्थ आहे, असे कर्नाटकच्या निंगम्मा सावनूर यांनी उघडकीस आणले. सागरी अर्थव्यवस्थेला हातभार लावत असूनही मासेमार महिला ह्या सरकारच्या धोरणांमध्ये कशा अदृश्य राहतात असे तमिळनाडूमधील फिश फॉर ऑल सेंटरच्या वेल्विझी यांनी भर देत सांगितले. उत्तराखंडच्या उमंग शेतकरी उत्पादक कंपनीच्या सुनीता कश्यप यांनी २५,००० महिलांना कसे जोडले व उद्योगाची उभारणी केली ते सांगितले तसेच ग्रामीण बाजारपेठेतील पायाभूत सुविधा आणि महिलांच्या नेतृत्वाखालील एफपीओ (फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेशन्स) उभारण्याच्या दृष्टीकोनातून पाठिंबा देण्याची मागणी केली.

महिला शेतकऱ्यांच्या संघर्षांना केवळ आर्थिक अन्यायाविरोधालाच सामना करावा लागणार नाही तर वाढत्या हुकूमशाही आणि बहुसंख्यवादी सत्तेचाही सामना करावा लागणार आहे, अशी आठवण ज्येष्ठ नेत्या निशा शिवूरकर यांनी सहभागींना करून दिली व सत्राचा समारोप केला.

दुसऱ्या दिवशी रचनात्मक हिंसाचारावर असलेले दुसरे सत्र, समाजामधील विविध घटक कसे कृषीक्षेत्रातील महिलांच्या

जीवनपद्धतीला आकार देतात हे सांगणारे होते - महिलांची भूमिहीनता व गरिबी ते कायदेशीर संरक्षणातून वगळलेपणा कशा प्रकारे आकारास येतो हे ठळकपणे स्पष्ट करणारे होते. राज्याची धोरणे आणि संस्थांच्या लिंगभाव अंधत्वावर टीका करून सीमा कुलकर्णी यांनी सत्राची सुरुवात केली. असंघटित कामगारांसाठी कल्याणकारी मंडळे तयार करण्यासाठी चाललेल्या दीर्घकाळ संघर्षाबद्दल गीता रामकृष्णन यांनी सांगितले आणि क्षेत्र-विशिष्ट कायदेशीर संरक्षणाची मागणी केली. मनीषा तोकले यांनी आदिवासी समुदायातील ऊसतोडी करणाऱ्या मुलींना किमान वेतनापेक्षा कमी वेतन आणि कोणत्याही सुविधा नसताना धोकादायक काम आणि बालविवाहाला कसे सामोरे जावे लागते यावर प्रकाश टाकत प्रकर्षित भासवून दिली.

छत्तीसगडमधील आदिवासी कुटुंबांना वीज प्रकल्पांमुळे हिंसकरीत्या कसे बेदखल करण्यात आले. अगदी महिलांना मारहाण करून कसे स्थलांतरीत केले गेले, यांचे मंजुलतांनी दाखले दिले. तेलंगणातील मुदापू यादम्मा यांनी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारापासून ते जमिनीचा मालकी हक्क मिळवण्यापर्यंत आणि नेतृत्व करणारी महिला बनण्यापर्यंतच्या त्यांच्या प्रवासाचे वर्णन निडर व आत्मविश्वासाने केले. सुखविंदर कौर यांनी पंजाबमधील स्त्रीभ्रूणहत्येपासून ते विधवांना जमिनींचा ताबा पद्धतशीररीत्या नाकारला जातो, अशा लिंगभावाच्या खोलवर रुजलेल्या गंभीर परिस्थितीबद्दल त्यांनी भाष्य केले. स्थानिक प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी नेतृत्व करणाऱ्या महिलांना विरोधाचा सामना कसा करावा लागतो याच्या छाया खरकाटे यांनी अनेक जिवंत कहाण्या सांगितल्या. हिंसाचार हा प्रसंगात्मक नसून तो पुरुषप्रधानता, भांडवलशाहीमध्ये रुजू आहे; जमिनीपासून, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेपासून आणि निष्पक्षतेपासून राज्यव्यवस्था महिलांना आजवर वंचित ठेवत आलेली आहे. असे आवर्जून सांगत मीरा संघमित्रा यांनी या सत्राचा समारोप केला.

वन हक्क आणि सामूहिक जमिनींवरील तिसऱ्या सत्रामध्ये, वनक्षेत्रातील सामूहिक जमिनींच्या व्यवस्थापनात मध्यवर्ती भूमिका असूनही वन निवासी आणि पशुपालक महिला निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतून कायम वगळल्या जातात त्यांचा हा झगडा प्रकाशझोतात आणला. जंगलतोडीमध्ये वाढ झाल्याने सरपण तसेच चारा सहजासाहजी उपलब्ध होत नाही. तसेच जंगल कमी होत असल्याने, परिणामार्थ जनावरांचे जीवघेणे हल्ले वाढत आहेत. तसेच, त्यांनी मान्यता आणि भरपाईची मागणी करण्यासाठी महिलांना संघटीत करण्याबद्दल सांगितले. हिमधारा कलेक्टीवच्या मानसी आशेर यांनी जागतिक हवामान वित्त कार्यक्रमावर चिकित्सा केली. त्यामध्ये स्त्रियांच्या श्रमाचा फायदा घेऊन त्यांना गव्हरनन्स प्रक्रियेत दुय्यम ठरवले जाते. तसेच, लिंगभाव समानतेला 'ग्रीनवॉश' करण्याचा धोक्याचा इशारा सर्वांनी ध्यानात घेतला पाहिजे, असेही नमूद केले.

महिलांचे वन हक्काचे दावे रोखण्यासाठी वन अधिकारी कशा वृक्षारोपणाच्या खोट्या नोंदी करतात याचे गुजरातमधील वीणा बारिया यांनी वर्णन केले. राजस्थानमधील नवलीबाई गरासिया यांनी ग्रामसभेतील संमतीच्या नियमाला कसे डावलले जाते हे सांगितले. तर झारखंडमधील मुन्नी हंसदा यांनी पेसा आणि वनाधिकार कायद्याची पूर्ण अंमलबजावणी करण्याची मागणी केली. गुजरातमधील रबारी सूरज बिजलभाई यांनी पशुपालक महिलांनी सामूहिक प्रशासन आणि स्थानिक नियमांद्वारे सामूहिक जमिनी पुन्हा कशा निर्माण कराव्यात याबाबत सांगितले. महिलांना, दाखवण्यापुरते सहभागी न करता संसाधनांवर, आर्थिक नियोजनावर तसेच, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर त्यांचे संपूर्ण नियंत्रण आवश्यक आहे, ते निर्णय वनांच्या भविष्याला पूरक ठरतील. अशी त्यांनी मागणी केली.

स्त्रीवादी पर्यावरणस्नेही शेतीवरच्या चौथ्या प्लेनरी सत्राची मांडणी मध्यप्रदेशच्या अर्चना सिंघ यांनी केली. अन्न सार्वभौमत्व हे लिंगभावाच्या दृष्टीकोनातून आपल्याला कसे लक्षात घेता येईल यावर चर्चा झाली. दैनंदिन जीवन पद्धतींमध्ये रुजलेल्या, भेसळयुक्त रासायनिक शेतीला आव्हान दिले आणि बियाणे सार्वभौमत्व, पर्यावरणीय व्यवस्थापन आणि सामूहिक लागवडीवर भर दिला. 'शेतकरी' या व्याख्येचा आवाका वाढवण्यात यावा असा उद्‌गार करत, फक्त जमिनीची मालकी असणारे नाही तर शेती कासणारे, खंडाने शेती करणारे, पशुपालक आणि मच्छीमार यांचाही समावेश करण्यात यावा अशी मागणी केली.

नफिसा बारोट यांनी स्त्रीवादी पर्यावरणस्नेही शेतीला बियाणांवर, बाजारपेठांवर आणि निर्णयांवर स्वायत्तता मिळवण्यासाठीचे एक राजकीय कृत्य आहे, असे संबोधले. शेतीची लागवड करणाऱ्या महिलांना त्यांच्या अन्न-धान्याच्या किमती ठरवण्याचा अधिकार का नाकारला जातो? असा प्रश्न कर्नाटकातील शालिनी महादेवप्पा यांनी उपस्थित केला. आंध्र प्रदेशातील मीना कुमारी यांनी सामूहिक बीज बचत आणि पारंपरिक बी-बियाने पुनर्जीवीत करण्याबाबत सांगितले. त्याचबरोबर राजस्थानच्या विमला राठोड यांनी असे प्रतिपादन केले की पिढ्यान् पिढ्या चालत आलेले पारंपारिक ज्ञान हे शैक्षणिक पदव्यांपेक्षा कमी मौल्यवान नाही. छत्तीसगडमधील लता यांनी संमेलनात आलेल्या लोकांना आठवण करून दिली की खरी पर्यावरणस्नेही शेती पिकांना पाण्याशी, जंगलाशी, प्राण्यांशी तसेच मातीबरोबर जोडून ठेवते.

पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेती ही फक्त पद्धतींवर अवलंबून नसून सत्तेच्या नियंत्रणाबाबत आहे. संसाधनांवर कोणाचे नियंत्रण आहे, कोणाची ज्ञाननिर्मिती स्वीकारली जाते, अन्न आणि

जमिनीबाबत कोण निर्णय घेते याबाबत आहे. पर्यावरणीय कृषी प्रणालींमध्ये महिलांच्या पद्धती आणि नेतृत्वाला राज्याने आणि संस्थात्मक मान्यता देण्याची इच्छा त्यांनी या सत्रामध्ये व्यक्त केली गेली.

समांतर सत्रे : निश्चयी, ठाम प्रामाणिक आणि मातीशी इमान राखणारी : दोन दिवसांसाठी आखलेल्या दहा समांतर सत्रांमध्ये विविध भागातील, विविध प्रकारच्या कामांमध्ये सक्रीय असलेल्या महिला एकत्र येऊन त्यांनी स्वतःच्या अनुभवांचे संदर्भ देत तीक्ष्ण मते मांडली. शेतकरी आत्महत्येच्या सत्रामध्ये त्यांनी फक्त त्यांच्या दुःखावर मांडणी न करता भरपाईवरून आणि तिच्या प्रतिष्ठेवरून सरकारी यंत्रणेशी कसा झगडा करावा लागतो याविषयी त्या बोलल्या. जात आणि लिंगभेद स्त्रियांच्या शैक्षणिक संधी व कामे मिळण्याच्या संधींचे सर्व मार्ग बंद करतात यावर ग्रामीण भागातील तरुण स्त्रियांनी भाष्य केले. तर तिथेच दुसऱ्या खोलीत, दलित व आदिवासी शेतमजूर महिलांचे असुरक्षित स्थलांतर, त्यांच्या वेतनातून नानाविध कारणांनी केलेली चोरी आणि त्यांच्या संरक्षणासाठी बनलेल्या योजनांमधून कसे त्यांनाच अदृश्य केले जाते यावर त्यांनी स्वतःच्या आयुष्याचे कथन केले.

समुद्रकिनाऱ्यालगतच्या आणि पशुधन अर्थव्यवस्थांमधील महिलांना मदतनीस म्हणून नव्हे तर उत्पादक म्हणून मान्यता मिळावी अशी मागणी केली. तर जमिनीवरील हक्कांच्या सत्रात, उपस्थित असलेल्या सहभागींनी सामूहिक टायटल डीड सामूहिक जमिनींचे मालकीहक्क मिळावेत असे आवाहन केले. वन हक्कांवरील सत्रात या मागण्या मांडण्यात आल्या. पण इथल्या महिलांनी संवर्धनाच्या नावाखाली त्यांच्या वन जमिनींचा ताबा काढून घेण्यास विरोध केला. पर्यावरणस्नेही शेती आणि बियाणे सार्वभौमत्वावरील चर्चेत, महिलांनी स्थानिक ज्ञान, परस्परांना मदत आणि संसाधनांवरचे सामुदायिक नियंत्रण यावर धोरणे मांडली.

सर्वांच्या वेगवेगळ्या मागण्यांबरोबरच सामायिक संघर्षाची दाट झालर विणली गेली तसेच स्त्रीवादी लक्ष्य दिसून आले. फक्त कृषी व्यवस्थांच्या चौकटीत समावेश मिळवण्याचा प्रयत्न न करता त्याच्या पुनर्रचनेची मागणी केली पाहिजे.

सांस्कृतिक कार्यक्रम : नाटक आणि सामूहिक स्मृती : पहिल्या दिवशीच्या संध्याकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अभिनेत्री शिल्पा साने आणि शुभांगी भुजबळ यांनी हिंदीमध्ये सादर केलेल्या 'व्हयं, मी सावित्रीबाई' या सावित्रीबाई फुलेंच्या जीवनपटावर आधारित नाटकाने महिलांना प्रभावित केले. या दोनपात्री प्रयोगातून आणि बदलत्या भूमिकांतून, नाटकात सावित्रीबाई फुले यांचे बालपण आणि जोतिबा यांच्याशी लग्नापासून ते शिक्षिका आणि पुढे समाजातील परिवर्तनशील घटनांपर्यंतचा त्यांचा प्रवास संमेलनातील सहभागींसाठी आदर्शवादी ठरला.

या नाटकात फातिमा शेख, सगुणाबाई आणि ज्ञानोबा ससाणे यासारख्या प्रमुख व्यक्तींचे चित्रण करण्यात आले, ज्यात सामाजिक सुधारणांच्या सामूहिक आत्मिक-भावनेवर प्रकाश टाकण्यात आला. दलित, महिला आणि विधवांच्या हक्कांसाठी फुलेंच्या लढ्याचे चित्रण प्रेक्षकांना खूप भावले, त्यापैकी अनेकांना त्यांच्या स्वतःच्या संघर्षांची जाणीव होत होती. या नाटकाने संमेलनाच्या स्त्रीवादी नीतिमत्तेचा सूर भूतकाळातील विरोधाला वर्तमानात संघटीत होण्याला जोडत होता.

संमेलनाची दुसरी संध्याकाळ महिला शेतकऱ्यांनी सादर केलेल्या गाण्यांनी आणि नृत्यांनी आणखी जैविक वाटू लागली. त्यापैकी अनेक आदिवासी महिलांनी त्यांच्या पारंपारिक पोशाखात सजून त्यांच्या सांस्कृतिक लोकगीतांवर नृत्य सादर केले. ओडिशा, उत्तराखंड, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा येथील गटाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या स्वतःच्या बोलीभाषेतील गाणी गाऊन, गोलाकारातील नृत्य किंवा एकल नृत्य करून त्यांची सांस्कृतिक अभिव्यक्ती सर्वांसमोर सादर केली. यामुळे हॉलमधील वातावरण अगदी आनंदाने व उत्साहाने भरून गेले. याचा उपस्थित महिलांनीही भरभरून आनंद उचलला.

जमिनीच्या, जंगलांच्या, प्रतीपादांच्या आणि सामूहिक अनुभवाच्या बोलीतील गाणी गाण्यात आली. महिलांनी केवळ स्वतःची लयबद्धता आणि चळवळ मंचावर आणली नाही तर त्यांच्या आवाजात इतिहासाचे वजन हे त्यांनी पुढे आणले.

सहभागी झालेल्या शेतकरी महिलांपैकी काही महिलांनी गटात मिळून प्रदर्शनात भाग घ्यायचे ठरवले. असे २० गट १० राज्यांमधून तयार झाले. त्यामध्ये भरड धान्ये, डाळी, तांदूळ, वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या आणि औषधी वनस्पती; तसेच लोणचे, औषधी चूर्ण आणि उपहाराचे पदार्थ इत्यादी गोष्टींचा समावेश होता.

पुणे घोषणापत्र : नव्हे, तर एक राजकीय दिशासूचक : पुण्याचे घोषणापत्र अंगीकारून, सामूहिक मागण्यांचे व दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण देऊन कणखर आवाजातला उद्‌गार सर्वांच्या सहमतीने स्वीकारून संमेलनाचा शेवट करण्यात आला.

पुणे घोषणापत्र हे सरकारची विषमतावादी धोरणे आणि जनतेमधील वाढणारा रोष या पार्श्वभूमीवर पुणे घोषणापत्राचा आराखडा आखला गेला. तसेच, पहलगाममध्ये शांती प्रस्थापित व्हावी, न्यायाची ग्वाही मिळावी अशी इच्छा व्यक्त केली गेली.

महिलांनी फक्त त्यांच्या घरात व शेतात होणाऱ्या अत्याचाराचाच नाही तर राजकारण आणि संघर्षाच्या नावाआड होणाऱ्या हिंसाचाराचा देखील निषेध केल्यामुळे, संमेलनात युद्ध विरोधी तीव्र भावना उमटवल्या. सहभागींनी युद्ध आणि लष्करीवादाला स्पष्ट नकार दिला. त्या ऐवजी अन्न, सार्वभौमत्व आणि पर्यावरणीय पुनर्संचयनात गुंतवणूक करण्याची मागणी केली. **(पान ५३ वर)**

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प - २

इराणी स्त्री – भाग-१

सुलभा पाटील

मुस्लिम धर्म, संस्कृती, इतिहास आणि मुस्लिम स्त्रिया यांना धरून आपल्या समाजात अनेक चुकीच्या धारणा आहेत. हिजाब-मांस अशा काही गोष्टी मुस्लिम म्हणून इतक्या अभिन्नपणे जोडून पाहिल्या जातात की त्या व्यतिरिक्त मुस्लिम समाज अशी ओळखच नाही. याला छेद देणारा हा निवृत्त प्राध्यापक सुलभा पाटील या मैत्रिणीचा अत्यंत संवेदनशील लेख जरूर वाचा. लेखिकेनं अभ्यास आणि पर्यटन म्हणून इराण सहल केली आणि त्यात तिला किती धक्कादायक वातावरण अनुभवायला मिळालं हे वर्णनातीत आहे. दोन भागात असणारा हा लेख वाचून आपल्या चुकीच्या धारणा बदलायला मदत होईल असा विश्वास वाटतो.

पर्यटन व शैक्षणिक सहल म्हणून इराणला जायचे ठरवले पण सर्वांचा सूर हा तसा नकारात्मकच होता. एकतर युद्धाची पार्श्वभूमी, कट्टर धार्मिकतेवर आधारित मुस्लिम देश, तेथील कडक कायद्यांच्या कडक गोष्टी कानावर पडून जाण्याविषयी खरेच मनात द्वंद्व सुरू झाले. ही नकारात्मकता केवढी अवाढव्य असावी? तर अगदी इराणला जाऊन यात्रा पार पडल्यावरही "अहो, इराणला कशाला गेलात?" असे ठसक्यात विचारण्यात आले. म्हटले, हे काय व्यवस्थित तर परत आलो व खूपच छान देश व लोक होते, असे मी सुद्धा तेवढ्याच ठसक्यात व गर्वाने सांगितले. इराणला जाताना जी धाकधूक होती ती जाऊन आल्यावर मात्र थोडी सुद्धा उरली नव्हती. उलट या देशाटनाने इराण, मुस्लिम लोक, तेथील संस्कृती व इतिहास याबद्दल नव्या जाणिवा निर्माण झाल्या. सांस्कृतिक जवळीक निर्माण तर झालीच पण मुस्लिम स्त्री समजून घ्यायला अधिकच मदत झाली. एरव्ही भारतात राहून मुस्लिम स्त्रीबद्दल किती तटस्थपणे आपण तिच्याकडे पाहतो. धर्म, मूलतत्त्ववाद व तो जोपासण्यासाठी केवळ स्त्रियांचाच त्याग, नैतिकता, शोषण का गृहीत धरले जाते याविषयी विचारप्रवृत्त होण्यास नव्याने सुरुवात झाली. जगाच्या पाठीवरील कोणतीही स्त्री या एकाच समान धाग्याने जोडलेली आहे हे प्रखरतेने जाणवले. केवळ सोशिकता नाही तर अन्यायाची जाणीव, चीड, संताप व धगधगते मन यासह जगणारी इराणी स्त्री प्रकर्षाने जाणवली. सुंदर चेहरा व शरीर या नैसर्गिक देणगीबरोबरच निष्ठुर अन्यायाचे जन्मजात लोढणेही पदरात पडलेले. बलात्कार, सती जाणे, बालविधवा, जरठ-कुमारी विवाह, चूल व मुल.... अशा प्रथा पार करत भारतीय स्त्री आजच्या या मुक्त वातावरणात जरी जगत असली तरी या अवस्थांतून मागील दोन-तीनशे वर्षांपूर्वी दिलेल्या या भारतीय स्त्रीचा लढा आपण विसरत चाललो आहोत का, किंवा आता त्याची जाणीव बोथट होत चालली आहे का, हे प्रश्न जाणवायला लागले. आत्ता आत्ता 'जय श्रीराम'चे वारे भारतात वाहू लागले आहे. आपलाही प्रवास आता उलट दिशेने सुरू होईल वा कसे हे विचार भारतीय स्त्रीला सूचतात? धर्माधिष्ठित राज्यप्रणाली बरोबर मूलतत्त्ववाद, धर्मसंवर्धन, संस्कृतीरक्षण या व तत्सम गोष्टीही हातात हात घालूनच येतात व याचे सर्व ओझे स्त्रियांच्याच माथी एकहाती मारले जाते व याचे कटाक्षाने पालन व्हावे म्हणून श्रुती-स्मृतीही रचल्या जातात याची जाणीव वेळेतच होणे महत्त्वाचे. इराण क्रांती काळात 'इस्लामवर आधारित राज्य' या मागील गुढार्थ इराणी जनतेला जाणवला नाही. तो जेव्हा एकदम अंगावरच येऊन कोसळला तोपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. इराण भेटीनंतर व इराणी स्त्री पाहिल्यावर डोळे खाडकन उघडले. मात्र हा डोळे उघडण्याचा प्रवास भारतातच सुरू झाला होता, तेव्हा ते विशेष जाणवले नाही. पण जाण्याची तयारी सुरू झाली तेव्हाच बोचले की, आपल्यालाही इराणी स्त्रीच्या रांगेत उभे राहूनच इराणला भेट द्यावी लागणार आहे. स्त्री विश्वातील कोणतीही असो, ती मूळात दुय्यमच ठेवण्यात आली आहे. पहिल्यांदाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले, महात्मा गांधी अगदी जवळचे वाटले व फोटो पुढे नतमस्तक न होताही आदर व कृतज्ञतेने मन काठोकाठ भरून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांना 'हिंदू कोड बिलाच्या' रुपाने स्त्री समानतेला खऱ्या अर्थाने कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. महात्मा फुले यांनी स्वत: वैचारिकतेला कृतीची जोड देऊन समानतेचा आदर्श समाजाला दाखवून दिला तर महात्मा गांधींनी स्त्री-शक्तीचे सामर्थ्य ओळखून भारतीयच नव्हे तर जागतिक पातळीवरही स्त्रियांना सामाजिक व सार्वजनिक सेवेत येण्यासाठी केवळ प्रेरितच केले नाही तर त्यासाठी सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली.

मुस्लिम स्त्री म्हटले की हिजाबच प्रथम डोळ्यांसमोर येतो.

भारतातही हिजाबचे प्रस्थ मुस्लिम स्त्रियांमध्ये वाढतच चालले आहे. विशेषतः 'बाबरी मस्जिद' प्रकरण व 'गोध्रा हत्याकांड' व मूलतत्त्ववादाचे वाढते वर्चस्व यानंतर यात, मुख्यत्वे बुरख्यात वाढ होत गेली. मीना प्रभूचे 'गाथा इराणी' वाचताना खरेतर माहिती घेणे, करमणूक, उत्सुकता एवढेच मर्यादित हेतू असल्याने हिजाबबद्दल वाचताना त्यातील गांभीर्य फारसे कळले नव्हते. पण आता इराणला जायचे म्हटल्यावर 'घी देखा लेकीन बडगा नहीं देखा' याची प्रकर्षाने जाणीव झाली. पटकन नवऱ्याकडे पाहिले. हिजाब घेतल्यावर तो आपल्याला हसेल का? त्याला बरे यातले काही करावे लागणार नाही. आपण मारे स्त्री मुक्तीच्या गोष्टी सांगतो आणि आता? एकूणच हिजाब डोक्यावर बसणारच असला तरी तो मनी काही उतरेना! पण देशाटनाचा आनंद घ्यायचा तर तो माथी मारून घ्यावाच लागणार होता याची खूणगाठ मारून घेतली व तयारीला लागले. कमीत कमी कोपराखाली बाह्या, गुडघ्याच्या खालपर्यंत कुर्ता व डोके झाकले जाईल इतकी ओढणी या नियमांचा अभ्यास केला. गुगलवर संशोधन केले. पण नेमके कसे कपडे असले पाहिजे हे ठरवणे कठीणच झाले. कारण एकदम काळ्या कपड्यांत पायापासून ते डोक्यापर्यंत आच्छादलेली इराणी स्त्री होती तशीच सूट, लेगिन्स, जीन्स घातलेली पण डोके झाकलेली तरुणीही चित्रात होती. ते कपडे पाहून हायसेही वाटले पण गोंधळ काही कमी झाला नाही. तिकडे जाऊन समजा जीन्स, लेगिन्स नाहीच चालले तर फजिती नको हा विचार प्रबल ठरून शेवटी अगदी आज्ञाधारकपणे ठेवणीतले सलवार कुर्ते बरोबर घेतले.

अकरावीत गेल्यावर प्रथमच सलवार कुर्ता घेण्याचे ठरवले तर घरीदारी तो मुस्लिम पेहराव म्हणून केवढा विरोध झाला होता. आपण एकतर्फीच सलवार कुरता हा मुस्लिम पेहराव म्हणून घोषित केले आहे व आता तर तो अखिल भारतीय पेहराव झाला आहे. तेहरानमध्ये फिरताना कोणाही स्त्रीच्या अंगावर सलवार कुरता वा तत्सम ड्रेस दिसला नाही. उलट माझ्या पेहरावाकडे नवलाने पाहिले जायचे. हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. असो. एकदा 'अग्नीमंदिर' या स्थळाला भेट दिली तिथे एक मध्यमवयीन स्त्री मला भेटली. हसून मला बोलली, 'व्हेरी गुड ड्रेस..' आणि चक्क माझ्या गालाची एक छान पप्पी घेतली. मला इतके भारी व छान वाटले. आयुष्यात प्रथमच कोणीतरी इतकी छान दाद मला दिली होती. त्या स्त्रीचे ते पप्पी घेणे इतके अनपेक्षित व इतके सहज होते की मी भारावूनच गेले. काही न सुचल्याने मी तिच्या हातांची पप्पी घेतली. खरेतर मलाही तिच्या गालांची पप्पी घ्यायची होती पण काय नेमके आडवे आले ते कळत नाही. कदाचित इतका मोकळेपणा व अकृत्रिमता ही इराणी स्त्रीची स्वाभाविकता आहे हे नंतर अनुभवांती मला जाणवत गेले. कारण चांगल्या गोष्टींना

इराण विद्यापीठातील विद्यार्थिनी

विद्यापीठात अध्यापन करणारी प्रोफेसर.

त्वरित दाद देणे, 'इंडियन' म्हणून कौतुकाने विचारणे व 'हो' असे उत्तर मिळाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर इतका आनंद फुलायचा की नैसर्गिक आनंद व मोकळेपणा यांचा दाखलाच अनुभवायला मिळायचा. अनेक वेळा येथील स्त्रियांनी आमच्यातील अनेकांबरोबर फोटोही काढून घेतले. स्त्रीतील नैसर्गिक ऋजुता, आनंदी भावना व साहचर्य भाव प्रथमच खऱ्या अर्थाने मला इराणी स्त्री मध्येच अनुभवायला मिळाला.

स्त्री हिजाबमध्ये बद्ध केली गेली तरी तिच्या नैसर्गिक, मूलभूत प्रवृत्ती या कोणी बद्ध करू शकत नाहीत हा धडा या स्त्रियांकडून शिकावा. वरवर शांत, सोशिक दिसणारी ही स्त्री आतून अतिशय संवेदनशील आहे. वरवर ती राज्य, सत्ता, धर्म... इत्यादी बाबींपुढे झुकलेली दिसत असली तरी ती या सर्व गोष्टींपासून अनभिज्ञ नक्कीच नाही. ती परिस्थिती जोखते आहे. येथे सर्व काही फिल्टर होऊनच बाहेर पडतेय याची सावधानता तिच्यापाशी आहे. पण आतून एक खदखदही आहे. यांच्यातीलच काही पेटून उठल्या, आत्मबलिदानही केले, क्रूर छळ सहन केलाय, तुरुंगात गेल्या

अंक मिळाला नाही का?



'मिळून साऱ्याजणी'चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ तारखेला पोस्टाने रवाना होतो. जर वर्गणीदारांना दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत अंक मिळाला नाही तर त्यांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी १२ ते ५ या वेळात 'मिळून साऱ्याजणी'च्या **८००७८१४००५** या मोबाईल क्रमांकावर SMS करून आपली तक्रार द्यावी. म्हणजे आम्हाला आपला अंक परत पाठवता येईल.

याची खूणगाठ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उभरून आलेली यांच्या बोलण्यातून, देहबोलीतून सूक्ष्मतेने जाणवते. कमी प्रमाणात व वयस्क इराणी स्त्रियाच पूर्ण काळ्या व बंद पेहरावात दिसतात. तरुण मुली, स्त्रिया यांचे कपडे रंगीत, सूट, लेगिन्स, जीन्स टाईप पँन्ट इत्यादी व डोक्यावर स्कार्फ, ओढणी अशा कपड्यांत सर्रास दिसत असल्या तरी शासकीय नोकरी, सार्वजनिक ठिकाणची नोकरी येथे मात्र काळ्या रंगाचे गळ्यापर्यंत काळ्याच स्कार्फने डोके पूर्ण झाकलेले अशाच पेहरावात असतात. व ते तसे बंधनकारक आहे. म्हणूनच विद्यापीठात प्राध्यापक पदावर असणारी प्राध्यापिका याच काळ्या पेहरावात दिसते. म्हणजे शासकीय फायदे हवे असतील तर शासकीय नियमही बंधनकारक जे मुस्लिम प्रजासत्ताक गणराज्यानुसार आहेत.

तज्ज्ञांच्या मतानुसार कुराणमध्ये कुठेही हिजाबबद्दल लिहिलेले नाही, तर केवळ डोके झाकण्यासाठी सांगितलेले आहे. अनेक धर्मांत शालीनता दर्शवण्यासाठी स्त्रिया डोक्यावर पदर, शाल, शेला, ओढणी, दुपट्टा आदी घेतात. इराणमध्ये पूर्वी पुरुष व नवरा युद्धावर जाताना त्याला निरोप देताना डोक्यावर दुपट्टा सदृश वस्त्र घेत. इराणमधील पारंपरिक वेशभूषा अभ्यासली तर डोक्यावर केवळ दुपट्टा दिसतो. इराणमधील पुढील काही छायाचित्रे पाहिली, पारंपारिक वेशभूषा पाहिल्या तर डोक्यावर केवळ दुपट्टा दिसतो जो डोके झाकतो. कपडेही रंगबेरंगी दिसून येतात. आता प्रत्यक्षात मात्र काळे कपडे जास्त दिसतात. हिजाबसाठी सुद्धा सफेद, करडा, नेव्ही ब्लू असेच रंग चालतात. लाल रंगासारखे चमकदार रंगांचे कपडे, रंगबेरंगी कपडे वापरले जात नाहीत. प्रेषितांचा आवडता रंग मात्र गुलाबी होता, हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.

आज इराणमध्ये हिजाबकडे मुस्लिम स्त्रीची धर्मपरायणता, सन्मान याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. मुस्लिमांनी उमर राजवटीत (६३७ ई.) इराणवर विजय प्राप्त केल्यावर त्या देशातील लोकांचे धर्मांतर घडवून आणले त्याचबरोबर हिजाबसारखे रिवाजही घेतले. तरीसुद्धा सोळाव्या शतकात सफवी राजवट, कजर राजवट इत्यादी कालखंडात हिजाब हा अनिवार्य नव्हता तर तो स्वेच्छेने वा प्रचलित फॅशन म्हणून धारण केला जायचा. या काळातील हिजाब हा नेहमी रंगीत, फॅशनेबल पद्धतीचा असायचा. आधी आधी तो मोती, पिसे, फुले यांनीही सजवला जायचा. यावर युरोपीय शैलीचाही प्रभाव पुढील काळात पडत गेला. पुढे कजर राजवंशाच्या काळात देशाला अंतर्गत व बाहेरील संकटांचा सामना करावा लागला. परिणाम स्वरुप याच काळात इराणी महिलेच्या वाट्याला अनेक भूमिका आल्या जसे सामाजिक, राजकीय आंदोलनांत भाग घेणे, महिला संगठन इत्यादी. बीबी खानम अस्तराबादी, तुबा अजमुदे आणि सेदिकेह दोलताबादी यासारख्या स्त्रियांनी तर स्त्री हक्क, शिक्षण यासाठी वकिली सुद्धा केली. परंतु याच कजर राजवटीच्या काळात आर्थिक संकट काळात ज्या शहरी, धार्मिक परंतु गरीब स्त्रिया डोक्यावर घेण्यासाठी स्कार्फ खरेदी करू शकत नव्हत्या त्यामुळे त्या घरातच राहणे पसंत करू लागल्या किंवा त्या चादर वा ओढणी वापरू लागल्या. येथपर्यंत हिजाब परिधानतेमध्ये बरीच लवचिकता दिसून येते. इस्लामी क्रांतीपूर्व काळात व मधल्या काळात म्हणजे १९व्या शतकाच्या पूर्वार्धात इराणी महिला यासुद्धा वैज्ञानिक, कलाकार, लेखक म्हणून नावाजलेल्या होत्या. इराण विश्वविद्यालयात बहुसंख्येने महिला शिक्षण घेत होत्या. अजर अनदामी ही स्त्री वैज्ञानिक होती. तिने कॉलरा या रोगावर वॅक्सिन शोधून काढण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९१३ मध्ये जन्मलेली शैबानी ही इराणमधील पहिली महिला सर्जन होती. इस्लामिक क्रांतीनंतरच्या काळातही निलोफर बयानी ही जैव संरक्षक जीवशास्त्रज्ञ होती. इस्लामिक सरकारने तिला जेलमध्ये टाकले होते. ही यादी बरीच मोठी आहे. इराणमध्ये फिरत असताना एक गोष्ट मात्र प्रकर्षाने दिसून आली ती म्हणजे हॉटेल्स व रेस्टॉरंटसमध्ये मोठ्या प्रमाणावर स्त्रिया व मुली काम करताना दिसतात. एका हॉटेलमध्ये तर एक वेट्रेस मुलगी दर पाच मिनिटांनी तिसऱ्या मजल्यावर असलेल्या किचनमधून डिशेस घेऊन पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर सातत्याने चढउतार करत होती. सरासरी आठ तास वेळ धरला तर ती आठ तासात किती वेळा खालीवर जातयेत असेल...तिच्या कष्टांना तोड नव्हती. एअर होस्टेस म्हणूनही इराणी स्त्री कार्यरत आहे. एकूणच सेवा क्षेत्रात इराणी स्त्री असण्याची इतरही अनेक कारणे असतील पण नाईलाजाने का होईना स्त्रीने कष्टाच्या व सेवा क्षेत्रात काम केलेले जगात सर्वत्रच चालते मात्र इतर वेळेस मान, मर्यादा, इज्जत, धर्म या गोष्टींनी तिच्यावर सामाजिक व तत्सम निर्बंध सक्तीने लादले जातात. इराणमध्ये स्त्रियांनी चारचाकी गाडी चालवलेली चालते. मात्र दोन चाकी गाडी चालवायला मात्र तिला कायद्यानेच बंदी आहे! यावरून आठवले की महाराष्ट्रातही अनेक स्त्रिया डोक्यावर साडीचा पदर घेऊन दोन चाकी गाडी चालवताना दिसतात. कदाचित ते सक्तीचे वा ऐच्छिक असेल पण या मागील समाज व कुटुंब यांची मानसिकता किती हीन व बुरसटलेली आहे हेच स्पष्ट होते. इराणी मुस्लिम गणराज्य व भारतीय प्रजासत्ताक गणराज्य यात काय फरक राहिला? कदाचित हिजाब बंद होण्यासाठी इराणी स्त्रीला जी किंमत मोजावी लागतेय ती भारतीय स्त्रीला मोजावी लागलेली नाही, म्हणून तर त्या मागे किती पुरुषप्रधान मानसिकता दडलेली आहे हे समजत नाही?

सुलभा पाटील,
निवृत्त प्राध्यापक, संगमनेर, जि.अहिल्यानगर
मोबा.९९७५७८९१०७/ sulbhapatil63@gmail.com

माध्यमांतर... / गट्टी शब्दांची

फुले माळणे

डॉ. नीलिमा गुंडी

मुलांनो, मराठी भाषेच्या स्वतःच्या अशा काही लकबी आहेत. उदा. जोडीने येणारे दोन शब्द, क्रियापद तेच पण जोडीला शब्द बदलला की बदलणारा अर्थ. तुमची शब्दांशी गट्टी जमावी म्हणून या सदरात तुम्हांला या लकबींची ओळख करून दिली आहे. भाषेतल्या अशा गमती कळल्या की, तुम्हाला भाषा आत्मविश्वासाने वापरणे सहज जमेल!

आई आणि अक्षरा मंडईत खरेदीला गेल्या होत्या. अक्षराला गोष्टींची पुस्तके हवी होती. पुस्तकांच्या दुकानाबाहेर एक बाई फुलं विकत होत्या. त्यांच्या टोपलीत मोगऱ्याचे गजरे होते, चाफ्याची फुले होती आणि सुरंगीच्या फुलांचे गजरेही होते. त्या लोकांचे लक्ष वेधून घ्यायला हाका मारत होत्या. "अहो ताई, या की! फुले माळा की डोक्यात! ताजी फुलं आहेत!"

ते ऐकून अक्षराच्या आईने त्यांच्याकडून चाफ्याची फुलं आणि सुरंगीच्या फुलांचा गजरा बांधून घेतला. घरी गेल्यावर अक्षराचे प्रश्न सुरू झाले, "आई, त्या बाई काय म्हणत होत्या? फुलं माळा डोक्यात! फुलांची माळ करतात, त्याला गजरा म्हणतात ना! 'झेंडूची माळ' असं मी ऐकलंय, पण ती माळ कोणी डोक्यात नाही घालत! हो ना?"

त्यावर आई म्हणाली, "तुझा प्रश्न बरोबर आहे. अग माळ म्हणजे फुलांचा हार. मण्यांचीही माळ करतात. फुले माळणे हा प्रकार वेगळा आहे, बरं का! फुले माळणे म्हणजे फुले डोक्यात घालणे. आपण कपडे घालतो, साडी नेसतो, बांगड्या भरतो... म्हणजे प्रत्येक वेळी वेगळा शब्द वापरतो! तसंच फुलं माळण्याची पद्धत आहे. काही लोकं फुलं देवाला वाहतात, काही जण फुलांची रांगोळी काढतात. काही जण फुलांचं तोरण करतात. स्वतःच्या केसांमध्ये शोभेसाठी फुले घालणे म्हणजे फुले माळणे, बरे का!

"अग आई, आपल्या आजीच्या प्रत्येक फोटोत डोक्यात फूल असतेच ग!" अक्षरा म्हणाली.

"हो! तिला फुलांची आवड होती. तिनं मागीलदारी अंगणात फुलझाडं लावली होती." आई म्हणाली.

"आठवतंय मला! प्राजक्ताच्या झाडाची फुलं वेचायला मी तिच्याबरोबर जायचे, ती फुलं डोक्यात नाही माळता येत!" अक्षरा सांगू लागली. त्यावर आई म्हणाली, "बरोबर आहे तुझं! सुगंधी, खूप वेळ टिकणारी फुलं डोक्यात माळण्याची पद्धत आहे."

"आई, मला हा शब्द माहीतच नव्हता! तू तो नव्या फुलांचा गजरा... काय बरं नाव आहे त्या फुलांचं? हं! आठवलं! सुरंगीच्या फुलांचा रंग आणि वास किती छान आहे. मी त्यातला एक गजरा आमच्या शाळेतल्या बाईंना देऊ का?" यावर आईने आनंदाने मान डोलावली आणि ती म्हणाली, "अग, वेगवेगळ्या ऋतूत वेगवेगळी फुलं येत असतात. फुलं डोक्यात माळली की यांचा आनंद मिळतो. त्यातून आपली नि फुलांची जणू मैत्री होतो! कळलं का अक्षरा? कोणत्या ऋतूत कोणती फुले येतात, ते शोध पाहू!"

यावर अक्षरा पटकन म्हणाली, "आई, आता तू माझे केस कापू नकोस हं! म्हणजे मला पण फुलं माळता येतील!!"

तिच्या त्या लाडिक प्रश्नाला उत्तर देताना आई हसून म्हणाली, "अग अक्षरा, खुशाल केस वाढव! माझी काहीच हरकत नाही हो! मात्र एक लक्षात ठेव, रोज केस नीट विंचरावे लागतील!"

"होSS" म्हणत अक्षरा सुरंगीचा गजरा शाळेतल्या बाईंना देण्यासाठी बांधून घ्यायला पळाली सुद्धा!

(साभार स्नोवेल)

डॉ. नीलिमा गुंडी, पुणे
संपर्क: ०२० २४४८६०१५

पुढील अंकात

- विद्या बाळ अध्यासन प्रकल्प २ : स्त्री चळवळ : धुक्याच्या वाटेतून विस्तारलेले क्षितिज - मेधा टेंगशे
- बहुजन, दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त व अल्पसंख्य महिलांचे स्त्री चळवळीतील योगदान - लता प्र. म.
- स्त्री लिखित समीक्षेचा मागोवा - सुजाता शेणई
- स्त्री प्रश्न, जात वास्तव आणि समकालीन राजकारण - वंदना सोनाळकर
- कन्नड मुस्लिम स्त्रियांचं भावविश्व - अविनाश कोल्हे
- आणखी बरंच काही ...

तज्ज्ञ प्रणालींचा उदय आणि त्या घडवणाऱ्या महिला (१९८५-१९९५) (भाग २)

चिन्मय गवाणकर

चिन्मय गवाणकर हे जागतिक व्यवसाय सल्लागार संस्था अर्न्स्ट अँड यंगचे भागीदार आहेत. त्यांना क्लाउड, बिग डेटा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ॲडव्हान्स ॲनालीटीक्स या क्षेत्रात मोठ्या उद्योगांना तसंच देशभरातील उदयोन्मुख व्यवसायांना सल्ला देण्याचा २४ वर्षांहून अधिक काळ वैविध्यपूर्ण अनुभव आहे. सध्या त्यांनी वेगानं बदलत असलेलं कृत्रिम बुद्धिमत्तेचं क्षेत्र सोप्या शब्दात मराठीमध्ये समजावून देण्याचं व्रत घेतलं आहे. आजही पुरुषप्रधान असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या जगात अज्ञात राहिलेल्या या क्षेत्रातल्या महिला संशोधकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अभ्यासकानं घेतलेला धांडोळा या लेखमालेतून भेटीला येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी १९८० च्या दशकाचा काळ हा एक महत्त्वाचा टप्पा होता. १९८० ते अगदी साधारण १९९५ पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राने एक मंदीचा काळ अनुभवला, ज्याला 'एआय विंटर' (AI Winter) असे म्हटले जाते. तज्ज्ञ प्रणालींकडून असलेल्या जास्त अपेक्षा आणि त्या पूर्ण न झाल्यामुळे गुंतवणुकीत घट झाली. अनेक कंपन्यांनी त्यांचे एआय विभाग बंद केले आणि संशोधनाला पुरेसा निधी मिळाला नाही. या कठीण काळातही महिला संशोधकांनी आपले कार्य सुरू ठेवले. जरी निधी आणि संधी कमी झाल्या होत्या, तरी त्यांनी एआयच्या मूलभूत संशोधनात आणि विकासात योगदान दिले.

वैज्ञानिकांनी अशा प्रणाली विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले होते, ज्या मानवाप्रमाणे विचार करून निर्णय घेऊ शकतील. या प्रयत्नांमध्ये तज्ज्ञ प्रणाली (Expert Systems) विशेष प्रभावी ठरल्या. तज्ज्ञ प्रणाली म्हणजे काय? या प्रणालींमध्ये विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञांचे ज्ञान 'जर-तर' (if-then) नियमांच्या स्वरूपात साठवले जाते. यामुळे, सामान्य माणसे देखील क्लिष्ट समस्यांवर तज्ज्ञांसारखा सल्ला घेऊ शकत होती. या प्रणालींमध्ये पारंपरिक प्रोग्रामिंगऐवजी ज्ञानावर आधारित दृष्टिकोन वापरला जात होता. तज्ज्ञांकडून मिळवलेले नियम आणि माहिती यांचा वापर करून या प्रणाली समस्यांचे निराकरण करत होत्या, जणू काही एखादा अनुभवी सल्लागारच मार्गदर्शन करत आहे.

१९८० च्या दशकात अशी या क्षेत्रात सार्वत्रिक मरगळ असून सुद्धा या तज्ज्ञ प्रणालींचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. अनेक विद्यापीठांमध्ये तज्ज्ञ प्रणालीचे अभ्यासक्रम सुरू झाले आणि 'फॉर्च्यून ५००' कंपन्यांपैकी दोन-तृतीयांश कंपन्यांनी त्यांचा वापर दैनंदिन व्यवसायात सुरू केला. बँका, वित्तसंस्था, उत्पादन कंपन्या अशा विविध क्षेत्रांमध्ये या प्रणालींचा उपयोग होऊ लागला, ज्यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक जलद आणि कार्यक्षम झाली. याच काळात जपानने 'फिफ्थ जनरेशन कॉम्प्युटर सिस्टीम' प्रकल्पात मोठी गुंतवणूक केली, ज्यामुळे जगभरात या तंत्रज्ञानाकडे लक्ष वेधले गेले. युरोपमध्येही यावर मोठ्या प्रमाणात संशोधन सुरू झाले. तज्ज्ञ प्रणालींचा उदय हा केवळ तांत्रिक प्रगती नव्हती, तर मानवी ज्ञानाला संगणकात उतरवण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न होता, ज्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये कार्यक्षमता वाढवण्यास मदत झाली. पण हे सगळे सुरू असताना कृत्रिम बुद्धिमतेचा वापर जबाबदारीने आणि नैतिकतेने करायला हवा याचा विचार केला एका महिला शास्त्रज्ञाने! तिचे नाव डॉ. इलेन रिच!

डॉ. इलेन रिच या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव आहेत. डॉ. इलेन रिच यांचा जन्म १७ फेब्रुवारी १९२८ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील ब्रुकलिन येथे झाला. त्यांचे वडील रॉबर्ट पीटर रिच हे उपयोजित गणितज्ज्ञ होते. इलेन यांचे सुरुवातीचे जीवन आणि शिक्षण अमेरिकेतच झाले. त्यांनी १९७२ मध्ये ब्राउन विद्यापिठातून भाषाशास्त्र आणि उपयोजित गणितामध्ये मॅग्ना कम लॉड पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९७९ मध्ये कार्नेगी मेलन विद्यापिठातून त्यांनी कॉम्प्युटर सायन्समध्ये पी.एचडी. पूर्ण केली. १९८३ मध्ये त्यांनी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स: अ मॉडर्न अप्रोच' हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक केवळ एआयच्या मूलभूत संकल्पनांवर आधारित नव्हते, तर त्यात एआयच्या नैतिक पैलूंचाही समावेश करण्यात आला होता. रिच यांचे हे पुस्तक एआयच्या

अभ्यासक्रमासाठी एक आधारस्तंभ ठरले. त्यांनी मानवी-मशीन संवाद (human-machine interfaces) आणि ज्ञान-आधारित प्रणालींवर (knowledge-based systems) विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांचे संशोधन व्यक्तीनुसार माहिती प्रणाली कशा बदलता येतील यावर आधारित होते. १९९१ मध्ये केविन नाईट यांच्यासोबत त्यांनी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली, जी जगभरातील विद्यार्थ्यांना एआय शिकण्यासाठी उपयुक्त ठरली. डॉ. रिच यांनी त्यांच्या पुस्तकातून एआयच्या नैतिक विचारांना महत्त्व देऊन हे स्पष्ट केले की तंत्रज्ञानाचा विकास मानवी मूल्यांच्या आणि जबाबदारीच्या आधारावर व्हायला हवा.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे असे संशोधन सुरू असताना जर आपल्याला कम्प्युटर्स हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवायचे असतील तर कुठलीही प्रोग्रामिंग लँग्वेज न वापरता आपल्याला कम्प्युटरशी आपल्या माणसांच्या भाषेत कसं बरं बोलता येईल या विषयातील संशोधन सुद्धा जगभर सुरू होते. यालाच नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग म्हणजे नैसर्गिक भाषा प्रक्रिया असे म्हणतात. आज आपण आपल्या मोबाईल फोनमध्ये बोलून सर्च करतो किंवा गुगल असिस्टंट, आयफोनची सिरी असे व्हॉइस एजंट वापरतो या व्हॉइस एजंट मागे बऱ्याच संशोधकांनी या क्षेत्रात इतकी वर्ष केलेले अथक परिश्रम आणि संशोधन आहे. या क्षेत्रामध्ये सुद्धा बऱ्याच महिला संशोधक आघाडीवर होत्या आणि त्यामधलीच एक संशोधक आहेत : डॉ. बारबरा ग्रॉझ.

डॉ. ग्रॉझ यांचा जन्म २१ जुलै १९४८ रोजी अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथे झाला. त्यांनी १९६९ मध्ये कॉर्नेल विद्यापीठातून गणितात पदवी आणि १९७१ व १९७७ मध्ये कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कली येथून संगणक विज्ञानात पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. डॉ. ग्रॉझ यांनी नैसर्गिक भाषा प्रक्रिया (NLP) आणि मल्टी-एजेंट सिस्टीम (MAS) यावर महत्त्वपूर्ण संशोधन केलेले आहे. त्यांनी संगणक-आधारित एजंट प्रणालींना बुद्धिमान आणि उपयुक्त टीम सदस्य म्हणून विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, जे अनिश्चित आणि गतिशील वातावरणात दीर्घकाळ प्रभावीपणे कार्य करू शकतील. त्यांच्या योगदानात नैसर्गिक भाषेतील संवादाचे पहिले संगणकीय सिद्धांत विकसित करणे आणि मल्टी-एजेंट सहकार्याच्या सिद्धांतांचा समावेश आहे, ज्याचा उपयोग मानवी-संगणक संवादात होतो. त्यांनी संवादाच्या संरचनेचा सिद्धांत विकसित केला, जो संवादकर्त्याच्या हेतू, लक्ष देण्याची स्थिती आणि भाषिक स्वरूप यांच्यातील परस्पर संवादावर आधारित आहे. त्यांच्या संशोधन गटाने आरोग्य सेवा समन्वय आणि विज्ञान शिक्षणात सुधारणा करण्यासाठी या मॉडेलचा उपयोग केला आहे. डॉ. ग्रॉझ यांनी स्टॅनफोर्ड सेंटर फॉर द स्टडी ऑफ लँग्वेज अँड इन्फॉर्मेशन आणि हार्वर्डचे एम्बेडेड एथिक्स प्रोग्राम यांच्या सह-संस्थापक म्हणूनही काम केले आहे.

सुष्मिता मित्रा

१९९३ मध्ये त्या असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AAAI) च्या पहिल्या महिला अध्यक्षा बनल्या. त्यांच्या नेतृत्वाखालील कार्यामुळे आज कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास अधिक मानवी आणि सहयोगी बनला आहे.

हे सर्व सुरू असताना भारतात मात्र नुकतीच संगणक क्षेत्राची पहाट होत होती आणि काही हुशार विद्यार्थिनी आपले शिक्षण पूर्ण करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात आपले योगदान देण्यासाठी तयार होत होत्या. डॉ. सुष्मिता मित्रा या त्यापैकीच एक संशोधक! त्यांचा जन्म १९६३ साली कोलकाता येथील बेथुन कॉलेजमधील वनस्पतिशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. माया मित्रा आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेतील (ICAR) वैज्ञानिक डॉ. गिरींद्र नाथ मित्रा यांच्या घरी झाला. सुष्मिता यांच्या पालकांना 'नेचर' या प्रतिष्ठित शोधपत्रिकेत आपले शोधनिबंध प्रकाशित करण्याचा मान मिळाला. त्यांनीच सुष्मिताला मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली. सुष्मिता यांनी त्यांचे शिक्षण आयएससी कलकत्ता गर्ल्स हायस्कूलमधून आणि आयसीएसई ऑक्सिलियम कॉन्व्हेंट स्कूलमधून पूर्ण केले. शालेय शिक्षण घेत असताना, त्यांना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेची (NCERT) राष्ट्रीय प्रतिभा शोध शिष्यवृत्ती देखील मिळाली. त्यानंतर, त्यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र विषयात ऑनर्सची पदवी घेतली. पुढे, त्यांनी राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात, संगणक विज्ञान विषयात बी.टेक.साठी प्रवेश मिळवला. त्यांनी त्यांच्या पदवी अभ्यासक्रमात प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर कोलकाता विद्यापीठाच्या विज्ञान कॉलेज कॅम्पसमध्ये त्यांनी एम.टेक. पूर्ण केले. एम.टेक. नंतर, त्यांनी भारतीय सांख्यिकी संस्थेत (Indian Statistical Institute) डॉ. शंकर के. पाल यांच्या मार्गदर्शनाखाली पॅटर्न रेकग्निशन या विषयावर प्रकल्प साहाय्यक म्हणून काम केले. १९८९ मध्ये, न्यूरो-फझी पॅटर्न रेकग्निशनमध्ये पी.एचडी. करण्यासाठी सीएसआयआर (CSIR) वरिष्ठ संशोधन फेलोशिप मिळाली.

त्यांनी त्यांच्या प्रकाशनावर आधारित 'न्यूरो फझी पॅटर्न रेकग्निशन: मेथड्स इन सॉफ्ट कॉम्प्युटिंग' हे पुस्तक लिहिले, त्यांच्या संशोधनातून अनेक फेलोशिप्स मिळाल्या - ज्यात आयईईई (IEEE), इंडियन नॅशनल सायन्स अकादमी (INSA), इंटरनॅशनल असोसिएशन फॉर पॅटर्न रेकग्निशन (IAPR), इंडियन अकादमी ऑफ सायन्सेस (IASc), **(पान ३९ वर)**

कथा

असूया

अंजली बुटले

"सांग ना आई, सांग ना... आज आपल्याच घरचे लाईट का गेले? सगळ्यांकडे आहे, आपल्याकडेच का नाही?"

आईला सारखे सारखे तेच प्रश्न विचारून भंडावून सोडले!

आई जवळ काही उत्तर नव्हते. "बघू काय झाले ते", असं म्हणून ती मुलांना शांत करत होती! पण तिलाही काही कळले नाही.

संध्याकाळची वेळ, लहान मोठे एकमेकांच्या घरी तीळगूळ वाटायला जात होते, 'तीळगूळ घ्या गोड गोड बोला' असे म्हणत होते. छान आनंदी वातावरण होते!

अंधार असल्यामुळे मेणबत्ती, देवाजवळ दिवा लावून थोडा प्रकाश घरात आईने तयार केला! घरी तीळगूळ देण्यास कोणी आले की पहिला प्रश्न लाईट नाही, काय झाले वगैरे प्रश्न विचारले जात होते. आई आपली प्रत्येकाला हसून, "येईल आता." असे सांगत शांत होती, बाबाही घरी नव्हते त्यामुळे तिलाच सर्वांच्या प्रश्नांना उत्तरं द्यावी लागत होती.

जसा जसा वेळ जात होता, तसे तिलाही काळजी वाटत होती.

आम्ही जवळच्या शेजाऱ्यांकडे जाऊन तीळगूळ देत होतो-घेत होतो. पण एका घरातून दुसऱ्या घरात जाताना आपल्या घराकडे पाहत लक्ष ठेवत होतो, वाट पाहत होतो लाईट येण्याची. सगळ्यांकडे आहे आपल्याच घरी नाही, का? असं सारखं मनात येत होतं. हळूहळू तीळगूळ वाटण्याचा आनंद घेता येणं बंद झालं. घरी आईसोबत थांबले! बघू का काय झाले असेल ते, मिटरचा खटका पडला का वगैरे.

थोड्या वेळाने बाबा घरी आले, "आपल्या घरचे लाईट नाही, का नाही, बिल तर भरले होते." वगैरे प्रश्न आता बाबांना विचारले. ते पण काही माहीत नाही, सकाळी लाईटमॅनला बोलवू म्हटले.

रात्री अंधारातच, मेणबत्तीच्या प्रकाशात जेवण करून झोपलो. सकाळी उठल्यावर लक्षात आले, घरातील नळालापण पाणी नाही. शेजारी आहे आपल्याकडेच नाही.

काय झाले? काही कळत नव्हते.

आंघोळीला बुट्टी, पाणी रोज येत असल्यामुळे खूप पाणी भरून ठेवले जात नव्हते. घरात सात आठ जण, शेजारच्या बाईंनी (बाई म्हणणे आदरार्थी आहे) पाणी दिले, "जेवायला पण आमच्याकडेच या", म्हणाल्या, काकापण काळजीने काय झाले पाहण्यास बाबांना मदत करत होते.

ते पण आमच्यासारखेच भाडेकरू होते, त्यांचे घरमालक त्यांच्या वरच्या घरात राहात होते. आमचे घरमालक दुसऱ्या गावाला राहात होते व त्यांचे एक नातेवाईक आम्ही राहात होतो त्याच्या वरच्या घरात राहात होते. तेच घरमालकासारखे वागत होते. आम्ही घराचे भाडे त्यांच्याचकडे देत होतो.

दिवस पण निघून गेला, रात्र झाली तरी लाईट नाही की पाणी नाही घरी.

आई बाबा हळू आवाजात बोलत होते एकमेकांशी, त्यांच्याकडे बघतले तर ते काळजीत वाटत होते. घरात आम्ही सगळेच लहान होतो. शाळेच्या परीक्षेची वेळ होती!

बाहेर शेजारच्या मित्र मैत्रिणीपण खेळताना, "लाईट आले का? पाणी आले का?" विचारत होते, मग आपापसात कानात काहीतरी बोलून हासत होते. त्यांचा पण खूप राग येत होता; मग एकटीच काहीतर स्वतःच खेळत राहण्याचा प्रयत्न करत होते. लहान असले म्हणून काय झाले काहीतरी वेगळं झालंय हे समजत होतं!

मग कळले की आमच्या घरमालकाने आमचे लाईट व पाणी कपात केली. कायद्याने ते तसे करू शकत नव्हते, पण केले होते. घरभाडे व्यवस्थित देत होतो तरी. घरमालकाशी भांडण्यात काहीच अर्थ नव्हता, "कापले आम्ही तुमचे लाईट, पाणी काय करणार?" वगैरे उलटे बोल चालूच, कायद्याबाहेर जाऊन काहीच करता येणार नव्हते!

सरकारी सेवेत असल्यामुळे बाबांना पण घर सोडणं शक्य नव्हते. ऑफिसच्या लोकांनी मदत केली, सल्ला दिला घरमालकाविरोधात कोर्टात जायचे. केस करायची.

तो पर्यंत आमचा अभ्यास पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात चालू होता, संध्याकाळी आम्ही भावंडं पेट्रोमॅक्स भोवती बसून लवकर आपला शाळेचा अभ्यास संपवत असू.

पाणी भरण्यासाठी एक टाकं बांधले बाथरूममध्ये, पाणी भरण्यासाठी एक भैय्या यायचा; जवळच्या एका सार्वजनिक नळावरून पाणी आणून द्यायचा. कावडीसारखे एका बांबूला दोन दोन डब्बे दोन बाजूला बांधले जायचे व खांद्यावर ती कावड घेऊन पाणी भरायचे.

शेजारी बाई राहायच्या त्या आईला खूप धीर द्यायच्या, आम्हाला त्यांच्या घरी बोलवत. पण काही दिवसातच त्यांच्या घरमालकाने त्यांना घर खाली करायला सांगितले. आमचा चांगला शेजार पण आम्हाल सोडून गेला!

आमच्या ओळखीच्या काका काकूंचे एक नातेवाईक वकील

होते, तेच वकील ओळखीचे म्हणून बाबांनी केले.

कोर्टात तारीख असेल तरी आमचा घरमालक कोर्टात हजर राहात नसे! बघता बघता एक दोन वर्ष निघून गेले. तरी केस चालूच होती.

आम्ही केस मागे घ्यावी म्हणून आमच्या वर राहाणारे घरमालकाचे नातेवाईक त्रास देत, उगाच वरच्या खिडकीतून घाण कचरा टाकणे, वरती घरी जातांना आमचं दार वाजवणे, कधी बाहेरून कडी लावणे! खेळत असताना भांडण करणे.

बाबा दौऱ्यावर असलेतरी आई आम्हाला धीर देत असे, "उलट बोलू नका, भांडू नका वगैरे!"

आईबाबांचे शेजारी असणाऱ्यांशी सलोख्याचे संबंध, बाबांची सरकारी नोकरी, त्यांचा समाजात असलेला मान ह्यामुळे आमच्या घरमालकाचे नातेवाईक दुखावले होते. असूया निर्माण झाली होती, सगळे ह्यांनाच मान देतात, आम्हाला नाही हे कारण समोर आले आमचे लाईट पाणी बंद करण्याचे!

केस कोर्टात चालूच होती, ते त्यांना काही पचले नाही. स्वतःला काय समजता? सण वगैरे असेल तर भांडण करायचं, कारण काही असो वा नसो हे आमच्या वर राहणाऱ्या शेजारच्यांचे ठरलेलेच असायचे!

आमदारांचा वशिला लावून त्यांनी बाबांच्या बदलीचे प्रयत्न केले, बदली झाली. नवीन गावात आम्ही आलो तरी केस चालूच होती, घरात थोडे सामान ठेवून घर बंद होते.

काही दिवसांनी असे कळले की आमचा वकील फितुर झाला, घराचे कुलूप तोडून त्यांनी घराचा ताबा घेतला!

केस आम्ही हरलो की बंद केली काही कळले नाही, पण घरात या विषयावर बोलणे बंद केले गेले!

बोलणं त्या विषयावरचे बंद असले तरी, 'तीळगूळ घ्या गोड गोड बोला', म्हणताना, भाड्याचे घर म्हटले की, डोळ्यासमोर ते अंधारलेले दिवस म्हणा की कॅन्डल लाईट डिनर, अभ्यासाचा घेतलेला आनंद तरळून जातो!

असूया मनाला स्पर्श करून गेली की माणूस कोणत्या थराला जाईल हे सांगता येत नाही.

करोनाकाळात भाडेकरूंना भाडे भरता आले नाही तर त्यांचे वीज, पाणी कपात करता येणार नाही असा कायदा आहे हे बातम्यांमध्ये एकले. मनात परत तो विषय पिंगा घालू लागला. काही चूक नसताना अंधारलेले दिवस लाईट, पाणी कपातीचा प्रसंग ४०-४५ वर्षांपूर्वी व्यथित करावा लागला.

परत ओपन करता येईल का ती केस?

असूयेचा बळी ठरलो त्याची नुकसान भरपाई मिळेल का?

की असूयेचे नवीन चक्र चालू होणार?

अंजली बुटले, *नाशिक*
anj_butley@yahoo.com

प्रोफेसर जयंत नारळीकर (१९३८-२०१५)

वरुण साहनी, अनुवाद : शर्मिष्ठा खेर

जयंत नारळीकर हे पराकोटीची विविधांगी बुद्धिमत्ता असणारे शास्त्रज्ञ होते. ते शिक्षणतज्ज्ञही होते. विज्ञान लोकप्रिय व्हावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. त्यांचं लेखनही खूप विस्तृत आहे. विज्ञानविषयक नियतकालिके, क्रमिक पुस्तकं हे लेखन इंग्रजीत तर आहेच, पण हिंदीत आणि मातृभाषा मराठीतही आहे. त्यांच्या सुमारे दहा-बारा विज्ञान-कथांच्या पुस्तकांनी कित्येक तरुणांना विज्ञानाच्या अभ्यासाकडे वळवलं आणि त्यांच्यात विज्ञानी, विवेकी वृत्ती रुजवली. कुठल्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला त्यांच्याकडे थारा नव्हता. ते ज्योतीष विद्येचे टीकाकार होते. त्यांनी खाजगीत आणि सार्वजनिक जीवनात ज्योतिषावर खूप टीका केली. विज्ञान आणि वैज्ञानिक वृत्ती, विचारसरणी यांच्या प्रसारासाठी त्यांनी पुस्तकं लिहून आणि रेडियो, टीव्ही या मध्यमांतूनही जे परिश्रम घेतले त्यासाठी युनेस्कोने त्यांना १९९६ साली सुप्रसिद्ध कलिंग पुरस्कार दिला.

त्यांचं कुटुंब अतिशय नामांकित होतं. त्यांचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे तत्त्वभौतिकीचे (Theoretical Physic) प्राध्यापक आणि बनारस हिंदू विद्यापीठाच्या (फिनिक्स) भौतिकी विभागाचे प्रमुख. त्यांचा आईनस्टाईनच्या सापेक्षतावादाचा विशेष अभ्यास होता, आई सुमती नारळीकर संस्कृतची जाणकार; मामा प्रा. हुजुरबाजार हे सा. फु. पुणे विद्यापीठाच्या सांख्यिकी (Statistics) विभागाचे संस्थापक.

जयंत नारळीकरांचे उच्च शिक्षण प्रथम बनारस हिंदु विद्यापीठात झाले. नंतर १९६३ साली त्यांनी केंब्रिजमध्ये सर फ्रेड हॉईल ह्या विश्व-वैज्ञानिकाच्या (cosmologist) मार्गदर्शनात डॉक्टरेट मिळवली. याच कामाची परिणती म्हणजे विश्वाबद्दलचा (steady-state) स्थिर-स्थिती सिद्धांत. तेव्हा ते केवळ २७ वर्षांचे होते. १९६५ साली त्यांना भारताचा पद्मभूषण हा पुरस्कार मिळाला. १९७२ मध्ये ते केंब्रिज सोडून भारतात परतले. मुंबईतल्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च इथे प्राध्यापक आणि Theoretical Astrophysics गटाचे प्रमुख झाले.

त्यांच्या विश्वाच्या संबंधीच्या स्थिर-स्थिती सिद्धांताला विरोधी असा महास्फोट (Big Bang) हा सिद्धांतही चर्चेत होता. त्यानुसार सारे विश्व एका प्रचंड मोठ्या स्फोटातून जन्माला आले. पण हॉईल-नारळीकर सिद्धांत सांगतो की विश्व असे एकाच, एकमेव घटनेतून निर्माण झालेले नाही. म्हणजे विश्वाची निर्मिती अशी झालीच नाही; ते होतेच. म्हणजे ते अनादि आहे. ते प्रसरण पावत असते आणि त्यात सतत नवीन द्रव्याची म्हणजे matter ची निर्मिती होत असते. अशा तऱ्हेने ते स्वतःमध्ये पुनःपुन्हा भर घालत असतं म्हणून स्थिरस्थिती येते. परंतु १९६४ मध्ये काही नव्या सूक्ष्म लहरी (microwaves) दिसून आल्या. ही घटना महास्फोट सिद्धांताच्या बाजूने पुरावा देणारी होती. यामुळे आपल्या सिद्धांताचा पूर्णपणे त्याग करावा असं हॉईल-नारळीकरांना वाटलं नाही. प्रा. बरब्रिज यांच्याबरोबर काम करून त्यांनी १९९३ साली सुधारित स्थिरस्थिती सिद्धांत मांडला.

त्यांचा विश्वविषयक अजून एक मूलगामी सिद्धांत आहे, तो म्हणजे पॅन-स्पर्मिया. पॅन याचा अर्थ सर्वत्र; sperm म्हणजे पुनरुत्पादक सूक्ष्म जीवकण/जैव कण किंवा शुक्राणु. ह्या सिद्धांतानुसार पृथ्वीवरचं जीवन हे मुळात कुठूनतरी दुसरीकडून, दूरवरून आलेल्या सूक्ष्म जीव-जंतुंमुळे म्हणजे Bacteria मुळे सुरू झालं. उल्का आणि धूमकेतू हे यांचे वाहक असतात. ह्या अनुमानाला शास्त्रज्ञ मंडळींमध्ये दिवसेंदिवस वाढती मान्यता मिळू लागली आहे. कारण धूमकेतूंवर amino acids सारखे गुंतागुंतीच्या रचनेचे जैव कण (molecules) सापडू लागेल आहेत. असे कण तारामंडळांमध्येही, म्हणजे inter-stellar space मध्येही सापडत आहेत. प्रा. हॉईल यांनी जेव्हा पहिल्यांदा हे अनुमान मांडले तेव्हा ही खूप खूप दूरवरची शक्यता आहे असे सर्व शास्त्रज्ञ- तज्ज्ञ मंडळींचे मत होते. म्हणून ते खास विज्ञानाला वाहिलेल्या नियतकालिकांमध्ये छापून आले नाही. मग प्रा. हॉईल यांनी १९५७ मध्ये एका अतिशय मनोवेधक अशा The Black Cloud (काळा ढग) ह्या scifi कादंबरीत ती कल्पना मांडली. एक तीव्र, तीक्ष्ण बुद्धीचा ढग पृथ्वीजवळ येतो; पण खूप खूप दूरवरच्या भविष्यात!

नारळीकरांनी अनेक उत्कृष्ट दर्जाच्या संस्था स्थापन केल्या. त्यामुळेच मी त्यांच्या संपर्कात आलो. त्यांनी पुण्यात १९८९ मध्ये IUCAA स्थापन केली. त्यानंतर १९९१ मध्ये मला तिथे तरुण शास्त्रज्ञ म्हणून नोकरी मिळाली. मी तिथे पोचलो तेव्हा आयुकाची आजची इमारत उभी नव्हती की एकही विभाग सुरू झाला नव्हता. 'अदिती' असं नाव असलेला एका शेडवजा इमारतीत सर्व काही सामावलेलं होतं. भोवती पुणे विद्यापीठाचा सुंदर हिरवा जर्द परिसर होता, साप आणि विंचू खुलेआम विहरत होते. ते बघून मी घाबरलो. मला एक विंचू चावला होता, बायकोला साप. पण आम्ही दोघेही

त्यातून निभावलो.

ते दिवस तसे कठीण होतेच; पण आयुकात पुरेपूर उत्साह भाणि उल्हास भरलेला असे. नारळीकरांचा आग्रह होता की आयुकाच्या सुंदर इमारतीभोवतीचे वातावरणही मनोहर हवे. त्यासाठी त्यांनी चार्ल्स कोरिया ह्या सर्वोत्कृष्ट वास्तुअभिकलाकाराला आमंत्रण दिले. मात्र देखण्या इमारतीमुळे पर्यावरणाची हानी होता कामा नये असा आग्रहही होता. उभ्या असलेल्या एकाही झाडाचा मृत्यू ओढवला नाही. आवश्यक ती झाडं त्यांच्या मूळ स्थानापासून सोडवून थोडी बाजूला परत जमिनीत रुजली. अशी कित्येक पुनःप्रस्थापित झाडं आज आयुकाची शोभा वाढवत आहेत. आयुकाच्या आवारात मुद्दाम खूप मोकळ्या जागा सोडलेल्या आहेत. तसंच लेखनासाठी जिकडे तिकडे काळे फळे लावलेले आहेत. त्यातून शास्त्रीय वादविवादाला चालना मिळाली.

जयंत नारळीकरांच्या चोखंदळ आवडी-निवडीमुळे एक देखणी वास्तु उभी राहिली आणि तिथे लोकशाहीची मूलतत्त्वे सांभाळली जातील असा कटाक्ष सुद्धा त्यांनी ठेवला. सर्व निर्णय घेणाऱ्या APC ह्या सर्वोच्च समितीत सर्व स्तरांवरच्या कर्मचाऱ्यांना प्रतिनिधित्व दिलेले होतं. मी वयाने सर्वांग लहान सभासद होतो. पण माझ्याकडेही ताकद आहे अशा भावनेनं सुखावलो होतो.

आयुकाचा अकादमिक दर्जा उच्चतम राखण्याबद्दल नारळीकर अतिशय दक्ष असत. हे आंतर विद्यापीठीय केंद्र असल्याने देशभरातून आणि उर्वरित जगातूनही शास्त्रज्ञ येत असत. माझी डॉक्टरेट मॉस्को विद्यापीठातून १९८५ साली पूर्ण झाली. नारळीकरांना मॉस्को विद्यापीठ आणि सोव्हिएट रशियाच्या विज्ञान संशोधनाबद्दल पूर्ण माहिती होती. त्यामुळे ते मला माझ्या मॉस्कोतल्या सहकाऱ्यांना आयुकात बोलावण्यासाठी नेहमी प्रोत्साहन देत असत. त्यातून अनेक छोटेमोठे संशोधक विद्यार्थ्यांचे प्रकल्प आकाराला आले. तसेच, खगोलशास्त्राचे मधले अनेक पेपर्स लिहीले गेले.

आम्हा दोघांच्या अभ्यासाचं क्षेत्र एकच असलं तरी आमचे दृष्टीकोन, भूमिका भिन्न होत्या. मी महास्फोट सिद्धांतावर काम चालू ठेवले होते. तेही स्थिरस्थिती सिद्धांत शास्त्रोक्त भूमिकेवरून मांडत मला विरोध तर करत असत. यातून आमच्यात कधीच शत्रुत्व तर निर्माण झालं नाही, शिवाय ते मला माझ्या भूमिकेवरून काम चालू ठेवायला पाठिंबा देत असत, माझ्या विषयात पीएच.डी.चे विद्यार्थी घ्यायला उत्तेजन देत असत. त्यांनी अनेक वेळा माझं नाव पुरस्कारांसाठी गाणि सन्मानासाठी पाठवलं आहे. मला २००० साली मिळालेल्या भटनागर सन्मानासाठी त्यांनी माझं नाव सुचवलं होतं.

त्यांच्या खुल्या आणि लोकशाहीवर कटाक्ष असणाऱ्या भूमिकेचं एक उदाहरण: मी आयुकात अगदी नवा असताना 'भारतीय सापेक्षतावाद मंडळी' (Indian Relatiivity Community) यांनी भरवलेल्या एका आंतरराष्ट्रीय सेमिनारमध्ये एक सत्र स्टेडीस्टेट सिद्धांत विरुद्ध महास्फोट यावर होते. नारळीकर स्थिरस्थिती सिद्धांताचे मंडन करत असताना मी त्यांच्या थिअरीवर हल्ले करून त्याला 'भोकं' पाडावीत असे मला सांगण्यात आलं. मी जरा नाखुशीनेच ते काम स्वीकारलं. त्यांच्या सिद्धांताची कमजोर जागा म्हणजे विश्वाच्या microwave नि भारलेल्या पार्श्वभूमीचे औष्णिक स्वरूप - अनादी काळापासून प्रकाश, जो आज २.७ अंशावर उजळत राहतो. नारळीकरांनी त्याचं असं स्पष्टीकरण दिलं की प्रकाशाचे हे उत्सर्जन लोहाच्या अवकाशात सर्वत्र पसरलेल्या अत्यंत सूक्ष्म सुयांमुळे होतं. ह्या सुयांच्या मूळ स्थानाबद्दल म्हणजेच उगमाबद्दल मी प्रश्न विचारला. त्यावर त्यांचं उत्तर होतं की पृथ्वीवरच्या प्रयोगशाळांमध्ये त्या दिसतात. त्यावर मी विनोद करत म्हणालो की पृथ्वीवरच्या प्रयोगशाळांमध्ये रंगीत टीव्ही सेटही तयार होतात, पण ते अवकाशात दिसत नाहीत. सभागृहातले सर्वजण त्यावर हसले. सभा संपल्यावर नियामक समितीमधील एक गृहस्थ माझ्याजवळ येऊन म्हणाले, "फार शौर्य दाखवलंस की डायरेक्टर साहेबांशी पंगा घेऊन. आता काय काय होईल ते बघत बस नुसता."



जयंत नारळीकरांबरोबर वरुण साहनी, मंगलाताई, रोहिणी.

माझ्या पाठीतून भीतीची लहर गेली. इतकं मूर्ख धाडस केल्याबद्दल स्वतःला भरपूर शिव्या दिल्या. आयुकातल्या प्राध्यापकांमध्ये मी सर्वात ज्युनिअर. प्रमुख व्यक्तीच्या आवडत्या सिद्धांतावर टीका करतो म्हणजे आता त्यांच्या नावडत्या माणसांच्या यादीत जाऊन पडणार! मी ताबडतोब उठून त्यांच्या जवळ गेलो आणि व्यासपीठावरून जे बोललो होतो त्याबद्दल माफी मागितली. त्यावर प्रेमाने माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, "स्टेजवरून जे बोललास त्याबद्दल नाही, पण आता जे बोलतो आहेस त्याबद्दल मात्र रागवेन." खूप मोठी सुटका झाली होती. त्यांच्यात खुनशीपणा तर नव्हताच; पण आपल्यापेक्षा वेगळं मत मांडणाऱ्याला ते प्रोत्साहन देत असत. मतभेद मान्य असणे ही महान शास्त्रज्ञ असण्याची निजखूनच.

आयुकाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर व्यवस्थापनासंबंधीच्या खूप जबाबदाऱ्या पडत असत. त्यामुळे वेळेच्या बाबतीत ते खूप काटेकोर होते. ज्या दिवसाचे काम त्या दिवशीच हातावेगळे झाले पाहिजे अशा निश्चयाने दिवस प्लॅन केलेला असे. ऑफिसमधल्या कर्मचाऱ्यांनाही याची जाणीव होती.

ते ९ च्या ठोक्याला हजर राहत असत. परंतु आम्हा शिक्षक-शास्त्रज्ञ वगैरे माणसांना आपला दिवस आपल्या विचाराने प्लॅन करण्याची मुभा होती. मला रात्री काम करायला आवडायचे. एकदा रात्रभर काम करून सकाळी ७ वाजता मी घरी निघालो होतो. तर सकाळी ७ वाजता ते मला दारात भेटले. नऊ वाजेपर्यंत आपले लेखन-वाचनाचे काम करून ते नऊ वाजता संस्था प्रमुख ह्या कामासाठी तयार राहायचे. मी 'गुडनाईट' म्हणून गेलो आणि ते म्हणाले, "गुडमॉर्निंग" मग आमचं छान संभाषण झालं. त्यांनी हॉईल यांच्याबद्दलची आठवण सांगितली. त्यांचे काही विद्यार्थी रात्रभर जागून काम करायचे. काही पहाटे उठून दिवसा. रात्रीचे काम करणारे 'घुबड' म्हटले जात असत. हॉईलना त्यांचे सर्व विद्यार्थी एकत्र कधीच सापडत नसत. मी घुबड आहे हे ह्या प्रसंगामुळे नारळीकरांच्या लक्षात आलं. तिथपासून मी ज्या कमिट्यांमध्ये होतो त्यांच्या मीटिंगा दुपारच्या ठेवल्या जात.

जयंतना साहित्याची आवड होती. माझे वडील भीष्म साहनी यांची 'तमस' ही कादंबरी १९८८ साली टेलिव्हिजन सिरीयल म्हणून आली. ती सिरीयल जयंतना खूप आवडली. त्यांनी मूळ हिंदी कादंबरी मागितली. मी त्यावेळी कॅनडामध्ये होतो. तिथून मी वडिलांना त्यांच्याकडे कादंबरी पाठवायला सांगितली. जयंतनी ती लगेच वाचून संपवली. त्यांचं बालपण बनारसमध्ये गेलेलं असल्याने त्यांचं हिंदीचं ज्ञान उच्च दर्जाचं होतं. नंतर कधीतरी ते आणि माझे वडील यांची भेट झाली आणि दोघांच्यात दृढ मैत्री निर्माण झाली. मराठीतील सुप्रसिद्ध विनोदी लेखक पु.लं.च्या निधनानंतर त्यांची पत्नी सुनीता देशपांडे यांच्याकडे विज्ञान प्रचार-प्रसारासाठी एक मोठी रक्कम सोपवली. त्यातून 'मुक्तांगण' उभं राहिलं. या कामासाठी स्वतःला झोकून देणारे तरुण शास्त्रज्ञ तिथे आहेत. दूरदूरच्या गावांमध्ये जाऊन ते दुर्बिण कशी बनवायची अशा प्रकारचे प्रयोग शाळेतल्या मुलांसमोर करायचे. विज्ञान प्रसाराचे काम आता आयुकाचा अविभाज्य भाग झाले आहे. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ अरविंद गुप्ता कित्येक वर्षे हे काम आयुकात करत होते. वाया जाणाऱ्या, फेकून दिलेल्या वस्तूंमधून खेळणी कशी करावीत हे त्यांच्या https:/www.arvindguptatoys.com/toys.from-trash.php या वेबसाईटवर पाहता येईल.

त्यांना मिळालेल्या असंख्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांपेक्षा त्यांचं महत्त्व कशात आहे; तर त्यांची अतिशय दुर्मिळ अशी हेतुशुद्धता, सूक्ष्म गोष्टीही पाहणारी दृष्टी, औदार्य, सहसंवर्धन आणि अतिशय आश्चर्यकारक अशी विनोदबुद्धी! त्यांचं जाणं खोलवर दुःखी करतं.

(The Wire मधून साभार)

वरुण साहनी, *एमिरेट्स प्रोफेसर आयुका, पुणे*
varun@iucaa.in
अनुवाद : शर्मिष्ठा खेर, *पुणे*
anjookher@gmail.com

नारळीकर सर व त्यांच्या कुटुंबियांचे आयुकामुळे आलेले अनुभव

नारळीकर सरांबरोबर एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी म्हणून काम करताना त्यांच्या व्यक्तिगत अशा अनेक वैशिष्ट्यांची मला ओळख झाली व त्यातून अनेक अनमोल गोष्टी शिकायला मिळाल्या. आकाशगंगेतील त्यांच्या घरासमोरच राहात असल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांचाही सहवास मिळाला. त्यातील काही गोष्टींचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो.

त्यांच्या 'कडक' शिस्तीतली पहिली गोष्ट म्हणजे वेळ पाळणे. ते स्वतः त्यांच्या कार्यालयात नेहमी दहा मिनिटे आधीच येत व सर्व कागदपत्रे पाहून ठेवत असत. बरोबर नऊ वाजता त्यांच्या समोर बसून डिक्टेशन घेणे ही नित्याची बाब होती. कितीही महत्त्वाच्या मीटिंग्ज असोत, ते आपली कामे उरकून ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी हजर असत व आयुकातील सर्वांकडूनही त्यांची तीच अपेक्षा असे.

आयुकाच्या ऑफिसच्या इमारतीचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी एन.सी.आर.ए.(NCRA- National Centre for Radio Astrophysics) या आयुकाच्या शेजारील संस्थेच्या जागेतील ऑफिसातून आयुकाचे काम चालू असताना एक दिवस सरांना एक महत्त्वाचे पुस्तक तातडीने हवे होते. लायब्ररीत त्यांनी फोन करून ते पुस्तक हवे असल्याचे लायब्ररियनना कळवले. दहा मिनिटे झाली तरी पुस्तक घेऊन कोणीच आले नाही म्हणून सर खोलीबाहेर आले. तेव्हा 'कुमार' नावाचा एक कर्मचारी ते पुस्तक घेऊन आला. "तुला इतका वेळ का लागला?", असे विचारताच त्याने, 'लायब्ररीपासून इथे येईपर्यंत एवढा वेळ लागतोच.' असे सांगितले. ते अर्थातच बरोबर नव्हते. सर रागावले व व्हरांड्यातच उभे राहिले. ते पुस्तक कुमारच्या हाती देऊन त्यांनी त्याला लायब्ररीत जाऊन तेथून परत यायला किती वेळ लागतो हे पाहण्यासाठी घड्याळ लावले व वेळ मोजला. तो अर्थातच अगदी कमी होता. याचा अर्थ पुस्तक आणायला नव्हे, तर ते शोधायला खूप वेळ लागला होता हे सिद्ध झाले. हा अनुभव लक्षात घेऊन आयुकातील प्रत्येक कर्मचारी व भेट देणाऱ्या व्यक्तीही वेळेच्या संदर्भात अत्यंत काटेकोर व शिस्तबद्ध राहात असत.

आयुकाच्या 'आकाशगंगा' या गृहनिवासामध्ये राहायला

आल्यानंतर मला सरांच्या घरासमोरच्याच इमारतीत जागा मिळाली. ऑफिसव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेळेत सर किंवा मंगलाताई जवळपासच्या रस्त्यावर जेव्हा दिसत तेव्हा सरांचा पोशाख अत्यंत साधा असे. कधी कधी ते त्यांच्या 'हिरा' नावाच्या कुत्रीला फिरायला नेत असत. तिथून जाणाऱ्या-येणाऱ्या लहान-मोठ्या वाटसरूंना ही एवढी मोठी शास्त्रज्ञ व्यक्ती आहे असे कळतही नसे.

आयुकामध्ये सरांसाठी एका राखीव कार व ती चालविणारे 'रासकर' नावाचे ड्रायव्हर होते. त्या काळी पुणे विद्यापीठाच्या आसपासचा परिसर हळूहळू वाढत होता, नवे रस्ते तयार होत होते. एक दिवस मी बाणेरच्या एका नातेवाईकांकडे जाताना मला आयुकाची गाडी व ड्रायव्हर दिसले. ते तिथे असण्याची अपेक्षा नसल्याने मी थांबून त्यांना विचारले. त्यांनी "सरांना कटिंगसाठी घेऊन आलो." असे सांगितले. रस्त्याच्या समोरच्या बाजूस पत्र्याच्या, छोट्या, चौकोनी दुकानात हे केशकर्तनालय होते जिथे एकाच माणसाची केस कापण्याची सोय होती. अशा दुकानात सरांना पाहून मला फारच आश्चर्य वाटले आणि मनातल्या मनात त्यांच्या साधेपणाविषयी प्रचंड कौतुकही!

आयुकाचे काम दोन चार वर्षात जोरात सुरू झाले होते. विविध प्रकारच्या सभा, शाळेतील मुलांसाठी शैक्षणिक कार्यक्रम, आयुकामध्ये असलेली 'फुको पेंड्युलम' सारखी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट, सौरघड्याळ, न्यूटन, आइन्स्टाईन, आर्यभट्ट, गॅलिलिओ गॅलिली यांचे पुतळे इत्यादी गोष्टींमुळे आयुकाच्या भेट देणाऱ्या देशी-परदेशी लोकांच्या संख्येतही खूपच वाढ झाली. २९ डिसेंबर हा आयुकाचा 'फाउंडेशन डे' साजरा होऊ लागला व त्यानिमित्त आयुकामधील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये विविध स्पर्धाही घेतल्या जाऊ लागल्या. अगदी तरुण कर्मचारी, विविध वयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रोफेसर्स यांच्यात लॉन टेनिसची स्पर्धा होई. ही स्पर्धा जिंकणारे व मेडल मिळवणारे होते पांढरी हाफ पॅन्ट, पांढरा टी शर्ट व पांढरे बूट घालून आलेले नारळीकर सर स्वतः! अनेकविध व्यवधानात गुंतलेले सर या खेळामधले स्वतःचे प्रावीण्यही राखून होते!

त्यांच्या आयुकातील निवासस्थानातील मोकळ्या जागेत त्यांनी 'क्रॉके'(croquet) या खेळाचे छोटेसे मैदानही करून घेतले होते व ते त्यांच्या घरची मंडळी हा खेळ तिथे खेळत असत.

एकदा 'फाउंडेशन डे' निमित्त व्यंगचित्र स्पर्धा ठेवली होती. त्यात मी सरांचे एक व्यंगचित्र काढले होते. सरांच्या आयुकामधील ऑफिसला दोन-तीन खिडक्या व बाल्कनीत

मिळून साऱ्याजणी

नव्यानं वर्गणी भरायची आहे?

अनुबंध निधी पाठवायचा आहे?

वर्गणी मनीऑर्डरने किंवा 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे डिमांड ड्राफ्टने / AT PAR चेकने पाठवावी.

वर्गणी इंटरनेट बँकिंगद्वारे तसेच, मिळून साऱ्याजणीच्या www.miloonsaryajani.in या वेबसाईटवरूनही भरता येईल.

यासाठी आमचे खाते क्रमांक आहेत -

भारत			
	वार्षिक	३ वर्षे	१०वर्षे
व्यक्ती	५००/-	१४००/-	५०००/-
संस्था	७००/-	१९००/-	७०००/-

भारताबाहेर		
	वार्षिक	३ वर्षे
व्यक्ती	५० यु. एस. डॉलर्स	१२० यु. एस. डॉलर्स
संस्था	६० यु. एस. डॉलर्स	१५० यु. एस. डॉलर्स

A/C Name :	युनियन बँक, कर्वे रोड, पुणे	बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे
Niramaya Public Charitable Trust	Saving Ac. No. - 370002010908793 IFSC - UBIN0537004.	Saving Ac. No. - 60029908172 IFSC - MAHB0000116.

SCAN & PAY

UPI ID : 57984501@ubin

कार्यालयीन पत्ता : फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४

एक महत्त्वाची सूचना - वर्गणी ऑनलाईन भरल्यानंतर ७४४७४४९६६४ या क्रमांकावर नांव, पत्ता, वर्गणीची रक्कम आणि वर्गणी कोणत्या बँकेत भरली याची SMS/WhatsApp करून माहिती द्यावी, म्हणजे खात्यात जमा झालेली वर्गणी कोणाची आहे हे आम्हांला कळू शकेल. आता स्कॅनकोडवरूनही वर्गणी आणि अनुबंध निधी पाठवू शकता.

उघडणारा एक दरवाजा होता. आयुका परिसरात खूप जुने वृक्ष असून त्यावर खूप पक्षी येत-जात. सरांच्या खोलीतील दरवाजातून काही कावळे येऊन जोरजोराने कावकाव करत असत. सर कामाच्या अगदी विचारात असले की ही कावकाव आवडत नसे व ते स्वतः उठून कावळ्यांना हाकलून लावत. वर दिसणारे मी काढलेले हेच ते व्यंगचित्र, ज्याला पहिले पारितोषिक मिळाले. सरांनी व मंगलाताईंनीही या व्यंगचित्राचे मनापासून कौतुक केले.

ऑफिस व्यतिरिक्तच्या वेळात सरांना निरोप देण्यासाठी त्यांच्या घरच्या बागेतून जाणारा एक रस्ता होता. एकदा निरोप द्यायला मी गेले असताना त्यांच्या बागेत करडईची छान भाजी आलेली दिसली.

मी मंगलाताईंना म्हंटलं, "मला करडईची भाजी फार आवडते." नंतर दोन दिवसांनी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास माझ्या घरावर टकटक ऐकू आली. दरवाजा उघडला तर मंगलाताई व लिलू (सरांची धाकटी मुलगी - लीलावती) हातात एक डबा घेऊन उभ्या. करडईची भाजी मला आवडते हे लक्षात ठेवून त्यांनी केलेली घरच्या बागेतील भाजी माझ्यासाठी आवर्जून आणली होती! असे हे 'सख्खे' शेजारी! या सर्व कटुंबीयांची राहणी इतकी साधी होती की सांगूनही विश्वास बसणार नाही. आमच्या हौसिंग कॉलनीमध्ये 'सर्व्हंट्स क्वार्टर्स' असा एक भाग होता. तिथे राहणाऱ्या आयुकातील कर्मचाऱ्यांच्या लहान मुला-मुलींना किंवा त्यांच्या बायकांनाही मंगलाताई स्वतः तिथे जाऊन विविध गोष्टी शिकवत, अभ्यासासाठी, इंग्रजीसाठी मदत करत.

आकाशगंगेच्या परिसरात खूप झाडे असल्याने तिथे विविध पक्षी आणि कधी कधी सापही निघत. एकदा सरांच्या घरासमोरच्या रस्त्यावर एक भला मोठा साप निघाला. त्या संदर्भातील जाणकार व्यक्तीला बोलावून, त्याला पकडून, योग्य त्या ठिकाणी त्याला सोडेपर्यंत सर जातीने तिथे उभे होते!

सरांचे आई-वडील आकाशगंगांमध्ये काही दिवस राहायला आले होते. त्यांच्या आईही अत्यंत शिस्तबद्ध. त्यांच्याकडे गेले असताना एकदा त्यांनी पलीकडील टेबलावर असलेली सुरी मला मागितली. मी ती त्यांना देताना केलेली चूक त्यांनी जवळ बोलावून मला लगेच सांगितली. "अशी धारदार वस्तू कुणालाही देताना धारेची बाजू त्या व्यक्तीकडे कधीही धरायची नाही." मी आयुष्यात कायमचा लक्षात ठेवलेला हा धडा आहे!

त्या जिथे बसल्या होत्या तिथे भगवद्गीतेचे, बऱ्यापैकी जीर्ण झालेले पुस्तक दिसले. तेव्हा त्यांनी मला सांगितले, "जयंताला भगवद्गीता शिकवत असल्यापासून हे पुस्तक वापरात आहे. जयंताला सगळी भगवद्गीता तोंडपाठ आहे." खगोलशास्त्र, गणित, उत्तम इंग्रजी याच बरोबर संस्कृतचेही ज्ञान व "भगवद्गीता तोंडपाठ असणे" ..... काय बोलायचे अशा चतुरस्त्र व्यक्तीविषयी?

माझ्या वडिलांच्या वर्षश्राद्धाच्या निमित्ताने आयुकाच्या घरी मी प्रख्यात गायक व अभिनेते श्री. शरद गोखले व सौ. नलिनी गोखले यांचे गायन ठेवले होते. कॉलनीतील शेजाऱ्यांना त्यासाठी बोलावले होते. त्या वेळी नारळीकर पती-पत्नी ठरल्या वेळेला येऊन सर्वांच्यात साधेपणाने बसले होते. हा प्रसंग श्री व सौ. गोखले यांच्या कायमचा स्मरणात राहिला आहे.

आता सर व मंगलाताई दोघेही नाहीत. पण त्यांनी शिकवलेल्या अनेक उत्तम गोष्टी कायमच्या स्मरणात राहिल्या आहेत. समाज सुधारणेचे हे त्यांचे कामही असेच प्रगतिशील राहील.

कल्याणी गाडगीळ – अभ्यंकर, *पुणे*
मोबा. ९७६७५९९९३७ / kalyani1804@gmail.com

आठवणीतले डॉ. जयंत नारळीकर

डॉ. जयंत नारळीकर २१ मे २०१५ रोजी गेले. तेव्हापासून अनेक जणांनी मला फोन करून सांगितलं, की तू त्यांच्या काही आठवणी सांग, कारण जयंत यांनी जी आयुका ही संस्था उभी केली, माझा नवरा नरेश दधीच, त्यांच्यानंतर तिचा संचालक झाला. त्यामुळे आमचा गेल्या अनेक वर्षांचा संपर्क होता. व्यक्तिशः त्यांचा आणि माझा फारसा संबंध आला नाही. पण इतक्या वर्षांच्या सहवासातल्या काही आठवणी आहेत. नाही म्हटलं तरी जवळपास पन्नास वर्षं आम्ही एकाच परिसरात राहात होतो. त्यांच्या पत्नी मंगला नारळीकर यांची आणि माझी अधिक जवळीक होती.

नरेशशी विवाह झाल्यानंतर या संबंधांना सुरुवात झाली. नारळीकरांचे वडील... आम्ही त्यांना तात्यासाहेब म्हणायचो, हे नरेशचे पीएच.डी.चे गाईड होते. त्यामुळे त्यांच्या घरी आमचं जाणं-

येणं होत होतं. त्याच काळात जयंत कधी वडिलांच्या घरी आले की आम्हीही त्यांना भेटत होतो. आमचा खरा संबंध आयुकाची स्थापना झाल्यावर आला.

आयुकाच्या स्थापनेत नारळीकरांचा फार मोठा हात होता म्हणजे मी गंमतीनं म्हणते की नारळीकरांनी आयुकाचं आईपण केलं आणि नरेश, त्याचे दुसरे सहकारी अजित केंभावी यांनी या संस्थेचे दाईपण केलं. सुरुवातीच्या काळात नरेशचा संस्था उभारणीच्या कामातला सहभाग खूपच मोठा होता. एक संस्था उभारायची म्हणजे किती वेगवेगळ्या प्रकारची कामं असतात याची आपण कल्पना करू शकतो.

खरं म्हणजे नरेशचे आणि नारळीकरांचे स्वभाव अतिशय वेगळे होते. नारळीकर अत्यंत वक्तशीर शिस्तप्रिय असे होते. म्हणजे नरेश नेहमी सांगतो, की नारळीकर जर म्हणाले की दहा मिनिटे मला वेळ आहे, तुला काही बोलायचं असेल तर ये... तर खरोखरीच दहा मिनिटंच लागायची आणि त्या दहा मिनिटात आमचं काम पण व्हायचं. दहा मिनिटाच्या बाबतीत आपण एवढे काटेकोर नसतो. पण जयंतच्या बाबतीत मात्र त्या दहा मिनिटात काम संपवूनच माणूस बाहेर पडायचा. जयंतच्या आणि नरेशच्या स्वभावात बराच फरक असूनही त्यांचे प्रत्यक्ष काम करताना सूर जुळले खरे.

जेव्हा ८९-९०च्या सुमाराला आम्ही आयुकात राहायला गेलो, तेव्हा घरात अर्थातच पसारा होता, एरव्हीही घर शिफ्ट केल्यावर पसारा असतोच; पण आमचा जरा जास्तच होता. तेव्हा जयंत एका तीन-साडेतीन वर्षांच्या छोट्या मुलाला घेऊन आमच्याकडे आले– नाही म्हटलं तरी मी जरा संकोचले. पण म्हटलं शिफ्टिंग झाल्यावर सर्वांच्याच घरात पसारा असतो. मग मी कुतुहलानं विचारलं की कोण छोटू तुमच्याबरोबर आलाय? त्यावर ते म्हणाले की आमच्या घरातल्या ज्या मदतनीस बाई आहेत त्यांचा हा मुलगा... याचे नाव योगेश- त्याला मी फिरायला घेऊन जातो कधी मधी – तर आज इथे वळलो... तर आपल्या घरातल्या मदतनीसबाईच्या मुलाबरोबर असं फिरणं, आणि तेही संस्थेचे संचालक असताना, याचं मला खूप अप्रूप आणि आदरयुक्त कौतुक वाटलं.

जयंतची एक आठवण सांगायची म्हणजे त्यांना जेवण अतिशय प्रिय होतं. विविध प्रकारच्या पदार्थांचा आस्वाद घ्यायला त्यांना खूप आवडायचं. रेस्टॉरंटमध्ये गेले की ते निरनिराळे पदार्थ मागवायचे पण वेळेचं पण फार बंधन असायचं. म्हणजे हे सगळं ठरावीक वेळेतच पार पाडायचा त्यांचा आग्रह असायचा. कारण त्यांनी ठरावीकच वेळ यासाठी दिलेली असायची. एकूणच खाणं, तेही नाना प्रकारचं, हा त्यांच्या आवडीचा भाग होता. घरी त्यांची पत्नी मंगलाही सुगरण होती.

तसे जयंत वाढले बनारसमध्ये. त्यांचे वडील बनारसच्या बनारस हिंदु युनिव्हर्सिटीमध्ये शिकवत होते. जयंतरावांचं बालपण बनारसला गेल्यामुळे तिकडचे पदार्थ त्यांच्या खूप आवडीचे होते. त्यांच्या आवडी उत्तर भारतीय असल्याने हापूस की लंगडा हा गमतीचा वाद आमच्यात असायचा. त्यांना लंगडा आवडायचा तर आम्ही सगळे देवगड हापूसवाले लोक होतो.

साधना दधिच

जयंत हिंदी माध्यमात शिकल्याने हिंदीचा त्यांच्यावर स्वभाविक प्रभाव होता. नरेश आणि ते लॉन टेनिस खेळत असत. खेळताना काही चूक झाली की 'साला', 'बेकार' असे हिंदी शब्दच त्यांच्या तोंडून बाहेर पडायचे. तेव्हा असं वाटायचं यांची खरी भाषा हिंदीच असावी. मराठी त्यांचं उत्तम होतंच. पण हिंदीत ते सहजपणे बोलायचे.

त्यांच्या साधेपणाविषयी मला आवर्जून सांगायचं आहे. आयुकाचे संचालक असताना त्यांना काही पदसिद्ध सुखसोयी होत्या. उदाहरणार्थ गाडी होती, बंगला होता. या सर्व सुखसोयींचा उपभोग त्यांनी घेतला खरा. पण तो उपभोग घेताना त्यांनी नियमांची मर्यादा कधीच ओलांडली नाही. आम्ही बघत होतो, की प्रत्यक्ष जीवनात ते साधेच होते. त्यांच्या घरात हवं तेवढंच आणि उपयुक्त असेल तितकंच सामान असायचं. गोदरेजची कपाटं ती पण कधी काळी घेतलेली, त्यांच्या दिवाणखान्यात असायची. त्यांचा असा हष्टिकोन होता की जे उपयोगाचं आहे तेवढंच ठेवायचं. जुनं झालं म्हणून टाकून का द्यायचं? म्हणजे आत्ताची जी आपण उधळमाधळ बघतो, घर सजावटीत आपला गौरव मानला जातो, त्या प्रकारचं त्यांचं वागणं नव्हतं. त्यांचा एक साधाच सुती कापडाचा कुडता होता, आणि त्याच्या खिशावर आयुकाचा लोगो होता, जो मंगल-त्यांच्या पत्नीने भरतकामाने भरलेला होता. नारळीकर तो कुडता आयुकाच्या सर्व विशेष कार्यक्रमात घालत असत, आणि सांगत असत, की हे मंगलने केलेलं भरतकाम आहे. कपड्यांच्या बाबतीत कुठलाही बडेजाव त्यांनी केला नाही. लोक काय म्हणतील, माझं एकूण स्टेटस, याला ते मुळीच महत्त्व द्यायचे नाहीत. घर अर्थातच पुस्तकांनी खचाखच भरलेलं होतं. ताईसाहेब आणि तात्यासाहेब यांच्या काळातलं फर्निचर जैसे थे होतं. हा त्या दोघांच्या वागण्यातला साधेपणा मला खूप महत्त्वाचा वाटतो. त्या पिढीचं 'जोडुनिया धन उत्तम व्यवहारे' हे ब्रीद होतं. त्याला अनुसरून नारळीकरांचं प्रत्यक्ष वागणं होतं. माझ्या असंही लक्षात आलं की त्यांच्या थोरल्या दोन्ही मुलींच्या विवाहाच्या प्रसंगी ज्यांना त्यांनी साखरपुड्याला बोलावले होतं, त्यांना प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी बोलावलं नाही. त्यात त्यांचं म्हणणं की परत परत त्याच लोकांना कशाला बोलवायचं. नाहीतरी लग्न आणि साखरपुडा यात फारसा फरक राहिलेला नाही. मला जाणवतं की आपल्याला जे वाटतं ते—प्रत्यक्ष वागण्यात बाणवणं हा त्यांचा महत्त्वाचा गुण होता.

मला जाणवलेता आणखी एक गुण म्हणजे खूप नम्रपणा त्यांच्या वागण्यात होता. मला आठवतं की टी. एन. शेषन (निवडणूक आयोगाचे प्रमुख) जेव्हा लोकप्रियतेच्या शिखरावर होते तेव्हा पुण्याच्या सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार आयुकाच्या सभागृहात आयोजित केला होता. आयुकाच्या लोकांना दिलेले पास मर्यादित होते. जेव्हा जयंत आणि मंगला कार्यक्रमासाठी आले तेव्हा हॉल खचाखच भरलेला होता. एकही खुर्ची खाली नव्हती. तेव्हा या दोघांनी शांतपणे मधल्या पॅसेजच्या पायऱ्यांवर बसून भाषण ऐकायला सुरुवात केली. बऱ्याच वेळानं हे लोकांच्या लक्षात आल्यावर हालचाल झाली पण एका अक्षरानं त्यांनी कोणाला उठवलं नाही, की सांगितलं नाही. ते सहजपणे शांतपणे, पॅसेजच्या पायऱ्यांवर बसले. अशा गोष्टी खूप लक्षात राहण्याजोग्या आहेत. काही फुकट घालवायचं नाही, कसली उधळमाधळ करायची नाही, हा त्यांचा गुण होता. आपली जी मुळं आहेत ती त्यांनी कधी सोडली नाहीत.

संस्कृत भाषेवर त्यांचं खूप प्रेम होतं. आपल्या आईशी बरेचदा ते संस्कृतमधून संवाद करत असत. त्यामुळे माझ्या लक्षात आलं की आयुकाच्या वेगवेगळ्या इमारतींना संस्कृत-प्रचुर नावं देण्यात आली आहेत. उदाहरणार्थ वराहमिहीर, आकाशगंगा, देवयानी, बल्लव, नालंदा.... यावर नारळीकरांच्या संस्कृत प्रेमाची छाप आहे. आयुकाच्या प्रवेशदाराशी दोन झाडांच्या मध्ये ग्रॅनाइट्वर कोरलेले संस्कृत श्लोक अतिशय सुंदर आहेत. एका श्लोकाचा अर्थ असा की, मलय पर्वतावर चंदनाची झाडं वगैरे आहेत, ठीक आहे, पण मला काय त्याचं? माझ्यासाठी निंब, कुटज अशा झाडांचीच महती मोठी आहे. अशा प्रकारे आपला वेगळा ठसा त्यांनी आयुकाच्या परिसरावर उमटवला आहे.

रंगानं होळी खेळणं त्यांना प्रिय होतं. आमच्याकडे पाणी, रंग, अशा सगळ्या सरंजामात होळी साजरी होत असे. अशा काही मजेदार प्रथा, परंपरा त्यांनी आयुकात रुजवल्या होत्या.

आयुकाची संचालक म्हणून घडी त्यांनी व्यवस्थित बसवली. सगळ्यांशी सल्ला मसलत करून ते पुढे जात असत. त्यांनी अरविंद गुप्तांच्या प्रयोगशाळेला, जिथे शालेय विद्यार्थी मुक्तपणे येऊन विविध प्रकारचे प्रयोग करत, खूप प्रोत्साहन दिलं. 'खेल खेल में विज्ञान' हेच अरविंद गुप्तांचं ब्रीदवाक्य होतं. ही शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रयोगशाळा हा नारळीकरांच्या विशेष आवडीचा भाग होता.

आपलं प्रत्येक काम महत्त्वाचं आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. म्हणून हे काम आपण करून टाकू अशी त्यांची कधीच वृत्ती नसायची. त्यांचं एक म्हणणं होतं की मी स्वाक्षरी देणार नाही तुम्ही मला प्रश्न विचारा. त्याला दिलेल्या उत्तरात माझी सही असेल, आणि अशा तऱ्हेने माझी सही तुमच्याकडे राहील. हा शिरस्ता नारळीकरांच्या वडिलांचा म्हणजे तात्यासाहेबांचाही होता. जयंतरावांनी तो पुढे चालवला. लहान मुलांनाही जयंतरावांचं पत्र आल्याचा खूप आनंद होत असे.

जयंतरावांनी २००३ साली आयुकाचं संचालक पद सोडलं. त्या नंतर बावीस वर्ष उलटली आहेत. तरीही आयुकाचं काम सुरळीत चालू आहे. हे फार मोठं यश आहे. त्यांना हे बघता आलं याचा मला आनंद आहे.

काही गोष्टी कठोर वाटाव्यात अशा होत्या खऱ्या. त्यांचे वडील तात्यासाहेब त्यांच्याच घरी होते. ते गेल्यावर त्यांचं दहन झालं. पूजेअर्चेचा काही संबंधच नव्हता. तिथून परत आल्यावर तासाभरात जयंतराव आपल्या कार्यालयात गेले. अशा गोष्टी आपल्याला सहसा दिसत नाहीत. आपल्या कामाविषयी त्यांच्या ठायी असलेली निष्ठा हा पुन्हापुन्हा जाणवणारा भाग होता. २१ मे ला सुद्धा नारळीकरांच्या निधनानिमित्त आयुकाला सुट्टी दिली नव्हती. नेहमीप्रमाणे काम सुरू होतं. जयंतरावांना असंच आवडलं असतं. नरेशने नारळीकरांवर जो लेख लिहिला त्यात त्याने आवर्जून लिहिलं आहे की नारळीकर त्यांच्यामागे आयुकासारखी भरीव संस्था उभी करून गेले आहेत.

अंधश्रध्दा निर्मूलनाच्या बाबतीतही त्यांच्या अतिशय स्पष्ट भूमिका होत्या. दाभोलकरांबरोबर त्यांनी भाषणंही केली होती. सध्याच्या काळात, जेव्हा जेव्हा पुनरुज्जीवनवादाची लाट जोरात आहे, त्यांच्या भूमिकेची पुन्हा पुन्हा आठवण काढायला हवी. त्यांच्या रोजच्या आयुष्यातही या भूमिकेचं प्रतिबिंब पडलेलं होतं.

दुसरं म्हणजे त्यांचा फार आग्रह होता की विद्यार्थीदशेत सुरुवातीच्या वर्षात मातृभाषेत-विशेषतः गणित आणि विज्ञान शिकवण्यात यावे. तरच या विषयांबाबत स्पष्टता येते. पुढे ज्ञान वाढविण्याचे अनेक मार्ग आहेत. शिक्षणाच्या माध्यमाबाबत त्यांनी मातृभाषेचा आग्रह धरला आणि आपल्या मुलींच्या बाबतीत वागलेही. तसंच, त्याचं स्वतःचं शालेय शिक्षण हिंदी माध्यमातच झालं होतं.

मी जितकं काही नारळीकरांबद्दल आता ऐकतेय, त्यावरून अनेकांवर त्यांच्या विज्ञान कथांचा प्रभाव आहे असं लक्षात येतं. त्यांच्या विज्ञान कथा वाचत वाचत मोठी झालेली बरीच मंडळी आहेत. भारतात इतर भाषांमध्ये विज्ञान कथांचा असा प्रभाव माझ्या माहितीप्रमाणे नाही. विज्ञान कथा ही नारळीकरांनी मराठी भाषेला दिलेली मोलाची देणगीच आहे.

नारळीकरांचं जाणं हे एक मोठे झाड पडण्यासारखं आहे. माणूस म्हणून ते निश्चितच आदरणीच होते. सध्याच्या भोगवादाच्या कल्लोळाच्या संदर्भात मी त्यांचं वागणं बघते तेव्हा त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदराला आणखी एक विशेष परिमाण प्राप्त होतं.

यूट्यूब लिंक : https://youtu.be/8r_atEwPKQ8

साधना दधिच, *पुणे*
sadhana.dadhich@gmail.com
अनुवाद : सरिता आवाड, *पुणे*
sarita.awad1@gmail.com

चांदणे तुझ्या स्मरणाचे...

डॉ. सुनीला गोंधळेकर



माधव वझे

ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. माधव वझे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी द बॉक्स हे नाट्यगृह भर पावसातही पूर्ण भरले होते. 'चांदणे तुझ्या स्मरणाचे...' या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सुनीला गोंधळेकर यांनी केली. माधव वझे आणि साने गुरुजींचा शाम यांचं अतूट नातं आहे. त्यांना स्टारपद लहानपणीच लाभलं होतं. आपल्या वडिलांच्या सांगण्यावरून त्यातून सहजपणे बाहेर पडत नैसर्गिकरीत्या ते नाटकाकडे वळले, याबद्दल त्या सुरुवातीला बोलल्या. चित्रपटाच्या मोहमयी दुनियेत न अडकता डोळसपणे नाटकाकडे वळणाऱ्या माधवरावांचे जवळचे मित्र **श्याम जोशी** म्हणाले की माधव एक सरळ स्वभावाचा पण थोडा तिरका होता. कलाकार तिरका असल्याशिवाय चौकटीबाहेरचं, वेगळं करू शकत नाही, माधव तसा तिरका होता. महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे चिटणीस पुरुषोत्तम रामचंद्र ऊर्फ अप्पासाहेब वझे म्हणजे माधवचे वडील. माधव तिथे यायला लागला. नाटक ही एक सामूहिक कलाकृती आहे, पडद्यामागची आणि प्रेक्षकांसमोर प्रत्यक्ष सादर होणारी कलाकृती ही नाटकाची अंगे एकसंध असणे आवश्यक असते ही तालीम तसेच Intimate Theatre म्हणजे काय हे माधवकडून शिकायला मिळाले.

त्यानंतर ज्येष्ठ नाटककार, अभिनेते, नाट्यदिग्दर्शक **सतीश आळेकर** म्हणाले, की माधव माझा अत्यंत जुना मित्र. श्यामच्या आईतील या श्यामबद्दल मला नेहमी कुतूहल वाटत आलं. फर्ग्युसनला दुसऱ्या वर्षात शिकत असताना माधव, पुरुषोत्तम करंडकसाठी एक श्रुतिका बसवत होता. त्यात मुख्य भूमिका करणारा कलाकार आजारी पडल्यामुळे मी ती भूमिका करावी, असा प्रस्ताव माधवने ठेवला. मी चार दिवसात तालीम केली आणि तेंडुलकरांचे 'ओळख' आम्ही सादर केले.

माधव अनेकदा पुस्तकांच्या दुकानात असायचा. त्याने पुस्तकाच्या दुकानात नोकरीही केली होती. अफाट आणि अद्ययावत वाचनामुळे दिग्दर्शनाचे, समीक्षणाचे अनेक बारकावे त्याला माहीत होते. ब्रिटिश कौन्सिलमध्ये कधीमधी गेलो की चांगली पुस्तके सुचवायचा. अशा विविध प्रसंगातून आमचा संबंध दृढ होत गेला. १९८५-८६ च्या दरम्यान पुणे विद्यापीठाच्या (सध्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) ललित कला केंद्राची स्थापना होण्यामध्ये भालबा केळकर, स.शि.भावे आणि माधव वझे या तिघांनी योगदान दिले. विशेषतः अभ्यासक्रम काय असावा आणि अशा बऱ्याच गोष्टींवर बारकाईने विचार मांडला. पुढे अभ्यासक्रम अद्ययावत केला त्यातही माधवची भूमिका महत्त्वपूर्ण होती. याच विभागात त्याने अध्यापन करून चांगले नाट्यकर्मी घडवले.

मराठी भाषेच्या अभ्यासक **प्रा.रेखा इनामदार साने** म्हणाल्या की माधव वझे म्हणजे मोकळेपणाने गप्पा मारणारे व्यक्तिमत्त्व, त्याचं संपूर्ण घर मला माझं वाटत होतं. हे फार कमी व्यक्तींच्या बाबतीत होतं. काही भूमिका एखाद्या व्यक्तीला चिकटतात आणि अजरामर होतात. तसं श्यामच्या बाबतीत झालं. छोट्या श्यामच्या चेहऱ्यावरची निरागसता वझेंच्या चेहऱ्यावर कायम स्वरुपी होती. पण ते भाबडे नव्हते. ते एक कृतिशील कलाकार होते. जागर ही त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी सुरू केलेली संस्थाही तशीच कृतिशील होती. त्यांची दुसऱ्याला दाद देण्याची हातोटी लोभसवाणी होती. त्यांच्यात परिश्रम घेणारी संशोधकवृत्ती होती. माधवसरांना नेहमी नवीन लेखकांच्या कादंबऱ्या, कवितासंग्रह याची उत्सुकता असायची. समीक्षा आणि संशोधन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत याची त्यांना जाणीव होती. नाट्यसमीक्षेच्या क्षेत्रात चिकित्सात्मक समीक्षा लिहिणारे वि.भा.देशपांडे, पुष्पा भावे, कमलाकर नाडकर्णी आणि यांच्यानंतर माधव वझे होते. त्यांनी उत्तम नाट्यसमीक्षात्मक पुस्तके लिहिली, नाट्य कलावंतांच्या मुलाखती घेतल्या. हे काम मोलाचे आहे.

सुनीला गोंधळेकर म्हणाल्या, जागर या संस्थेने प्रसंग नाट्य दर्शन या वेगळ्या उपक्रमातून त्यावेळच्या शालेय मुलांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती आणि स्वतःच्या प्रतिभेनी सादर करण्याची क्षमता घडवली. सादरीकरणानंतर एकमेकांबद्दल सकारात्मक चर्चा करण्याची सवय लावली. जागर तर्फे शिरवाडकरांच्या कथेवर आधारित नंदनवन हे नाटक हा बाल चळवळीतला एक महत्त्वाचा टप्पा होता. माधव वझेंनी कथेवरून त्याचे नाट्यरूपांतर आणि दिग्दर्शनही केले.

व्यवसायाने डॉक्टर आणि राजहंस प्रकाशनाचे एक संपादक **डॉ.सदानंद बोरसे** यांनी पुस्तक लेखनाच्या प्रक्रियेबद्दल सांगितले. अभ्यासू पण सोप्या शैलीतली माधव वझे यांची ७ पुस्तके राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केली आणि ती इंद्रधनुष्यासारखी झाली. अभिनेता, दिग्दर्शक, समीक्षक आणि नाट्य-अध्यापक या सगळ्या भूमिका या लेखनात बघायला मिळतात.

लेखक, दिग्दर्शक **सुनील सुकथनकर** महाविद्यालयीन काळात जागर या नाट्य संस्थेमध्ये वझे सरांच्या संपर्कात

आले. ते म्हणाले, जागर ही नाट्यसंस्था प्रसंग नाट्यदर्शन आणि बालनाट्य यासाठी चळवळीसारखी कार्यरत होती. त्यामुळेच त्यांच्याबरोबरच्या छान आठवणी लक्षात आहेत. नाटक हेच आपले ध्येय आहे, हे लक्षात येऊन तसा विचार पक्का झाल्यावर मी जागर संस्थेचा झालो. माधव वझे नाट्य शिबिरांमध्ये नाटक नावाची संकल्पना शिकवायचे. तिथे विद्यार्थ्यांनी नाटक बसवायचे असायचे. यातून दिग्दर्शन आणि अभिनय दोन्ही शिकता आले. वझेसर नेहमी म्हणायचे, अभिनय ही टोपी नसून ती आतून येणारी उर्मी असते, आणि यथावकाश ते लक्षात आलं.

श्रद्धांजली सभेला मोहन आगाशे, श्याम भुतकर, सदानंद मोरे, चंद्रकांत काळे, मुग्धा गोडबोले आणि नाट्यसृष्टीतले अनेक मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ नाट्यकर्मी माधव वझे यांना खरी श्रद्धांजली, चांगली नाट्यकृती सादर करणे हीच असेल म्हणून, अमित वझे दिग्दर्शित त्यांचा आवडता कार्यक्रम 'कवी जातो तेव्हा' या सभेनंतर सादर करण्यात आला. त्याला रसिकांनी भरभरून दाद दिली.

डॉ. सुनीला गोंधळेकर, *पुणे*
मोबा. ९४२३२३६४३३

स्मरण पुष्प - माधव वझेसर

गजानन परांजपे

नमस्कार,

'रंगभूमी'ची सगळी मुळाक्षरं पहिल्यांदा मी ह्यांच्याकडून, म्हणजे माधव वझे सरांकडून शिकलो. महाराष्ट्रीय कलोपासक आणि जागर मध्ये राजाभाऊ नातू, वासुदेव पाळंदे, श्याम जोशी, अशोक जोशी, माधव वझे यांच्या समक्ष ही मुळाक्षरं गिरवत, परिभाषा शिकत, नाटकाच्या निर्मितीच्या सगळ्या घटकांचा परिचय करून घेत, प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेत घेत माझा हा प्रवास सुरू झाला.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या 'दर बुधवार'च्या उपक्रमामधे सौ.प्रतिभा जोशी लिखित आणि राजाभाऊ नातू दिग्दर्शित 'पुनरपी' ह्या एकांकिकेचा प्रयोग झाला, त्यात माझी प्रमुख भूमिका होती. मला वाटतं जाणत्या वयात रंगभूमीवर पडलेलं माझं ते पहिलं पाऊल होतं. मी चुकत नसेन तर ह्या एकांकिकेपासून म्हणजे १९७६ सालापासून, ते 'प्रस्थान उर्फ एक्झिट' ह्या नाटकात साकारलेली भूमिका आणि 'ज्याचा त्याचा विठ्ठल' ह्या संगीत-चित्र-नाट्य अभिवाचनाच्या कार्यक्रमातला सहभाग, इथपर्यंतचा, म्हणजे मार्च २०२५ पर्यंतचा, माझा सगळा एकूण एक प्रवास जवळून पाहिलेली, ही एकमेव व्यक्ती होती. हक्काचा प्रेक्षक होता हा.

सदानंद रेगे ह्यांच्या 'राजा ईडीपस', गिरीश कार्नाड यांच्या 'अग्नी-जल' आणि श्याम मनोहर ह्यांच्या 'हृदय' ह्या नाटकांमधून आम्ही दोघांनी अभिनय केला; तर प्रभाकर पाटील यांचं 'अभिहत', हेरॉल्ड पिंटर हयांचं 'वन फॉर द रोड' आणि श्याम मनोहर हयांचं 'हृदय' ही नाटकं माधवरावांनी दिग्दर्शित केली ज्यात मी वेगवेगळ्या भूमिका सादर केल्या.

कसबा पेठेतल्या त्यांच्या राहत्या घरी नाटकाच्या वाचनाच्या तालामींना सुरुवात व्हायची. लेखकाची भाषा नीट बोलतो आहोत की नाही, याकडे त्यांचं बारीक लक्ष असायचं. आता सदानंद रेगे, गिरीश कार्नाड, श्याम मनोहर, प्रभाकर पाटील, हेरॉल्ड पिंटर ह्यांची नाटकातली भाषा बोलायची तर फक्त ऱ्हस्व, दीर्घ, आकार, ईकार, उकार, अनुस्वार, एवढंच माहीत असून उपयोगाचं नाही. या लेखकांची भाषा समजून घ्यायची असेल, नाटकातला त्यांचा विचार समजून घ्यायचा असेल आणि बोलायचं असेल तर ह्या लेखकांचं उपलब्ध इतर साहित्य वाचणं अत्यंत महत्त्वाचं कसं आहे हे ते समोरच्या व्यक्तिला पटवून द्यायचे. समोरच्या बोलणाऱ्या व्यक्तीचा श्वास, दमसास, स्वर-व्यंजनांचं उच्चारण, ध्वनी, नाद, आरोह-अवरोह, इत्यादि सर्व गोष्टींवर त्यांचं बारिक-सारिक लक्ष असायचं. वाचिक अभिनयसाठी ह्या गोष्टींचं किती महत्त्व आहे ह्याची प्रखर जाणीव ते ह्या सगळ्यातून करून द्यायचे. नटांच्या बोलण्याबाबत ते फार म्हणजे फार काळजी घ्यायचे. म्हणजे अगदी अक्षर न अक्षर घासून-तासून घेत असत. त्यांच्याच एका लेखात उल्लेख आहे, "मी नटांना लेखकाची भाषा अनेकदा वाचायला लावतो. मला ख्यालासारखं संथ, दमदारपणे, वळणे-वळसे घेत जाणारं नाटक भावतं. शब्द छिनून घ्यायला मला आवडतं. नटांपाशी मी तसा आग्रह आजही करत असतो".

तालमीच्या त्या खोलीमधे नाटक आणि इतर कलांच्या संदर्भातली देशी-विदेशी पुस्तकं, मासिकं, नियतकालिकं, संदर्भ ग्रंथ, टेपरेकॉर्डर, कॅसेट्स इत्यादी अशा सर्व गोष्टी असायच्या. तालमीच्या दरम्यान, नाटक आणि इतर कलांचा परस्पर संबंधं, रंगभूमीचा इतिहास, इत्यादी संदर्भात ते बोलायचे; ते त्यांचं बोलणं इतकं समरसून असायचं की नुसतं ऐकत राहावं. वाचनाच्या ह्या तालमी सुरू असतानाच, एका टप्प्यावर, नाटकातल्या विरामाच्या-शांततेच्या जागांबद्दल, नाटकातला अवकाश-काळ, नेपथ्य-प्रकाश-हालचाली, उभं राहून तालमी केव्हा सुरू करायच्या, पहिला प्रयोग केव्हा कारायचा अशा सगळ्या चर्चांना आणि नियोजनाला सुरुवात व्हायची.

तालमी संपल्यानंतर, माधवरावांच्या बरोबर **(पान ५५ वर)**

कविता

घोकंमपट्टी

ती
विद्या, कल्पना...
अशीच कुणीतरी
वगैरे वगैरे
खूप हुशार
वर्गात पहिला नंबर
मग,
दहावीनंतर
पाल कुठे चुकचुकली...

शाळा सुटली, पाटी फुटली
तिने पकडलेली...
थांबा नसलेली, बस कुठली?

प्रश्न बरेच अनुत्तरित
थांगपत्ता लागत नाही
कित्येक मुली अजूनही
दहावी नंतर शिकत नाहीत

शाळा सोडून आता
बराच काळ लोटला
सई, तुझ्या सयीचा
पाणवठाही आटला...

तुझ्या सारख्याच सौख्याच्या-
काही गहाळ झाल्या मैत्रीणी
हरवले बरेच क्षण,
लागली काळजाला कात्री...

मैत्रीण म्हणजे,
कधी बो, कट्टीबट्टी
सोबत खाल्लेली ईमली खट्टी
सोडवायचे राहून गेलेल्या,
अनिवार्य प्रश्नांची...
नुस्ती नुस्ती घोकंमपट्टी.

सत्य प्रयागबाई कुटे, *चिखली*
मो. ९८८१३१०२५८

गुलाब पाकळ्यात विस्कटलेला कवी

शब्दांच्या नाहक जाचाला कंटाळून
उभाय कवी आत्महत्येच्या तयारीत..
जगण्याला नालायक ठरलेला तो
लिहिणाराय..
कडेलोटाच्या अंतिम बिंदूवरची अखेरची कविता.
उंचावरून शरणागत होताना
व्हावा सुखद कपाळमोक्ष म्हणून,
नुकतीच दिलीय त्यानं,
काळ्याकभिन्न दगडांना गुलाबकळ्यांची उपमा..
म्हणजे
देहाच्या उडतील ठिकऱ्या...
तेव्हा फुलांच्या पाकळ्यात कवी विस्कटलाय..
असे म्हणता येईल त्याला!
पण असे काही कोणाला तरी पटवून द्यायला..
कवी जिवंत तरी असायला हवा ना...
कवी गुलाबपाकळ्यात मेला की
काळ्याकभिन्न दगडावर पडून,
हे नाहीच महत्त्वाचे...
कवी मेलाय हा विश्वास असणाऱ्या
लोकांसाठी तरी
मला कविता लिहायलाच हवीय..
नाहीतर..
प्रतिमांच्या अन् प्रतीकांच्या कुबड्यांनी
कवीने विचारपूर्वक लिहिलेली..
या लालभडक अचेतन देहाची कविता
लोकांना कशी कळणार?

रमजान मुल्ला, *सांगली*
मो.९३७२५४०९८५

एवढी मजबूत आहे माझी कविता..



न्यायाधीश महाराज!
मला फाशीची शिक्षा
सुनावण्यापूर्वी आपण
विचारली मला
माझी अंतिम इच्छा

मी म्हणालो,
'लिहीयचीय मला एक कविता.'
तुम्ही म्हणालात,
'लिहीता येणार नाही मला यापुढे एकही कविता.'

मग मी म्हणालो,
'मला वाचायचीय एक कविता.'
तेव्हा तुम्ही म्हणालात,
'वाचता येणार नाही मला एकही कविता इथून पुढे.'

मग मी म्हणालो,
'ऐकायची आहे मला
एक विद्रोही कविता.'
तीही तुम्ही म्हणालात,
'ऐकता येणार नाही मला.'

मी विचारले कारण तुम्हाला,
तुम्ही म्हणालात,
'तुमच्या विरुद्ध दाखल
केलेला आहे खटला
सरकारने राजद्रोहाचा!'

मला माहीत आहे
तुम्ही म्हणू शकत नाही
उघडपणे किंवा खासगीतही
'सरकार घाबरतेय माझ्या
लेखणीला
वाणीला
विचारांना!'

म्हणूनच तुम्ही देत नाही
परवानगी कवितेला

पण सांगतो मी तुम्हाला
तुम्ही लावलेला फासाचा
दोरखंड तुटून जाईल माझ्या कवितेपुढे

एवढी मजबूत आहे माझी कविता.

विलास गावडे, *नवी मुंबई*
मोबा. ९४२११५८१८८

बाईपणाचा अवघड प्रवास

सारिका उबाळे

माणसांचा समाज फक्त स्त्री आणि पुरुषांचाच असतो का? पुरुषाच्या शरीरात जन्म घेतलेली स्त्री अथवा उलट व्यक्ती या माणसं नाहीत का? पुरुषाच्या शरीरात घुसमटलेल्या स्त्रीला मोकळी वाट करून देण्याच्या वेदनादायी, संघर्षशील बाईपणाच्या अवघड प्रवासात अखेर डिंपलचा मृत्यू झाला. डिंपलच्या मृत्यूला पितृसत्ताक पुरुष प्रधान व्यवस्थेत बाईपणा आणि पुरुषपणाच्या साच्यापलीकडे जाऊन माणूसपणा न जोपासणारे आपण सर्वच किती आणि कसे जबाबदार आहोत याचा विचार तिच्या मृत्यूच्या मन हेलावून सोडणाऱ्या या सत्य कहाणीतून आपण करायलाच हवा.

या पुरुषप्रधान व्यवस्थेत बाईचा जन्म जेवढा अवघड तेवढाच तिचा मृत्यूही! तिचं जगणं जेवढं अवघड, तेवढाच बाईपणाचा प्रवासही.

समाज हा स्त्री आणि पुरुष दोघांचा मिळून बनलेला आहे, ही धारणा इतकी खोलवर रुजलेली आहे की एका पुरुषाच्या शरीरात जन्म घेतलेली स्त्री किंवा एका स्त्रीच्या शरीरात जन्म घेतलेला पुरुष आपली ओळख मिळवण्यासाठी जी धडपड करते / करतो त्यात त्या व्यक्तीचं आयुष्यच पणाला लागतं. त्याची झळ तेच जाणतात ज्यांनी हा जीवघेणा प्रवास सोसला आहे.

अशाच चुकीच्या शरीरात जन्म घेतलेल्या, डिंपल नावाच्या, स्त्री बनू पाहणाऱ्या एका हळव्या मुलीची ही कथा आहे. कळत्या वयापासूनच डिंपलला ती स्त्री असल्याचं जाणवू लागलं होतं. पण शरीर मात्र पुरुषाचं होतं. स्वतःच्या कुटुंबापासून ते शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ आणि समाजाशी तिला बालवयापासूनच संघर्ष करावा लागला. मानसिक कुचंबना, शारीरिक बदल, आर्थिक अडचणी आणि या सगळ्यातून आपल्याला हवं तसं शरीर बनवून घेण्याची धडपड या सगळ्यात किती वेळा हार मानून पुन्हा पुन्हा मनाला खंबीर बनवत तिचा हा प्रवास सुरू होता.

छोट्या गावात, आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या सामान्य कुटुंबात जन्मलेली डिंपल. तिला आपलं शिक्षण पूर्ण करता करताच आपलं बाई बनण्याचं स्वप्नही पूर्ण करायचंय होतं. त्यासाठी घ्यावे लागणारे औषधोपचार, महागड्या शस्त्रक्रिया, तज्ज्ञ डॉक्टर्स सगळंच तिच्या आवाक्या बाहेरचं होतं.

काही वर्षांपासून ती घेत असलेले उपचार, काही शस्त्रक्रिया, अर्धवट अपुरी माहिती आणि या सगळ्यात ती एकटी करत असलेला झगडा यात डिंपल आजारी पडली, खचून गेली. बाई होण्याचं स्वप्न पाहता पाहता, बाई बनता बनता ती स्वतःच संपून गेली.

आपल्याला स्त्री-पुरुष व अन्य कुठलं शरीर मिळावं हे आपल्या हातात नाही. निसर्गाने जे बहाल केलं ते आपण स्वीकारलं, आई-वडील, समाज, नातेवाईकांनी स्वीकारलं तर अशा कित्येक 'डिंपल' आहे तशा स्वरूपात स्वतःला स्वीकारतील किंवा आपल्या मनाप्रमाणे स्वतःत बदल करून घेऊन सन्मानाने जगतील. परंतु समाजातल्या पारंपरिक धारणा, रक्ताच्या नात्यापेक्षाही महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रतिष्ठेच्या कल्पना, सामाजिक दडपण, अशी व्यक्ती आपल्या घरात आहे याबद्दलची अपमानास्पद भावना, कुटुंबाबाहेरही त्यांचा केला जाणारा धिक्कार हे सगळं सोसताना किती जीव नकोसा होत असेल त्यांना. तरीही ते जगतात, संघर्ष करतात, कधी आहे त्या व्यवस्थेशी हात मिळवणी करून समुदायात मिसळून जातात तर कधी शिक्षण, नोकरी मिळवून सन्मानाचं आयुष्य जगू पाहतात.

काही महिन्यांपूर्वी माझी डिंपलशी ओळख झाली. तेव्हा तिचा बाई बनण्याकडचा प्रवास सुरू झाला होता, पण पूर्ण झाला नव्हता. प्रवासाच्या या मधोमध तिचा अनुभव मला चित्रित करायचा होता. त्यानुसार भेट ठरली. ती पूर्ण स्त्रीवेशात येणार होती, पण तिने तो निर्णय बदलला. "मॅडम, मी जेव्हा संपूर्ण स्त्री होईन तेव्हा आपण पुन्हा एकदा मुलाखत करू." असं ती म्हणाली.

शेवटी, ठरल्याप्रमाणे मुलाखत झाली. या मुलाखतीत स्त्री बनण्याच्या प्रक्रियेत मधोमध पोहचलेल्या एका तरुण मुलाची, पुरुषाची संवेदना, अनुभव आणि संघर्ष चित्रित झालेला आहे. 'मुक्ता' या यूट्यूब चॅनलवर डिंपलची ही मुलाखत अपलोड करण्यात आली होती.

डिंपलच्या मृत्यूने कितीतरी अनुत्तरीत प्रश्न पुन्हा एकदा अनुत्तरीतच राहतात.

डिंपल आपल्या समस्यांशी, आपल्या आजाराशी एकटीच झुंजत होती. मर्यादित ज्ञान, त्यांच्या जेंडरकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, त्यामुळे वाटणारा संकोच, आर्थिक परिस्थिती अशा कितीतरी गोष्टींमुळं तिने स्वतःसुद्धा आपल्या आजाराविषयी कुणाला सांगितलं नाही. तिच्याशी चांगली ओळख, चांगली मैत्री

असून सुद्धा तिच्या आजाराविषयी मला कळू शकले नाही. याची खंत मनात कायम राहील. कदाचित कळलं असतं तर आयुष्याच्या शेवटच्या दिवसातली तिच्या मनाची घुसमट ती आम्हाला सांगू शकली असती का?

मोठ्या शहरात किंवा अत्याधुनिक वैद्यकीय सेवा तिला पुरवता आल्या असत्या का? जीवन जगण्याची आर्तक्य ओढ असणाऱ्या ह्या कोवळ्या पोरीला वाचवता आलं असतं का?

डिंपलला आयुष्यात खूप गोष्टी करायच्या होत्या. तिला तिचं शिक्षण पूर्ण करायचं होतं, साहित्यात तिला चांगलीच रुची होती, तिला स्वतःचं यूट्यूब चॅनल काढून त्यावर कवितांचं अभिवाचन करायचं होतं. विशेषतः ट्रान्सजेंडर व्यक्तींनी लिहिलेल्या कविता त्यांच्या प्रश्नांविषयीच्या कविता त्यातून जगासमोर मांडायच्या होत्या.

चांगला जीवनसाथी शोधायचा होता जो तिच्यावर मनापासून प्रेम करेल, तिला समजून घेईल.

कुटुंबाकडून, नातेवाईकांकडून तिच्या आजारी असण्याविषयी गुप्तता बाळगण्यात आली का? तिला काहीतरी कॅन्सर सारखा दुर्धर आजार झालेला आहे आणि त्यामुळे तिचा मृत्यू झाला, अशी बतावणी करत तिच्या कुटुंबीयांनी तिच्या मृत्यू विषयी सावधानता, गोपनीयता, शांतता बाळगली का? तिच्या मृत्यूनंतर फारसे सोपस्कार न करता घाई-गडबडीत तिचा अंत्यविधी उरकण्यात आला का? आपला मुलगा तृतीयपंथी होता, त्यामुळे त्याच्या दहन विधीला तृतीयपंथी लोक येऊन काही गडबड करतील का? त्याची तृतीयपंथी असण्याची गोष्ट जगाला माहीत होईल का? किंवा एकूणच त्या समुदायाविषयी असणारे गैरसमज या सगळ्या बाबींमधून तिच्या सामान्य, अशिक्षित कुटुंबियांच्या मनात एक प्रकारची भीती दडली होती का?

असे अनेक प्रश्न त्यावेळी मनात उद्‌भवले.

एलजीबीटीक्यू व तृतीयपंथी समुदायातील व्यक्तींविषयी कुटुंबातसुद्धा खूप जिव्हाळा किंवा आपुलकी वाटत नसल्याचे तिच्यासारख्या अनेकांबाबत जाणवतं.

एखादं अपंग किंवा मानसिकरीत्या कमजोर अपत्य, ज्याची सेवा सुश्रुषा करून कुटुंब, नातेवाईक कंटाळलेले आहेत अशा अपत्याच्या मृत्यूने सुटका झाल्याचा जो अविर्भाव त्याच्या कुटुंबीयांमध्ये दिसतो तसाच काहीसा अविर्भाव तिथे जाणवत होता.

या व्यतिरिक्तही डिंपलचा मृत्यू अनेक सामाजिक प्रश्नही उभे करतो.

१. ट्रान्स समुदायातील व्यक्तींसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी प्रशासनात कुठलीही स्वतंत्र सोय नाही.

२. त्यांना नोकरीत कुठलेही आरक्षण नाही,

डिंपलच्या स्मृतीला प्यारभरा सलाम!

३. लिंग परिवर्तन करण्याच्या शस्त्रक्रियेबद्दल अल्प दरात वैद्यकीय सेवा पुरवणारी कुठलीही सरकारी वैद्यकीय यंत्रणा अस्तित्वात नाही.

४. सार्वजनिक जीवनात त्यांच्या गरजा समजून घेणारी कुठलीही यंत्रणा नाही.

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'तू सुद्धा आमच्यासारखीच एक व्यक्ती आहेस, माणूस आहेस, भिऊ नकोस आम्ही सगळे तुझ्या सोबत आहोत!' हा विश्वास त्या व्यक्तीला कुटुंब (अपवादाने काही अपवाद असू शकतात.), संस्था, शाळा, महाविद्यालये वा कुठलीही सामाजिक संस्था देत नाही.

जन्माला आलेलं बाळ हे स्त्री किंवा पुरुष असेल तरच त्याला सन्मान मिळतो अन्यथा ते कुचेष्टेचा विषय बनतं. त्याला आयुष्यभर अवहेलना, अपमान सोसावा लागतो.

त्यांना आहे तसं स्वीकारायला हवं. समाजाने, कुटुंबाने. प्रत्येक व्यक्तीने त्यांना प्रेम, आपुलकी, माया आणि सन्मान द्यायला हवा.

प्रत्येक जीवाला सन्मानाने जगण्याचा हक्क आहे! त्याला तसं जगू द्या!

'डिंपल, तू म्हणाली होतीस, "मॅडम आता माझं शरीर, माझे हात-पाय हळूहळू तुमच्यासारखे होत आहेत." किती आनंदी होतीस तू... तुला संपूर्ण स्त्री झालेलं बघायचं होतं मला... कुठे निघून गेलीस; तुझं अर्धवट स्वप्न माझ्या मनात जिवंत ठेवून...!'

तुला 'भावपूर्ण श्रद्धांजली' तरी कसं म्हणू ?

https://youtu.be/lXZTjMlf8PY?si=E-vtElZIY6dQi3Bb

सारिका उबाळे, *अमरावती*
९४२३६४९२०२

नोटबुक

मी नाकारलेलं 'स्थळ!'

अपर्णा महाजन

वरिष्ठ महाविद्यालयात विशीच्या आतली मुलं-मुली असतात. शरीराबरोबर त्यांचं मनही बदलत असतं. त्यांना नव्या अनामिक जाणिवांचं भान येऊ लागलेलं असतं. नातेसंबंध, मैत्री, प्रेम, करिअर, लग्न यांविषयी प्रश्न निर्माण होतात; पण त्यांची उत्तरं कशी शोधायची, हे माहीत नसतं. अशावेळी त्यांच्या मनात होणाऱ्या विचारांच्या कोलाहलाला नावं न ठेवता, त्यांना समजून घेतलं, तर एक विश्वासाचं नातं निर्माण होतं आणि त्यांनाही विचार करण्याला दिशा मिळते. क्वचित कधी वादळी घटना त्यांच्या आयुष्यात आल्या, तर त्यांना दोषी न ठरवता, त्यांना अपराधी वाटू न देता त्यांच्याबरोबर कोणीतरी असण्याने एकमेकांमधले नाते संबंध सुदृढ होतात. माझ्या 'प्राध्यापक' म्हणून असलेल्या महाविद्यालयीन दिवसांत मला माझ्या विद्यार्थ्यांशी बोलताना, चर्चा करताना जसं ते समजत गेलं, तसं त्यांना समजून घेण्याच्या प्रयत्नात मला स्वतःलाही समजून घेण्यास मदत झाली. चाकण या निमशहरी भागातल्या महाविद्यालयात ती जायला लागल्यापासून निवृत्त होईपर्यंतच्या २५ वर्षांच्या मार्गात, प्रवासात आलेल्या व्यक्तींनी, प्रसंगांनी, अनुभवांनी लेखिका अपर्णा महाजन हिला खूप शिकवलं, मोठं केलं. त्या अनुभवाचं हे 'नोटबुक'! अपर्णाचं नोटबुक आपल्यालाही बरेच धडे देईल, या विश्वासासह नक्की वाचावं असं हे नवं सदर.

'ए, ती बघ... स्कूटरवर बाई चाललीय... स्कूटरवर बाई...' असा आरडओरडा करत सरकारी शाळेतील पाचवी–सहावीत असलेली मुलं-मुली गलका करत रस्त्याकडेने माझ्याकडे बघत होती. डोळ्यांत कुतूहल, गंमत बघण्याचा भाव आणि एकत्र असल्यामुळे आरडओरडा करण्याची मुळीच भीती नाही... रस्त्यावरची मंडळी माझ्याकडे बघत होती. त्यांच्याही डोळ्यांत या लहान मुलांसारखंच जरा औत्सुक्य होतं. सुरुवातीच्या दिवसांत मी थोडी गोंधळून गेले... पण नंतर मी त्यांच्याकडे बघून हसून त्यांना टाटा करू लागले. तोसुद्धा एक नेहमीचा खाक्या झाला. त्यांच्या शाळेवरून पुढे जाऊन माझं कॉलेज होतं. मी तळेगावला राहते. तळेगावपासून २५ किलोमीटर अंतरावर असलेलं चाकणमधलं माझं कॉलेज. साल १९९६. त्या कॉलेजचं नाव- 'चाकण शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय.' कॉलेजमधील माझी ओळख होती- 'बॉयकटवाल्या, ड्रेस (म्हणजे पंजाबी ड्रेस) घालणाऱ्या मॅडम!' सुरुवातीला बिचकत एक-दोघींनी मला विचारलं होतं, 'तुम्ही ख्रिश्चन आहात का?' अशा अनपेक्षित प्रतिक्रियांनी माझ्या चाकणमधल्या सिनिअर कॉलेजमध्ये शिकवायला जाण्याची सुरुवात झाली.

अपर्णा महाजन

मी त्या कॉलेजमध्ये २५ वर्षं अध्यापन करत होते. शिकवता शिकवता मी कितीतरी गोष्टी शिकले. १९९६ ते २०२० या प्रदीर्घ कालावधीत मी त्या कॉलेजमध्ये होते. त्या आधी मी तळेगावच्या 'इंद्रायणी महाविद्यालया'त ज्युनिअर कॉलेजमध्ये अर्ध वेळ आणि एक वर्ष लोणावळ्याच्या कॉलेजमध्ये शिकवून या कॉलेजमध्ये आले होते. खरं तर, या कॉलेजमध्ये न येण्याचा माझा निर्णयही झाला होता. मात्र, हळूहळू ते महाविद्यालय आणि तिथले विद्यार्थी माझ्या आयुष्याचा एक आवडता भाग बनले.

हे कसं काय असं झालं?

आताशा मला खात्री झाली आहे की, प्रत्येकच वय हे त्या-त्या 'वयात येण्याचं' वय आहे. प्रत्येकच 'वरीस धोक्याचं' असू शकतं. आजूबाजूचं कोणीतरी आपल्याला त्या-त्या वयात आदर्श वाटत असतात. कोणाचा नीटनेटकेपणा, कोणाचं स्वयंपाकामधलं प्रावीण्य, राजकीय मतं, हुशारी, 'सेन्स ऑफ ड्रेसिंग', मुलांना वाढवण्याची पद्धत, आणि अशा किती म्हणून गोष्टी आठवाव्यात! कोणाचं गारुड आपल्याला मंत्रमुग्ध करेल, तिकडे नकळत आयुष्याचं सुकाणू वळतं आणि दिशा बदलते, मूल्यं बदलतात, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. त्यामुळे क्वचित आपलेच आपल्याला परके वाटू लागतात. तसंच, कधी कारणाने किंवा कधी विनाकारण कोणीतरी आदर्श वाटू लागतात. नंतर

वाढत्या वयानुसार, परिपक्वतेनुसार ते बदलतही राहतात; पण दिशा दाखवायला, त्यामुळे आयुष्य बदलायला 'ते' कारणीभूत झालेले असतात. असे आपले आवडते हिरो, मॉडेल्स, मेंटॉर्स आणि आदर्श आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर असतात. आत्ताही पासष्टाव्या वर्षी माझ्या मनात अशा काही व्यक्ती आहेतच.

माझ्या लग्नानंतर पंचविशीतल्या माझ्यापुढे मुलांना जन्म देणं हे एक फूलझाड फुलवण्यासारखं आहे, पहिली दहा वर्षं मुलांसाठी द्यायलाच पाहिजेत यांसारख्या विचारांनी मला प्रेरित केलं होतं. मुलं ही माझ्या आयुष्याचा केंद्रबिंदू होती. त्यांच्या दिनक्रमानुसार मी इतर गोष्टींचा प्राधान्यक्रम ठरवला होता. त्यावेळी मी तळेगावातल्या इंद्रायणी महाविद्यालयात अर्धवेळ नोकरी करत असे. मी व्यवस्थापनातल्या अधिकाऱ्यांना आणि प्राचार्यांना विनंती केली होती की, काही दिवस/महिने महाविद्यालयात माझ्यावर असलेली जबाबदारीची सगळी कामं मी पूर्ण करीन. माझे तास झाल्यावर चार तास सलग न थांबता, माझं काम झाल्यावर मला घरी जायची परवानगी द्या. मला तशी परवानगी मिळालीदेखील. पण काही दिवसांनी प्राचार्यांनी मला बोलावून सांगितलं की, इतर प्राध्यापकांची तुमच्या लवकर घरी जाण्याबद्दल तक्रार आहे. मी नम्रपणे सरांना सांगितलं, 'मला जेव्हा जमेल तेव्हा मी तुम्ही न सांगता, लवकरात लवकर मी पूर्णवेळ थांबेन; पण आत्ता मला खरंच शक्य होणार नाही.' ते म्हणाले, 'माझा नाइलाज आहे.' मी म्हणाले, 'मग मी काय करू?' त्यांनी 'राजीनामा द्या,' असं सांगितलं. मी दुसऱ्या क्षणी, घरी न विचारता, न सांगता राजीनामा लिहून दिला आणि आनंदात घरी आले. माझ्या सासरच्या लोकांना माझ्या कृत्याचं आश्चर्य वाटलं होतं. विशेषतः माझी मोठी जाऊ बँकेत नोकरी करून पैसे मिळवीत असे, तिच्या मुलांना ती पाळणाघरात ठेवत असे. त्यामुळे माझा आईपणा निभावण्याचा मी अतिरेक करते आहे, असं सगळ्यांना वाटलं; पण मी माझ्या ध्येयापासून विचलित झाले नाही. अर्थात, माझ्या निर्णयात विदुरचा (पती) पूर्ण पाठिंबा होता. गंमत म्हणजे, जेव्हा हे व्यवस्थापनाला कळलं, तेव्हा त्यांचा मला फोन आला, आणि मला परत बोलावलं. प्राचार्यांचा पण फोन आला. आणि एक दिवसाच्या सुटीनंतर मी पुन्हा अर्धवेळ शिकवायला सुरुवात केली. दिवाळीच्या सुटीनंतर मी पूर्णवेळ थांबूही लागले. मग सहा/सात वर्षं इमानदारीत शिकवलं. एव्हाना माझी मुलं मोठी झाली होती.

आता मला ११वी-१२वीची पाठ्यपुस्तकं शिकवण्यापेक्षा साहित्य शिकवावं, असं वाटलं. तोच, मला लोणावळ्याला अर्धवेळ सिनिअर आणि अर्धवेळ ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकवण्याची संधी मिळाली. मी तेव्हा जॉर्ज ऑरवेलचं अनिमल फार्म, सेंट जॉन आणि रोमॅण्टिक पोएट्री शिकवली होती. साहित्य शिकवण्याची चव लागल्यामुळे आता सिनिअर कॉलेजमध्ये नोकरी मिळावी, असं मनापासून म्हणजे, खूपच मनापासून वाटत होतं.

ते १९९५ साल होतं. त्यावेळी आमचा एक ज्येष्ठ मित्र विनय हर्डीकर घरी आला होता. त्याने मला शेतकरी संघटनेच्या शरद जोशी यांच्या चाकणच्या कॉलेजविषयी सांगितलं. त्याच्या बोलण्यातल्या पटवून देण्याच्या पद्धतीमुळे मी दोन अर्धवेळ नोकऱ्या करण्यापेक्षा एक पूर्णवेळ सिनिअर कॉलेजला नोकरी करावी, असं वाटलं. मला लोणावळा कॉलेजमध्ये पैसे कमी मिळत असले, तरी ते सोडावंसं वाटत नव्हतं. तरी विनयच्या, 'एकदा चाकणचं कॉलेज बघून ये,' या सल्ल्यानुसार, मी आणि विदुर कॉलेज बघण्यासाठी चाकणला गेलो. त्यावेळी चाकण हे खूपच छोटं गाव होतं. आता त्याचं स्वरूप खूप बदललं आहे.

तळेगावच्या त्या दिशेच्या रस्त्यांना मी कधीच गेले नव्हते. दोन बसेस एकावेळी मावतील, इतका छोटा व कच्चा रस्ता, रस्त्याकडेने प्राचीन वृक्ष, पुढेपुढे दोन्ही बाजूंनी दिसणारी शेतं, मे महिना असल्याने शेतात दिसणाऱ्या लाल-लाल कांद्यांच्या मोठ्या राशी, असा छान सहलीसारखा प्रवास करत आम्ही चाकणला पोहोचलो. तिथून आणखी दोन-अडीच किलोमीटर दूरच्या अंतरावर ते कॉलेज होतं.

मी दुरून कॉलेज बघितलं. एक इंग्रजी 'एल' अक्षराची छोटी इमारत म्हणजे ते महाविद्यालय. मनाचा निर्णय होत नव्हता. इतक्या लांब आलोच आहोत, तर प्राचार्यांना भेटून जाऊ, म्हणून आम्ही शेतकरी संघटनेचे काम करणारे, शरद जोशी यांचे स्नेही व तत्कालीन प्राचार्य सुरेशचंद्र म्हात्रे यांना भेटलो. त्यांचं खणखणीत बोलणं ऐकत असताना आम्हाला ते सर आवडले. शरद जोशींनी ते महाविद्यालय का सुरू केलं, त्यांच्या आकांक्षा काय आहेत, हे ऐकताना माझ्या डोळ्यांपुढे काही चित्रं उमटू लागली. जेव्हा म्हात्रेसरांनी सांगितलं, की इथे बहुतांशी लोक शेतकरी आहेत. त्यांची मुलं, कामानिमित्त, शिक्षणानिमित्त बाहेर पडतात; पण मुलींना मात्र ती संधी मिळत नाही. त्यांना आणि इतर वंचित विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावं, तसंच या परिसरात प्रयोग व्हावेत या हेतूने शरद जोशी यांनी इतरांशी विचार विनिमय करून महाविद्यालय उभं करण्याचं ठरवलं. निसर्गाला हानी न पोहोचवता तिथे चांगलं ऑडिटोरीअम, एक छान स्टेडियम करावं असं त्यांचं नियोजन होतं, हे मी ऐकलं होतं. (पुढे शिक्षण क्षेत्रामध्ये होणारे बदल न पटल्याने जोशी यांनी व्यवस्थापनातून अंग काढून घेतलं).

मी अर्ज दिला. थोडं जास्तच दूर असलेलं कॉलेज... कॉलेजला अनुदान मिळालं नव्हतं; पण मिळणार होतं. पगार फारच कमी मिळणार होता. शिवाय जाण्या-येण्याचा त्रास इथे आवडण्यासारखं काय आहे?, इथले विद्यार्थी कसे असतील?, मी

त्यांच्यापर्यंत पोहोचू शकेन का? अशा वैचारिक आणि भावनिक घुसळणीतून परतीच्या प्रवासात मी विदुरला माझा भावनिक निर्णय दिला, 'मी नाही येणार इकडे शिकवायला!'

पुढचे आठ दिवस लोणावळा की चाकण याच 'स्वॉट ॲनालेसिस' करण्यात घालवले. 'शिपिंग कोर्पोरेशन'मधले शरद साठे नावाचे खूप मोठ्या पदावर काम करून निवृत्त झालेले माझे ज्येष्ठ मित्र होते. त्यांच्याशी मी माझ्या, मुलांच्या भवितव्याबद्दल, समाजात असलेल्या प्रथांबद्दल, वेगवेगळ्या खाद्यपदार्थांबद्दल आणि वाट्टेल त्या विषयांवर गप्पा मारत असे. त्यांची विचार करण्याची पद्धत मला आवडत असे. माझी अस्वस्थता मी त्यांना सांगितली. त्यांनी मला 'मुलाखतीला जाऊन तर ये,' असा सल्ला दिला. इंद्रायणी कॉलेजमधले माझे प्राध्यापक मित्र ताटे सर यांच्याशीही मी चर्चा केली. ते म्हणाले, 'इथे या कॉलेजमध्ये पैसे कमी असले, तरी त्या पदाच्या पात्रतेच्या निकषांमध्ये तुम्ही शंभर टक्के बसता आहात. खुली जागा, पूर्णवेळ नोकरी अशी संधी सहज मिळणार नाही. कॉलेजला अनुदान मिळाल्यावर तुम्हाला पगारही चांगला मिळेल. तुम्ही होकारार्थी विचार करा.'

साठे आणि ताटे यांच्यामुळे पुन्हा आयुष्याच्या सुकाणूने दिशा फिरवली आणि मी चाकणच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयात मुलाखतीसाठी गेले.

आधी तिथे शिकवत असलेले एक सर मला म्हणाले, 'तुम्ही थांबू नका. नोकरी मलाच मिळणार आहे. ८८ पासून मीच आहे इथे.' मी म्हटलं, 'इतक्या लांब आलेच आहे, तर मुलाखतीचा अनुभव तरी घेऊन जाईन.' त्यांच्या सांगण्यामुळे काही उमेदवार निघून गेले होते. मला पत्र आलं आणि त्यात पहिलं प्राधान्य दुसऱ्याच कोणाला तरी मिळाले होते. (त्या 'आधीपासून शिकवणाऱ्या' सरांचं नाव पहिल्या तीनही क्रमांकांत नव्हतं!) माझा दुसरा नंबर होता. मला आता पुन्हा लोणावळ्याला जायला मिळणार, याचा मनस्वी आनंद झाला. मी पुन्हा तळेगाव-लोणावळा अशी ये-जा करू लागले. मात्र, पुढच्या आठ-दहा दिवसांत मला पुन्हा एक पत्र आलं. पहिल्या प्राधान्याच्या उमेदवाराने रुजू होण्यास नकार दिला होता. म्हणून रीतसर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मला त्यांनी नोकरी देऊ केली होती. पुन्हा सगळी चर्चा आठवली आणि मी अश्रू भरल्या डोळ्यांनी लोणावळा कॉलेजला निरोप देऊन चाकणचा रस्ता पकडला.

पहिल्या दिवशी एसटीने पाच रुपयांचं तिकीट काढून चाकणला गेले. तिथून अडीच किलोमीटर चालत निघाले. मात्र, कॉलेज वाटावं, असं तिथे मला काहीच जाणवलं नाही. न तरुणांची गर्दी, न रहदारी न काहीच. एक दाढीवाला तरुण मनुष्य मागे हात बांधून निवांत त्या रस्त्याने चालला होता. म्हणून मी त्याला विचारलं, 'कॉलेज किती लांब आहे अजून?' तो म्हणाला, 'चला, मी तिकडेच चाललो आहे.' त्याच्याकडे वही-पुस्तक वगैरे काहीच नव्हतं. मी म्हटलं, 'काय करतोस तू तिथे? यावर तो म्हणाला, 'मी विद्यार्थी आहे.'

माझ्या त्या भावी विद्यार्थ्याबरोबर मी कॉलेजमध्ये पोहोचले.

एका शिपायाने एका लोखंडी पट्टीवर हातोडा मारून घणघणघण बेल वाजवली. मधल्या सुट्टीत मोजकी काही मुलं बाहेर पडली. मी एका झाडाखाली उभी राहून बघत होते. मी मनातून सैरभैर झाले... विनय म्हणाला होता, 'तुझं चांगलं बस्तान बसलं, तर इंग्रजी विषयातला पहिला पदवीधारक तुझ्यामुळे होईल.' मनात आलं- मला इथली मुलं कसं स्वीकारतील? मला या मुला-मुलींना शिकवता येईल का? खरं सांगायचं, तर उगाचच रडू आल्यासारखं होत होतं. लोणावळा कॉलेजची आठवण येत होती.

त्याच दिवशी प्राचार्य सरांचं अभिभाषण होणार होतं. तोपर्यंत वर्ग गच्च भरेल, इतकी मुलं तिथे आली होती. मी भांबावून सगळं आजमावून घेण्याचा प्रयत्न करत होते. त्या वेळी इतक्या दूरवरच्या कॉलेजमध्ये शिकवायला आलेली मी एकुलती एक महिला प्राध्यापक होते. इतर प्राध्यापक आले, आणखीही इतर कोण-कोण होते. प्राचार्यसरांनी मला अचानक 'आता तुम्ही बोला विद्यार्थ्यांशी...' असं सांगितलं. हे तर खूपच अनपेक्षित होतं.

पण त्यामुळे मला सगळ्यांना एकत्र समोरून बघण्याची संधी तेव्हा मिळाली. अतिशय साध्या कुटुंबांतून आलेल्या मुला-मुलींकडे बघताना त्यांच्या डोळ्यांतला निरागस भाव, त्यातून दिसणारे चमचम डोळे आणि हे कॉलेज आपल्याला 'मोठ्ठं' करणार आहे, हा (भाबडा) विश्वास मला दिसला. मला एका कवितेतल्या पक्ष्याच्या पिल्लाची आठवण आली. अंडं हेच विश्व असणारं पिल्लू अंड्यातून बाहेर पडतं, तेव्हा त्याचं उबदार, गुबगुबीत घरटं हे त्याचं विश्व असतं. घरट्याच्या तोंडाशी जाऊन आई-बाबांची वाट बघणाऱ्या पिल्लाला झाड हेच विश्व आहे असं वाटतं. जेव्हा ते उडायला लागतं, तेव्हा त्याला अफाट विश्वाची कल्पना येते. माझ्या भाषणात या कवितेचा उल्लेख करून मी म्हटलं, 'हे कॉलेज तुमचं असंच घरटं आहे, जिथे तुम्ही सुरक्षित आहात, आणि बाहेरच्या विश्वात जाण्यासाठी तुमच्या पंखामध्ये बळ येण्यासाठी आम्ही सगळे तुम्हाला मदत करणार आहोत, हा विश्वास बाळगा.' त्यांनी विश्वास ठेवला की नाही मला माहीत नाही; पण मी मात्र त्यांच्या मनातल्या विश्वासाला जागून मनापासून, अभ्यास करून त्यांना शिकवायला सुरुवात केली.

हेच ते मी नाकारलेलं; पण नंतर आत्मीयतेने स्वीकारलेलं स्थळ.... 'माझं कॉलेज!'

अपर्णा महाजन, *तळेगाव दाभाडे*
aparnavm@gmail.com

काफिला...

सुभाष

रोहिणी भट-साहनी

जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्वतःचं जगणं शब्दबद्ध करावं वाटतं तेव्हा एक समाजातील धागा जणू मांडायचा असतो, कारण कुठल्याही व्यक्तीचं आयुष्य हे वैयक्तिक नसतं तर राजकीय-सामाजिक असतं. काहींना विशिष्ट धार्मिक-जातीय पार्श्वभूमीमुळं शोषित आयुष्य जगावं लागलेलं नसतं तरीही त्या व्यक्तीची सामाजिक जडणघडण समाजाशीच जोडलेली असते, त्यामुळं पुन्हा एक सकस आत्मचरित्र वाचकांच्या समोर घेऊन येत आहोत... काफिला!

मार्च महिन्यात १९७३ साली मी मॅट्रिक झाले आणि कॉलेजला जायला लागले. १९७४ साली जयप्रकाश नारायण यांची भ्रष्टाचारविरोधी चळवळ बिहारमधे सुरू झाली. हळूहळू ती चळवळ गुजरातमध्ये पसरली. १९७५ सालच्या जून महिन्यात अलाहाबाद कोर्टानं इंदिरा गांधी यांना निवडणुकीच्या कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवलं आणि जयप्रकाश नारायण यांनी देशभर संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. त्यांनी देशभर बंडाची मोठी लाट उभारली. मला तेव्हा असं वाटत असे की हे आंदोलन खूप महत्त्वाचं होतं. पण या आंदोलनाचे नेते मार्क्सवादी विचारसरणीनुसार 'कामगार' नसल्यामुळे आणि आंदोलनाचा केंद्रबिंदू भ्रष्टाचार विरोध असल्यामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्ष या आंदोलनात सामील झाला नव्हता. हे आंदोलन जेव्हा आम जनतेत - अगदी जवानांपर्यंत, पोलिसांपर्यंत पोचलं, तेव्हा २५ जून १९७५ रोजी इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आणीबाणीला पाठिंबा दिला. मी माझ्या काकांबरोबर रोज वाद घालत असे की जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाला आपण पाठिंबा दिला पाहिजे आणि आणीबाणीला विरोध केला पाहिजे. कधी ते माझ्याबरोबर सहमत असत. कधी नसत. देशात आणीबाणी जाहीर झाली आणि शहादा चळवळीतले कितीतरी कार्यकर्ते पकडले गेले. मला आठवतं, मी तुळशी परबला भेटायला मुंबईच्या आर्थर रोड जेलला गेले होते.

देशात आणीबाणी होती आणि एका वेगळ्याच राजकीय कालखंडातून देश जात होता. पण माझ्या जीवनात एक नवीनच वादळ निर्माण होत होतं. १९७५ साली मराठी साहित्य संमेलन कऱ्हाडला झालं होतं. मी आणि काका नेहमीसारखे आमच्या पुस्तकांच्या पिशव्या घेऊन त्या साहित्य संमेलनाला गेलो होतो. मी खांद्यावर पुस्तकांची पिशवी घेऊन सगळ्या मैदानात हिंडत असे. पुस्तकं दाखवत असे आणि त्यांची विक्री करत असे. हिंडता हिंडता मी एका मित्रांच्या गोल करून जमिनीवर बसलेल्या एका ग्रुपकडे गेले. ते सगळे तरुण मुंबईहून आले होते. ते कोण होते याची मला काहीच कल्पना नव्हती. त्यांनी मला जवळ बसवून घेतलं. पुस्तकांविषयी विचारलं, माझ्या वडिलांविषयी विचारलं, अभिनव प्रकाशन त्यांना माहीत होतं, पण माझ्या वडलांची त्यांची काही ओळख नव्हती. त्यांनी बरीचशी पुस्तकं घेतली. मला तो सगळा ग्रुप त्यांच्या थट्टा विनोदासकट खूप आवडला. मला वाटलं होतं की ती युवक क्रांती दलाची पोरं होती.

सांगायची गोष्ट अशी की त्या ग्रुपमधला एक युवक मला विशेष आवडला. तो इतरांपेक्षा थोडा शांत होता, पण त्याची विनोदबुद्धी खूप आकर्षक होती. दिसायला पण तो तसा हँडसम होता. त्या सगळ्या ग्रुपबरोबर माझी जवळीक झाली. आपण मुंबईला गेल्यावर भेटू जरूर हे सगळं बोलणं झालं. त्या तरुणाने त्याचा फोन नंबर एका बारक्याशा कागदावर लिहून मला दिला. ज्या दिवशी ते सगळे मुंबईला जायला निघणार होते त्या दुपारी मी त्यांना बाय करायला त्यांच्या गाडीजवळ गेले. त्या तरुणाने एका हाताने मागून माझी मानगूट धरली. मला म्हणाला, "आपण मुंबईला गेलो की भेटू. मला फोन कर. हा माझ्या ऑफिसचा फोन आहे."

तो निघून गेल्यावर माझ्या मनात एक वेगळीच हुरहुर वाटू लागली. मी त्याला मिस करायला लागले. मी कॉलेजमध्ये असताना, मी कम्युनिस्ट पार्टीचं काम करत असताना, मी मागोवा ग्रुपच्या मीटिंगला जात असताना, काकांच्या दुकानात बसलेली असताना, काही तरुण माझ्याकडे आकर्षित होत असत. पण मला त्यांच्याविषयी कधीच अशी हुरहुर वाटली नव्हती. हे काहीतरी नवीनच माझ्या हृदयात सुरू झालं होतं. त्याने दिलेला फोन नंबर लिहिलेला छोटासा कागद मी जपून ठेवला.

कधी नव्हे ते मी परत मुंबईला जाण्याची वाट पाहायला लागले. मी आणि काका कऱ्हाडहून घरी मुंबईला आलो. आणि दुसऱ्याच दिवशी मी त्याला फोन केला. आम्हाला - विशेषतः मला - फोनवर काही बोलताच येईना. फोनवरच्या थोड्या शांततेनंतर

तोच म्हणाला, “आपण भेटू या का?” मी म्हणाले, “चालेल. कुठे भेटू या?” तो म्हणाला, “दादरला.” मी लगेच तयार झाले. त्याला भेटायला जायच्या आधी मी नुसती कापत होते. कपडे काय घालू... कपडे काय घालू हा कधी नव्हे तो माझ्या मनात गोंधळ. शेवटी मी माझी एक आवडती कॉटनची साडी नेसली. दादरला ठरलेल्या वेळेवर पोचले. तो माझी वाटच बघत होता. आम्ही टिळक ब्रिज ओलांडून दादरच्या पलीकडच्या साईडला चालायला लागलो. तो म्हणाला, “कुठेतरी चहा घेऊ या का?” मी एखाद्या जादूगाराने 'चहा' म्हणावं तशी संमोहित झाले होते. “हो”, म्हणाले. मग आम्ही एका हॉटेलमध्ये जाऊन बसलो. चहा मागवला. मी पाहिलं त्याचे डोळे रात्री न झोपल्यासारखे तांबरले होते. म्हणाला, “रात्री झोप नाही आली.” “मला पण नाही आली.” मी म्हणाले. चहा प्यायलो. आता? तो म्हणाला, “चल, चौपाटीवर फिरायला जाऊ.” मी मान हलवली. चौपाटीवर वाळूवर जाऊन बसलो. थोड्या वेळाने तो काही बोलण्याच्या आत मी त्याच्या ओठांकडे वळले. आणि सरळसरळ त्याला किस केलं. तोच लाजला. आणि म्हणाला, “चल, आपण त्या भिंतीकडे जाऊन बसू.” आम्ही उठलो आणि त्या भिंतीकडे जाऊन टेकून बसलो. मी त्याच्या बाहुपाशात विसावले.

त्या तरुणाचं नाव होतं सुभाष. सुभाष तेंडले. आणि तो एक कमर्शिअल आर्टिस्ट होता. एका ॲडव्हर्टायझिंग एजन्सीत तो आर्टिस्ट म्हणून काम करत असे. आम्ही मग जवळजवळ रोजच भेटायला लागलो. एकमेकांच्या जोरात प्रेमात पडलो. मी नेहमी चौपाटीवर त्याच्याबरोबर फिरत असे. घरी यायला मला उशीर होत असे. आई विचारायची, “कुठे गेली होतीस?” मी सांगायची, “मी मैत्रिणीकडे गेले होते.” “तुझी मैत्रीण काय वाळूत राहते?” माझ्या चपलेतली वाळू बघून आई म्हणायची. हळूहळू माझ्या आईवडलांना माझं प्रेमप्रकरण लक्षात यायला लागलं. एकदा काका आणि मी घरी असताना काकांनी सहज विचारलं, “तू काय एकदम प्रेमात पडली आहेस का?” मी, “हो” म्हणाले आणि त्यांना मी कन्हाडला त्याला आणि त्याच्या ग्रुपला कशी भेटले ते सांगितलं. काका काही बोलले नाहीत. आई मात्र हळूहळू मला खोदून खोदून विचारायला लागली. मी तिलाही सांगितलं. तो कमर्शिअल आर्टिस्ट आहे. डाव्या विचारसरणीचा आहे. त्याचे वडील आर्टिस्ट आहेत. ते माझ्याच आर. एम. भट शाळेत चित्रकलेचे शिक्षक होते. त्याला दोन बहिणी आणि एक भाऊ आहे. पण मी जेव्हा महत्त्वाची गोष्ट सांगितली, की तो माझ्यापेक्षा ९-१० वर्षांनी मोठा आहे, तेव्हा आईची मोठी चलबिचल झाली. हळूहळू तिची चलबिचल माझ्या या प्रेमप्रकरणाच्या आणि पुढे कदाचित होऊ घातलेल्या लग्नाच्या विरोधात तीव्र व्हायला लागली. तिचं म्हणणं असं होतं, की तो आहे मोठा. त्याचं जीवन आता सेटल झालंय. तू आहेस अजून लहान. तू तुझ्या जीवनात पुढे काय करणार आहेस ते तुलाच अजून माहीत नाही. अशा परिस्थितीत लग्नात अडकून घेणं बरोबर आहे का?

त्यात मी एक मोठी घोडचूक करून बसले. आईला सांगितलं, की त्याचं आधी एका दुसऱ्या मुलीवर प्रेम होतं, पण त्या मुलीने त्याला नकार दिला होता. ती मुलगी त्यांच्याच ग्रुपमधली आहे. माझ्या ओळखीची आहे. सरोज धर्माधिकारी तिचं नाव. बस्स. माझी आई इतकी जहाँबाज तिने सरोजचा पत्ता माझ्याकडून काढून घेऊन ती तिच्या घरी गेली आणि तिला भेटली. का तिचा ह्याला नकार होता हे विचारायला. मला इतकं बेचैन वाटलं. पण मग आई मला म्हणायला लागली, “त्या मुलीने त्याला त्याच्या प्रेमाला तुझं लग्न झाल्यावर होकार दिला तर? त्याचं त्या मुलीवर अजून प्रेम असेल तर? तुझी फसवणूक होईल.” आईचा माझ्या या प्रेमाला सक्त विरोध होता. घरात रोज रोज वादावादी.....भांडणं. घरातल्या त्या रोजच्या त्रासाला मी कंटाळले. आणि मी विचार केला, आपण तर त्याच्यावर प्रेम करतो. तोही आपल्यावर प्रेम करतो. तर करू या लग्नच. खरंतर मला इतक्या लवकर लग्न करायचं नव्हतं. मला माझं बी.ए. पूर्ण करायचं होतं. मी होते तेव्हा एकोणीस वर्षांची. बी.ए.च्या तिसऱ्या वर्षात.

पण मग घरच्या भांडणाला कंटाळून मी आणि सुभाषने लवकरच लग्न करायचं ठरवलं. ५ जून १९७६ साली आमचं लग्न झालं. आमचं लग्न खूप छान होतं. आमचे दोघांचे आईवडील, थोडे नातेवाईक आणि माझे आणि सुभाषचे मित्र मैत्रिणी अशी साधारण २०-२२ माणसं सकाळी ११-१२ वाजता मुंबईच्या फोर्ट विभागातल्या ओल्ड कस्टम हाऊसमधे भेटलो. तिथे कोर्टात आम्ही दोघांनी सह्या केल्या आणि पेढे वाटले. झालं लग्न. सरळ आणि साधं. मग आम्ही सगळे एका रेस्तरॉमध्ये लंच करायला गेलो. ज्याला जे पाहिजे होतं, ते त्यांनी मागवलं. त्या लंचचं बिल मला वाटतं सुभाषनीच दिलं. लग्न झाल्यावर मी सुभाषच्या घरी गेले. त्या आधीही मी त्याच्या घरी मला वाटतं गेले होते. त्याची आई, तिला आम्ही सगळे भाभी म्हणत असू, फार फार चांगली होती. माझ्या आईपेक्षाही ती माझे लाड जास्त करायची. त्यांच्या घरात माझ्या घरापेक्षा कितीतरी जास्त माणसं होती. आईवडील, एक भाऊ आणि दोन बहिणी. पण त्यांचं घर माझ्या घरापेक्षा मोठं होतं. ते सगळे - सुभाषच्या धाकट्या बहिणी चित्रा, लता आणि त्याचा धाकटा भाऊ रवी आपल्या मोठ्या भावावर, सुभाषवर फार प्रेम करायचे. एक अतिशय प्रेमळ कुटुंब होतं ते. त्यांच्यात मी अगदी पाण्यात मासा शिरावा तशी एकदम लगेच रमले. फक्त एकच प्रॉब्लेम होता. मी होते शाकाहारी, आणि ते सगळे अस्सल मांसाहारी. घरात रेग्युलरली मासे, मटण आणि चिकन शिजवलं जायचं. मी तेव्हा किचनमधे जातच नसे. मलाही कोणी खायची जबरदस्ती केली नाही. पण हळूहळू मी अंडी खायला तिथे शिकले. पण चिकन-मासे मात्र मी खाऊ शकत नसे.

आमचं लग्न झाल्यावर आम्ही माथेरानला हनिमूनला गेलो. असा हनिमून मला वाटतं कुणीच केला नसेल. मी आणि सुभाषबरोबर त्याचे सगळे मित्र पण हनिमूनला आले. त्यांचा एक चांगला घट्ट ग्रुप होता. अरुण ठाकूर, त्याची बायको रेखा नाईक, विजय नाईक, त्याची बायको संध्या, राजा स्वामी, प्रकाश राणे, शशी शिरसीकर, अरुण काळे, विलास, सरोज धर्मधिकारी - जवळजवळ सगळे मुंबईच्या चुनाभट्टी विभागात राहात होते. सुभाषही चुनाभट्टीला राहत असे. हनिमून म्हणून आम्हाला वेगळी खोली दिली होती. बाकीचे सगळे जवळच्या हॉलमध्ये जमिनीवर पथारी टाकून झोपत होते. आम्ही सगळे एकत्र फिरायला जायचो. वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करायचो. ती सगळी डाव्या विचारसरणीची तरुण मुलं होती. त्यामुळे त्यांच्यात मिसळायला मला अजिबात जड गेलं नाही. फक्त मी सगळ्यात लहान होते. ते सगळे तिशीच्या आसपास होते.

दोन तीन दिवस हनिमून करून आम्ही परत जायला निघालो. तेवढ्यात आमच्या हॉटेलजवळ एक घोडेवाला आला. घोड्यावरून कोण खाली उतरणार? मी आणि आणखी कोणीतरी म्हणालं, "मी उतरणार." मी घोड्यावर माझी पिशवी घेऊन बसले आणि खाली नेरुळ स्टेशनपर्यंत गेले. बाकीचे सगळे, सुभाष धरून चालत माथेरानच्या डोंगरावरून खाली आले. खाली आल्यावर आम्ही सगळे मुंबईला जायच्या गाडीत बसलो. तो सुभाष आणि सरोज एकमेकांकडे बघून हसत होते. बाकीचे सगळे पण थोडे टेन्शनमधे दिसत होते. असं वाटत होतं की डोंगर उतरताना सुभाष आणि सरोज यांच्यात काहीतरी रोमँटिक झालं होतं. पण काय झालं होतं ते मी वेगळी घोड्यावरून आले होते म्हणून मला माहीत नव्हतं. पण इतर मित्रांच्या चेहऱ्यावरून काहीतरी झालं होतं नक्की. मला एक अतिशय जोराचा धक्का बसला. मला माझी आई आठवली. तिचे शब्द आठवले. '.... त्याचं अजून तिच्यावर प्रेम असेल. आणि लग्नानंतर तिने त्याच्या प्रेमाला होकार दिला तर?' माझ्या लग्नानंतर माझ्या हनीमूनलाच मला बसलेला हा पहिला धक्का होता. मी मला काहीच झालं नाही असं दाखवलं आणि नेहमीसारखं हसतखेळत आम्ही घरी आलो.

रोहिणी भट साहनी, *पुणे*
rohinisahni2000@yahoo.com

(पान १९ वरून) इंडियन नॅशनल अकादमी ऑफ इंजिनीअरिंग (INAE), एशिया-पॅसिफिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स असोसिएशन (AAIA) आणि द नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेस, इंडिया (NASI) यांचा समावेश आहे. त्यांना २०२१ मध्ये प्रतिष्ठित जे. सी. बोस राष्ट्रीय फेलोशिप देखील मिळाली आहे त्यांनी डेटा मायनिंग: मल्टीमीडिया, सॉफ्ट कॉम्प्युटिंग आणि बायोइन्फॉर्मेटिक्स; आणि इंट्रोडक्शन टू मशीन लर्निंग अँड बायोइन्फॉर्मेटिक्स यांसारखी अनेक पुस्तके लिहिली आहेत.

सुष्मिता मित्रा यांचे न्यूरोफजी संगणन आणि हायब्रिड सॉफ्टकंप्युटिंग फ्रेमवर्क या क्षेत्रातील अग्रगण्य कार्याने आजच्या वर्णनीय, विश्वसनीय, आणि मल्टीमॉडल AI प्रणालींसाठी पाया रचला आहे, असे म्हणता येईल. त्यांनी न्यूरल नेटवर्क्सशी फजी लॉजिक एकत्र करण्याच्या पद्धती विकसित करून मनुष्याने समजून घेता येणाऱ्या नियमांच्या उत्खननाला चालना दिली, जी आधुनिक स्पष्टीकरणक्षम AI (Explainable AI) ची पूर्वतयारी ठरली. वैद्यकीय प्रतिमा विश्लेषणात त्यांच्या radiomics आणि radiogenomics संशोधनाने मेंदूंच्या ट्यूमर, डायबेटिक रेटिनोपॅथी आणि कोविड१९ शोधणाऱ्या ऑटोमेटेड निदान साधनांना प्रत्यक्षात आकार दिला. आरोग्यसेवेशिवाय डेटामायनिंग, बायोइन्फॉरमॅटिक्स आणि पॅटर्न रिकग्निशनमध्ये त्यांचे योगदान उच्च-आयामी डेटा विश्लेषणासाठीच्या कार्यप्रवाहांचे पाया बनले आहे. आज त्या या क्षेत्रातील जागतिक टॉप २% रँकिंग असलेल्या शास्त्रज्ञ मानल्या जातात.

१९९५ च्या सुमारास इंटरनेट क्रांती झाली आणि अभियांत्रिकी आणि विज्ञान शिक्षणाचे आकर्षण जास्त निर्माण झाले आणि त्यातून अनेक महिला संशोधक या क्षेत्रात पुढे येऊ लागल्या त्याबद्दल आपण पुढील भागात माहिती घेऊ!

चिन्मय गवाणकर, *वसई*
chinmaygavankar@gmail.com

मिळून साऱ्याजणी मासिक आवडतं...
पण परवडत नाही का?

होतकरू विद्यार्थी- विद्यार्थिनी, बचत गट सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, गृहिणी, ज्या ज्या कुणाला मिळून साऱ्याजणी मासिक आवडतं पण परवडत नाही त्यांना फक्त ३५० रुपयात वर्षभर अंक घरपोच मिळेल. ज्यांना काहीच पैसे भरणे शक्य नाही, त्यांनी ९८२२७४६६६३ वर आपलं नाव, पत्ता, फोन नंबर व्हॉट्सॲप करावा. मासिकात असलेला विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा असा आमचा हा प्रयत्न आहे.

अंक ऑनलाईन विक्रीसाठी MAGZTER वरही उपलब्ध आहे. याचा जरूर लाभ घेत मासिक नव्हे चळवळ ... याच्याशी जोडून घ्या ही प्रेमाग्रहाची विनंती!
- संपादक -

नसलेल्या (नासलेल्या) नात्यांचे असलेले आभास

प्रतिमा अग्निहोत्री

देशोदेशीचे स्त्री रंग आपल्याला स्त्रियांच्या प्रगतीचा चढता आलेख दाखवतील. मात्र त्याला ठसठशीत अशी संघर्षाची किनार आहे, ती जाणून घेत आज समोर ठाकलेल्या प्रश्नांना भिडण्यासाठी त्यातून बळ मिळेल. अशा देशोदेशीच्या संघर्षरत स्त्रियांचं व्यक्तिमत्त्व उलगडून दाखविणारं हे सदर एक महिन्याआड आपल्या भेटीला येत आहे.

"तू माझ्या दफनविधीसाठी येशील?" समोर असलेल्या तिच्या कॉफीच्या कपाकडे ती बघत राहते. काहीच बोलत नाही. "तू माझ्या दफनविधीसाठी येशील?", तो पुन्हा विचारतो. "मरणाविषयी कशाला बोलायचे? तू तर जिवंत आहेस," ती म्हणते. तिसऱ्यांदा पुन्हा तेच विचारतो तो तिला. "तू माझ्या दफनविधीसाठी येशील?". "नक्की," ती म्हणते. "मी येईन तुझ्या दफनविधीसाठी." "शेजारीच भोजवृक्ष असलेला जमिनीचा तुकडा मिळालाय मला." "छान!" ती म्हणते. चार महिन्यांनी ती पिट्सबर्गमध्ये असताना तिला त्याच्या मृत्यूची बातमी कळते; तिच्या वाढदिवसाच्या दिवशी. तिच्या वाढदिवसानिमित्त युरोपहून शुभचिंतनाचे फोन येण्याआधीच त्याच्या मुलाचा लुडविगचा फोन येतो, "Dad गेले आज." दफनविधीच्या दिवशी ती अजूनही पिट्सबर्गमध्येच आहे. पहाटेचे पाच वाजलेत. म्हणजे बर्लिनमध्ये दुपारचे दोन. ती वेळेवर उठलीये. हॉटेलमधल्या टेबलावर मेणबत्ती पेटवली आहे तिने. आणि त्याचे आवडते संगीत बाख, मोत्झार्त, शॉप्यां ती युट्युबवर लावते. अगदी अधल्या मधल्या जाहिरातींसकट.

सहा महिन्यांनी तिचा नवरा एकटाच घरी असताना एक बाई येते आणि कार्डबोर्डचे दोन मोठ्ठे खोके देऊन जाते. "ती खूप रडत होती," तो म्हणतो. "अश्रू पुसायला हातरुमाल दिला मी तिला." साऱ्या हिवाळाभर कार्डबोर्डचे ते मोठ्ठाले खोके कॅथरिनाच्या अभ्यासिकेत तसेच पडून असतात. खोली साफ करायला मावशी आल्या की कॅथरिना ते खोके उचलून सोफ्यावर ठेवते, आणि साफसूफ करून झाली की पुन्हा जमिनीवर. वरची पुस्तके काढण्यासाठी बैठे स्टूल किंवा शिडी वापरताना ती ते खोके बाजूला सारते. तिच्या पुस्तकांच्या कपाटात त्या दोन मोठ्ठ्या खोक्यासाठी जागाच नाहीये. तळघरात पाणी साचले होते. सरळ रद्दीतच टाकावे का? ती एक खोका उघडून पाहते. पुन्हा बंद करून टाकते.

नोव्हेंबरच्या सुरुवाती सुरुवातीला ती जमिनीवर ठाण मांडते. तिने मनाची तयारी केलीय. सारे कागद सावडण्याची. दोन खोकी भरून. पत्रे, प्रती, डायऱ्या, फोटो, पोस्टकार्ड, वगैरे, वगैरे. सर्वात जुने १९८६ सालचे, सर्वात नवे १९९२ सालचे. तिचीही स्वत:ची आहे अशीच एक सुटकेस माळ्यावर.

अशी सुरू करते जेनी एरपेनबेक कहाणी. एका नात्याची. असलेल्या आणि नसलेल्याही, व नासलेल्याही. जिवंत भासताना मरण पावलेल्या भावबंधांची. कॅथरिना आणि हान्सच्या प्रेमाची. ती अवघी एकोणीसची. तो पन्नाशीतला. जवळपास तिच्या वयाचा मुलगा आहे त्याला. बस थांब्यावर "आज अचानक गाठ पडे" पद्धतीने आरंभ झालेल्या त्यांच्या चुटपुटत्या पहिल्या भेटीची, गहिऱ्या होत जाणाऱ्या तरलपणे उमलत जाणाऱ्या क्षणांची ही गाथा आपल्याला उमगते 'काईरॉस' या एरपेनबेकच्या २०२४ साली इंटरनशनल बुकर प्राईझ मिळालेल्या कादंबरीत. ऋणानुबंधांच्या थिजून पडलेली गाठी उकलणारी ही अत्यंत तरल कादंबरी प्रेमाचे गोडगोडूले, फिल्मी प्रदर्शन अजिबात मांडत नाही.

प्रेम हे फार आगळेच रसायन आहे हे मान्य आहे एरपेनबेकला. अतिशय उत्कटपणे प्रेमात पडलेल्या कॅथरिनाची एक छोटीशी आगळीक. पण हान्सच्या लेखी चुकीला माफी नाही. प्रेमाचा पुरुषी जाच कसा काचतो आणि स्त्रीपणाची कशी गोची करतो हे एरपेनबेक अत्यंत प्रामाणिकपणे पेश करते. सहा वर्षांचे हे प्रकरण कॅथरिनाला समंजस बनवते, तिची भावनिक-बौद्धिक उंची वाढवते. पण लेखक वगैरे असणारा हान्स तिच्यावर मालकी हक्क गाजवण्याच्या नादात इतका वाहवत जातो की भावनिक पातळीवर त्याचे क्रूर हुकूमशहात होणारे परिवर्तन त्यांच्या नासलेल्या नात्याचे असलेले आभासही मिटवून टाकते.

नाते असोशीने जपताना प्रेम नावाच्या अवकाशात स्त्रीला आपोआपच कसे दुय्यम लेखले जाते हे वास्तव लेखिका अत्यंत संवेदनशीलरीतीने पेश करते. हान्सचा छळवादाकडे होत

असणारा प्रवास कॅथरिनालाही बळीचा बोकड बनवतोय ही जाण ह्या कादंबरीला उच्च वैचारिकता प्रदान करते. तरीही स्त्री-पुरुषाचे प्रेमाचे नाते हे sado-masochism रीतीचे एकमेकांत अवघड गुंतलेले द्वैत असते/बनत जाते, एवढीच या अनेक पारितोषिक प्राप्त कादंबरीची परिमिती नाही. नाही तर, एरपेनबेकचे अंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेले लिखाण आणि संदीप रेड्डी वांगाच्या 'कबीरसिंग' (२०१९) हा 'अर्जुनरेड्डी' या त्याच्याच २०१७ सालच्या तेलगु चित्रपटाचा रि-मेक या दोन्हीत फरक तो काय? त्याही चित्रपटांत स्त्रीला प्रेमात भोगाव्या लागणाऱ्या मानसिक पातळीवरील हिंसेचे दर्शन होतेच, काही समीक्षकांच्या मते तर 'कबीरसिंग'मध्ये या अशा वरवर साजऱ्या भासणाऱ्या क्रौर्याचे समर्थनही आहे.

पण एरपेनबेकची मूळ जर्मनमधून २०२३ साली मायकेल हॉफमनने पेंग्विन प्रकाशनासाठी इंग्रजीत भाषांतरित केल्याने सर्वदूर पोचलेली ही कादंबरी प्रेमाचे सादरीकरण आणि विश्लेषण करते ते सामाजिक-राजकीय पातळीवर. या कादंबरीतील मुख्य पात्रांचा इतिहास जर्मनीच्या युद्धोत्तर इतिहासाशी आणि भूगोलाशी संलग्न आहे. कॅथरिना जन्मली आहे ती इस्ट जर्मनीत. तिला माहीत आहेत विभागलेले इस्ट बर्लिन, आणि तिथले अभाव. हान्स जाणीवपूर्वक इस्ट जर्मनीत स्थायिक झालाय. त्याच्या वडिलांच्या हिटलर प्रेमाचे परिमार्जन म्हणून.

थोडक्यात, या पातळीवरही त्याला सूक्ष्म, अव्यक्त अहंकाराची बाधा आहे. असले वरचढपणाचे (superiority complex) ताणेबाणे या प्रेमाच्या सादरीकरणाला उच्च वैचारिक आणि साहित्यिक मूल्ये प्रदान करतात. कारण पूर्वाश्रमीचे जी.डी. आर (German Democratic Republic) फक्त नावापुरतेच लोकशाहीवादी आणि प्रजासत्ताकवादी आहे. या टोपीखाली दडली आहे स्टॅलिनशाही हिंसा. थोडक्यात. हे असे सामाजिक-राजकीय परिमाण प्रतीक आहे हान्सच्या पुरुषी अरेरावीचे.

हान्स आणि कॅथरिनाचा ताटातूटीकडे होणारा अटळ प्रवास जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेचे द्योतक ठरत जातो. या ऐतिहासिक प्रक्रियेत पूर्व जर्मनीची ओळख धूसर होते आहे असे नव्वदीच्या दशकात अनेकांना वाटत राहिले. एक जीवनपद्धती, विचाररीती बलदंड बाजाराभिमुख भांडवलशाही पाश्चिमात्य प्रभावाखाली पुसट होतेय असा 'गेले ते दिन गेले' पद्धतीचा ostology (पूर्व जर्मनीसाठी वाटणारा नोस्टाल्जिया) भावूकपणा या कादंबरीतील स्त्री-पुरुष संबंधातील असमतोल अतिशय सूचकतेने तरल बनवतो. त्यामुळे युरोपिअन लिखाणात पुनःपुन्हा आढळणारा 'व्युद्रिंग हाइटस' पद्धतीचा पुरुषी अहंकाराचा सूडाचा प्रवास एखादी आजकालच्या काळातील स्त्री लेखिका किती आगळ्या व विचारगर्भ पद्धतीने मांडते हे स्त्री लिखाणाचे मूलगामी मर्म या कादंबरीतून उलगडते.

जेनी एरपेनबेक

तरीही एरपेनबेकचा सूर कुठेही आवर्ती अतिरेकी नाही. नेहमीच्या जगण्यातले चढ-उतार अत्यंत संयत, शांत रीतीने तरल, प्रतीकात्म गद्यातून ती सादर करते. त्यामुळेच ऐतिहासिक बदल सोसणारे इस्ट बर्लिनही या कादंबरीत केवळ पार्श्वभूमी राहत नाही. एक सजग व्यक्तिरेखा बनत जाते हे शहर. म्हणूनच या आगळ्या कादंबरीचे शीर्षक अतिशय सुयोग्य ठरते. ग्रीक भाषेनुसार, ग्रीक पौराणिक धारणांनुसार 'काईरॉस' म्हणजे सुयोग्य निर्णयांचा अचूक क्षण. व्यक्तीच्या असो वा समष्टीच्या, या अशा निर्णायक क्षणांनी घडत जातात नसलेल्या (नासलेल्या) नात्यांचे असलेले आभास.

जेनी एरपेनबेकचे (जन्म १९६० सालचा, इस्ट बर्लिनमध्ये) सारेच लिखाण असे अतिशय आगळे व विचारगर्भ आहे असे टीकाकारांचे मत आहे. ती नाटककार, ऑपेरा दिग्दर्शक म्हणूनही प्रसिद्ध आहे. तिने रंगभूमीवर पडद्यामागे थिएटर प्रॉप्स डिझाईनर म्हणूनही काम केलेलं आहे. अंतरराष्ट्रीय पातळीवर पारितोषिक मिळवणारी पहिली जर्मन लेखिका असणारी जेनी एरपेनबेक नव्वदीच्या दशकात लिहिती झाली. अनेक बहुमान तिच्या लिखाणाला प्राप्त झालेले आहेत. तीसेक भाषांत तिचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे. 'Go, went, gone' (२०१७) आणि 'Visitation' (२०१९) ला तर एकविसाव्या शतकातील शंभरेक पुस्तकातील अतिशय वरचा क्रमांक दिला जातो. नजीकच्या काळात नोबेल पारितोषिकासाठी खात्रीची उमेदवार मानली जाणारी ही लेखिका 'रस्म-ए-उल्फत' अशीच संपृक्त उलगडत जाईल हे निश्चित.

प्रतिमा अग्निहोत्री, *पुणे*
मोबा: ८३८०९४६९२१

इंग्रजी भाषेत लेख लिहिण्यासाठी सुवर्णसंधी!

मिळून साऱ्याजणी'च्या मिसा Online या द्वैभाषिक पोर्टलवर मराठी आणि इंग्रजी भाषेत महत्त्वपूर्ण आणि वैचारिक लेख प्रसिद्ध होत असतात. या पोर्टलच्या कार्यकारी संपादक दिक्षा दिंडे आहेत. तुम्हालाही लेखनात सहभागी व्हायचं असल्यास, किंवा काही सूचना द्यायच्या असल्यास, कृपया दिक्षाशी **८१४९७२७२५७** या क्रमांकावर संपर्क साधा.

बसपचा 'क्राऊड पूलर': राहुल अनविकर

केशव वाघमारे

मराठी भाषेत एक म्हण आहे. "बामणा घरी लिहिणं, कुणब्या घरी दाणं आणि मांगा-महारा घरी गाणं". पारंपारिक गावगाड्यात मांग-हलगी, गोंधळी-संबळ, धनगर-ढोल आणि महार-एकतारी वाजवायचे. ज्ञान, शेती आणि कला संगीत यांचीही संस्कृतीने अशी जातीनिहाय वाटणी केलेली होती. शिवाय गाणं वाजवणं हे अस्पृश्य ठरवलेल्या जातींचं उदरनिर्वाहाचं महत्त्वाचं साधन होतं. दलितांनी शतकानुशतकांच्या दमन, भेदभावाला तोंड देत आपला इतिहास, आपले शौर्य, आपली वेदना, आपला आनंद, आपले तत्त्वज्ञान हे सर्व जात्यावरच्या ओव्या, मौखिक कथा, गाण्यात आणि लोकसंगीताच्या रूपात, त्यांच्या जीवन संघर्षाचा इतिहास पिढीजात जतन केला आहे. १९२० नंतर डॉ. आंबेडकरांचा दलितांच्या राजकीय क्षितिजावर उदय होऊन त्यांनी प्रबोधनाची चळवळ सुरू केली त्या चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका या कलांनी आणि कलावंतांनी निभावली. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या आधारे समाजात होणारी स्थित्यंतरं, क्षणोक्षणी घडणाऱ्या प्रत्यक्ष घटना, डॉ.आंबेडकरांची भूमिका, त्यांचे संदेश, संघर्ष आणि एकूणच त्यांचं जीवन त्या अशिक्षित आणि अडाणी समाजाला समजेल अशा त्यांच्या ग्रामीण भाषेत समजावून सांगितले. आज परिस्थिती अगदी थोडीफारच बदलली असली तरी पूर्ण बदल होण्यासाठी भीमा तुझ्या मताचे... अनेक कलाकार तयार होणं आणि त्यांनी समाजाला जागं करणं अत्यावश्यक आहे, अशाच काही भीमाच्या मताचे शिलेदार या सदरातून आपल्या भेटीला येणार आहेत. मानवी हक्क कार्यकर्ता आणि सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक केशव वाघमारे यांचं 'खैरलांजी ते रोहित! दशकाची अस्वस्थता', हे पुस्तक भीषण जातवास्तवावर जळजळीत भाष्य करणारं आहे. त्या संदर्भात समाजाला जागं करण्याच्या हेतुनं त्यांनी लिहिलेली ही लेखमाला महत्त्वाची आहे. अवश्य वाचा.

२००२ सालातील कोल्हापूरची गोष्ट. बसपाचे राष्ट्रीय अध्यक्ष कांशीराम, उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्री मायावती आणि सिनेदिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत आरक्षण शताब्दी महोत्सव सुरू होता. तिथे सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून आलेले अनेक गायक आणि शाहीर गाणी म्हणत होते. त्या वेळी २५ वर्षांचा एक तरुण मुलगा स्टेजवर आला आणि गाणे म्हणू लागला. 'जा आणि तुमच्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा, तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे' या डॉ.आंबेडकर यांच्या विधानाचा आशय त्या गाण्यात खूप प्रभावी पद्धतीने मांडण्यात आला होता.

इकडे तिकडे घुसून का रे
दुसऱ्याच्या घरात
शासनकर्ती जमात बना
या वरच्या थरात
चला दिल्लीला चला
चला दिल्लीला चला

असे त्या गाण्याचे शब्द होते. रिपब्लिकन पक्षाच्या तत्त्वहीन राजकारणाबद्दल या गाण्यात असे मांडण्यात आले होते की,

आशा नाही, दिशा नाही
घालून का रे गोंधळ आता
बहुजनांचे दिल्लीवरती
जाऊ द्या रे वादळ आता

बाळ गंगाधर टिळकांनी अथणीच्या सभेत असे मांडले होते, 'तेल्या-तांबोळ्यांना संसदेत जाऊन काय नांगर हाकायचा आहे का?' ज्या काळात ते असे वक्तव्य करत होते तो अठराव्या शतकाचा काळ होता. इंग्रजी शिक्षण, संस्कृती, आचार विचार, युरोपीय वांशिक – सांस्कृतिक वर्चस्वतावादी इतिहास आणि तत्त्वज्ञान यांची मोहिनी अभिजन समाजाला होती. पण आपल्याच देशातील इतर समाज बांधवांना कमी लेखण्याची संकुचित वृत्ती मात्र त्यांच्यात ठासून भरली होती. टिळकांच्या त्या वाक्यामागे तीच वृत्ती दडलेली होती. खरं तर बाळ गंगाधर टिळक आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर या व्यक्ती नसून तत्कालीन संकुचित राजकिय आणि वैचारिक प्रवृत्ती आहेत. काळाबरोबर याचे विसर्जन व्हायला हवे, हेच तो शाहीर आपल्या गाण्यातून मांडत होता. त्याचे शब्द होते...

साळी, कोळी, तेली, तांबोळी
ढोर, चांभारात
वडार, कैकाडी आणि घिसाडी
महार अन् मांगात
लाल दिव्याची गाडी येऊ द्या
त्यांच्याही दारात

या कार्यक्रमात 'चला दिल्लीला चला' हे गाणे जेव्हा तो शाहीर कव्वाली ढंगात गाऊ लागला तेव्हा सर्व प्रेक्षकांत एकच उत्साह संचारला. त्याच्या वाणीकडे सगळे आकर्षिले गेले. उपस्थित लोक त्याचा शब्द न् शब्द कानात साठवून ठेवू लागले. त्याला प्रदिसाद देऊ लागले. तल्लीन होऊन ठेका धरू लागले. अशा प्रकारे तो तरुण आला, त्याने गायले आणि त्याने सर्व प्रेक्षकांना जिंकले. त्याचे गाणे संपले आणि कांशीराम यांनी उठून त्याच्या गळ्यात हार घातला. जब्बार पटेल यांनी त्याला चित्रपटात गायची ऑफर दिली. तो तरुण गायक होता राहुल अनविकर.

ती आठवण जागवताना राहुल अनविकर म्हणतात, "जब्बार पटेल यांनी चित्रपटात गाण्याची ऑफर दिली होती. पण मी ती कधी गांभीर्याने घेतली नाही. कारण मला कलेचा व्यवसाय करायचा नव्हता!" पुढे कांशीराम एकदा त्यांच्या कार्यकर्त्यांना म्हणाले, "इस बंदे को मिशन के साथ बनाये रखो. काम का आदमी है." राहुल अनविकर सांगतात, "कांशीरामजी यांच्या केवळ त्या वाक्याने मी इतका प्रभावित झालो की त्यानंतर महाराष्ट्रासह देशभर सतत पायाला भिंगरी लावून फिरलो. २००४ ते २००९ या पाच वर्षांच्या काळात कधी माझ्या घरीसुद्धा गेलो नाही. गावागावात कांशीराम आणि डॉ.आंबेडकर यांचे मिशन माझ्या आवाजाने-गाण्याने पोचवत राहिलो. माझे गाणे ऐकायला हजारो लोक येऊ लागले. अशा प्रकारे मी बसपाचा क्राऊड पुलर बनलो होतो."

राहुल हे केवळ गायक नाहीत. ते मिशनरी कार्यकर्ते आहेत. ते प्रेक्षकांशी हसत-खेळत संवाद साधतात. त्यांचा खर्जातला आवाज पहाडी आहे. त्यांची सांगीतिक कारकीर्द अगदी अफलातून आहे. दोन हृदयविकाराचे झटके सहन करूनही त्यांनी स्वतःला पुन्हा उभे केले आहे. ते आजही धडाडीने गातात. त्यांना २००७ साली उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्री मायावतींच्या हस्ते उत्तर प्रदेश सरकारचा कलारत्न पुरस्कार देण्यात आला. ते म्हणतात, "कोल्हापूरचा कार्यक्रम इतका ऐतिहासिक आणि जीवन बदलणारा निर्णायक ठरेल याची मलाच खात्री नव्हती." खरंच आहे की ती घटना राहुल अनविकर यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. त्यानंतर सांस्कृतिक क्षेत्रात उभे राहिले एक झपाटलेले वादळ. या वादळाने समस्त शोषित-पीडित जनतेला आपल्या कवेत घेतले. पुढे तब्बल दहा वर्षांचा काळ शाहीर अनविकर देशभर खेडोपाडी जाऊन जनतेचे प्रबोधन करण्यात पूर्णतः बुडून गेले.

केशव वाघमारे, राहुल अनविकर आणि इतर वादक

राहुल अनविकर हा हरिभाऊ अनविकर यांचा मुलगा. राहुल अनविकर त्यांच्या बालपणाबद्दल सांगतात, "मी तमाशा करणाऱ्या कुटुंबातच वाढलो. मी लहान असताना वडील वारले. माझे लहानपण गरीबीत गेले. माझा सांभाळ मामाने केला. विठ्ठल वेलदोडे आणि श्रीपत वेलदोडे हे माझे मामा. ते उघडे तमाशे करायचे. त्यात ते सोंगाडयाची भूमिका करायचे. माझे वडील पण त्या तमाशात होते. त्यांना लहानपणापासूनच तमाशाचं वेड होतं. पुढे ते गाऊ लागले. तमाशाच्या लावण्या लिहू लागले. ते ढोलकी वाजवायला पण शिकले. अंगात चांगलीच कला असल्यामुळे साळुबामामाने त्यांना कामाला ठेवलं. पण सुरुवातीला त्यांना खूप कष्ट उपसावे लागते. इतर कलावंतांचे कपडे धुणे, स्वयंपाक करणे ही कामे पण त्यांना करावी लागली. पण थोड्या दिवसात जेव्हा ते फडात उभे राहून गाऊ लागले तेव्हा लोकांची त्यांना भरभरून दाद मिळू लागली. सुप्रसिद्ध वग सम्राट दादू इंदुरीकर एकदा माझ्या वडिलांना म्हणाले होते की गाढवाचं लग्न हे वगनाट्य लिहिले मी पण त्याचा प्रयोग करावा तर तूच. निळू फुले एकदा तमाशा परिषदेचं उद्घाटन करायला औरंगाबादला आले होते, तेव्हा ते म्हणाले होते, हरिभाऊचा तमाशा बघत मी वाढलो आहे."

हरिभाऊ अनविकर हे मराठवाड्यातील पहिले तमासगीर. तमाशा क्षेत्रात पन्नास वर्षे त्यांचा प्रचंड प्रभाव होता. सत्तर-ऐंशीच्या दशकात त्यांच्या तमाशात अडीचशे लोक असायचे. १९८९ मध्ये त्यांचे निधन झाल्यानंतर 'उत्तम-रतन' या त्यांच्या मुलांनी हा तमाशा चालवण्याचा प्रयत्न केला. पण तो फारसा चालला नाही. त्या काळानंतर तमाशा बंद होत गेला. सिल्लोड तालुक्यातील अनवी या गावी एका महार कुटुंबात हरिभाऊ जन्मले. ते नंतर तमाशा कलाकारांच्या संपर्कात आले आणि पाहता पाहता ते एक चांगले तमासगीर बनले. त्यांनी स्वतःचा फड उभा केला. तंबू, कनात, मोटरगाडी इत्यादी साहित्य घेतले.

प्रसिद्ध साहित्यिक रुस्तम अचलखांब हरिभाऊ यांची आठवण सांगताना म्हणतात, "हरिभाऊचा त्या वेळेला भारी बोलबाला होता. आमच्यासारखी तरुण मुलं हरिभाऊचा तमाशा बघण्यासाठी

आतुर असायची. जत्रा संपली तरी पुढे १८ दिवस हरिभाऊचा तंबू गावात पडलेला असायचा. लोक संध्याकाळच्या वेळी भाकरतुकडा खाऊन, गाडी-बैल घेऊन हरिभाऊचा तमाशा बघायला जायची. आज-काल अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा यांचे सिनेमे बघून जशी पोरं गप्पा करतात अगदी तसाच हरिभाऊचा तमाशा पाहून आल्यावर आम्ही हरिभाऊच्या तमाशाबद्दल बोलत बसायचो. तमाशातील वगामध्ये हरिभाऊ स्वतः राजाचं आणि गवळणीमध्ये कृष्णाचं काम करत. गण-गवळण सादर झाली की खास खबर घेऊन हरिभाऊ पब्लिकसमोर येत. वगाचा शिल्पकार म्हणून त्यांच्या पहाडी आवाजाने सारा तंबू दणाणून जायचा. हरिभाऊच्या फडात आणि इतरांच्या फडात एक मूलभूत फरक होता. सिनेमाचा जमाना चांगला सुरू झालेला. सिनेमाचा लोकांवर बराच परिणाम होऊ लागला होता. पण हरिभाऊंनी आपल्या तमाशात सिनेमाच्या गाण्यांना जागा दिली नाही. पारंपारिक लावण्या, छक्कड, गवळणी, भेदिक, झगडा, पोवाडा यावरच हरिभाऊचा जास्त जोर असायचा. कोणी त्याबद्दल विचारत तेव्हा ते म्हणत की अहो साहेब, तमाशा म्हणजे तमाशाच असला पाहिजे! त्यात जर रंगीबेरंगी लाईटिंग, सिनेमाची गाणी घुसली तर तो तमाशा राहणार नाही. सगळी खिचडी होणार."

कलेच्या अशा समृद्ध कुटूंबात २५ ऑक्टोबर १९७४ रोजी राहुल अनविकर यांचा जन्म झाला. त्यांचे सगळे बालपण तमाशात गेले. त्याबद्दल राहुल अनविकर असं सांगतात, "लहानपणापासून तमाशा बरोबर वाढलो. लहानपणापासून माझ्या जीवनात गाणे आणि शाहीरी आली. ते माझ्या अंगात मुरत गेले. शालेय जीवनापासून वडिलांच्या तमाशामध्ये गाणे म्हणायला लागलो. त्यांच्या बरोबर सतत फिरत राहिल्याने शाळा फार गांभीर्याने करता आली नाही. पदवीपर्यंत शिक्षण केलं पण नंतर शैक्षणिक जीवनाकडे किंवा नोकरी इत्यादीकडे फार काही आकर्षित झालो नाही. गॅदरींग, परीक्षा आणि शिष्यवृत्ती या तीन गोष्टीपुरताच माझा कॉलेजचा संबंध राहिला. माझ्या गाण्यामुळे मी सर्व शिक्षकांचा लाडका होतो. तरी शाळा कॉलेजमध्ये मन रमले नाही. मी काही काळ ब्रिजलाल चतुर्वेदीसोबत राहिलो. ब्रिजलाल चतुर्वेदी यांनी कुमार सानूला संगीत शिकवले आहे. त्या नंतर मी गोपाल मिश्रांकडे शिकलो. गोपाल मिश्रा हे सगळ्या प्रकारची वाद्ये वाजवतात. असे कलाकार अपवादाने आढळतात. त्यांनी मला आर्केस्ट्रा शिकवला, ड्रम शिकवला."

राहुल अनविकर पुढे असं मांडतात, "वडिलांच्या निधनानंतर भावासोबत तमाशात काम केले. पण भावाने मला योग्य मोबदला दिला नाही. त्या वेळी पाच रुपये भत्ता दिला जायचा. त्यात शिक्षणाचा खर्च भागवावा लागायचा. भावासोबत फार दिवस जमले नाही. म्हणून इतरांच्या तमाशात गेलो. 'माझ्या नवऱ्याने सोडली दारु मला देव पावलाय ग!' या प्रसिद्ध गाण्याचे जनक दत्तोबा तांबेसह रोशनबाई सातारकर यांच्या तमाशात ट्रिपल सेट आणि हार्मोनियम वाजवायचो. गाणी म्हणायचो. तमाशाच्या वगात 'हिजडा' ही भूमिका करायचो. त्यामुळे दत्तोबा तांबे यांच्या तमाशात मला ९०० रुपये पगार मिळायला लागला. या तमाशाने मला आर्थिक आधार दिला. पण मी त्या तमाशा मालकाचा पगारी नोकर बनलो होतो. भावाच्या तमाशात पैसा नव्हता पण सन्मान मिळत होता. आणि इथं पैसा थोडाफार मिळत होता पण तिथं कलाकार म्हणून, माणूस म्हणून विशेष स्थान नव्हतं. त्यामुळे दत्तोबा यांच्याकडे वर्षभरापेक्षा अधिक काळ राहिलो नाही. मी एक दिवस तो तमाशा सोडला. जगण्यासाठी काय करायचं? हा प्रश्न होता. पण जिथे आत्मसन्मानाने काम करता येईल तिथेच राहायचे असे मी ठरवून टाकले होते. या काळात असरअली हा हरहुन्नरी मित्र मला भेटला. असरसलीम हे सिल्लोडच्या बाजारात हमाली करतात. ते उर्दूचे जाणकार आणि प्रतिभावंत कवी आहेत. त्यांच्याकडून मी कव्वाली शिकलो."

राहुल अनविकर ज्या सिल्लोड तालुक्यात राहतात तो परिसर सुफी आणि उर्दू गझलच्या प्रभावाचा इलाका आहे. सुफी संत हजरत जमाल शहा चिस्ती (उडाणगाव) बाबा बुराणोद्दीन (खुलताबाद) यांच्या काव्याने आणि संत वचनांचा प्रभाव इथल्या जनसमुदायांवर आहे. 'चुडी मजाण देंगे' किंवा 'आईने के सौ तुकडे कर के हमने देखे हैं' या सारखी गझल लिहिणारे अब्दुल रौफहैरा किंवा 'इश्क में हम तुम्हे क्या बतायें' यासारखी गझल लिहिणारे सैफुला शेख भोकरदनीसारखे कवी याच परिसरात जन्मले आणि बहरले. या मातीचा, त्या मातीत फुललेल्या संस्कृतीचा प्रभाव राहुल अनविकरांच्या व्यक्तिमत्त्वावर आहे. तो जीवनरस घेऊन राहुलचे गाणे आकाराला आले आहे. उर्दूचा सुंदर प्रभाव त्यांच्या लेखणीत आणि वाणीत कायम आढळतो.

राहुल असं मांडतात, "अनेक उरुसांच्या कार्यक्रमात कव्वाली गायली, त्यातून कव्वाल म्हणून माझी ओळख निर्माण झाली. नंतर कव्वालीचे सामने मी करू लागलो. त्यावेळी टोपी घालून कव्वाली म्हणायचो. मला गजल, कव्वालीने झपाटून टाकले होते. जिथे जिथे कव्वालीचे कार्यक्रम असायचे तिथे कव्वाली गात मी फिरत राहिलो. कव्वालीच्या महफिल रात्री ९-१० वाजता सुरू होऊन सकाळी ७-८ वाजेपर्यंत चालत असत. एक बुद्धिस्ट माणूस कव्वाली गातो याचं सगळ्यांना कौतुक वाटायचे."

जाती-धर्मव्यवस्थेने दडपलेल्या खालच्या समाज स्तरांना सुफी पंथाने बळ दिले. या आध्यात्मिक चळवळीने समतेचा नारा बुलंद केला. विषम अन्यायी मुल्यांवर प्रहार करण्याची प्रेरणा पीडित समुदायांना सूफी कव्वाल्यांमधूनच मिळाली. कव्वालीचा आशय अलीकडे हरवला असला तरी कव्वालीचा अरबी भाषेतला अर्थ

कौल म्हणजे अल्लाचा संदेश अथवा सत्यघटना. तो संदेश किंवा घटना सांगणे म्हणजे कव्वाली. तो संदेश योग्य आशयासह प्रभावी भाषेत पोहचवणारा व्यक्ती म्हणजे कव्वाल.

कव्वाली ही गायकीची वैशिष्ट्यपूर्ण शैली आहे. कव्वालीचा बादशाहा म्हणून ओळखले जाणारे नुसरत फतेहअली यांचे कुटुंब याच सामाजिक पृष्ठभूमीतून आलेले होते. फाळणीनंतर ते पाकिस्तानातच राहिले. शहंशाह-ए-कव्वाली बनलेल्या या गायकाने जगभरातील सर्व थरातील लोकांना याच अनुठ्या गायन शैलीने जबरदस्त आकर्षित केले. फाळणीपूर्व पंजाबात सुफी, शीख, कबीर आणि रविदास यांच्या विद्रोहाची परंपरा राहिली आहे. येथील दलितांनी कव्वालीच्या माध्यमातून ती मोठ्या प्रमाणात आत्मसात केली आहे. महाराष्ट्रात आंबेडकरी गायकीत ती वामनदादा कर्डक, प्रकाश पाटणकर, प्रतापसिंग बोदडे, सारंग पवार आणि राहुल अनविकर यांनी रुजवली. प्रकाश पाटणकर, छोटे बाबू नागपुरी आंबेडकरी गझल म्हणायचे.

वयाच्या सतराव्या वर्षी राहुल अनविकर यांनी किरण पाटणकर यांच्यासोबत कव्वालीचा सामना केला होता. कव्वाली गायनाला सुरुवातीला नाक मुरडणारे लोकच आवाज बहुत प्यारा है, असं म्हणू लागले. त्यांच्या लेखणीतून आणि वाणीतून लोकांच्या काळजाचा ठाव घेणारे शब्द व्यक्त होऊ लागले.

ओ बात करो पैदा तुम अपनी जुबानों में
दुनिया भी कहे कुछ है भीम दिवानो में
किंवा
संत रविदास की बानी
उसकी ही जुबानी
कोई आने को कितना ही पंगा
जिसका मन चंगा
तो कठौती मे मिलेगी गंगा

कव्वाली गायक ते चळवळीचे मिशनरी गायक हा आपला प्रवास मांडतांना अनविकर म्हणतात, "औरंगाबादला कव्वालीचा कार्यक्रम असताना मी वामनदादा कर्डक यांच्या संपर्कात आलो. वामनदादा कर्डक यांचे भीमगीत ऐकून मी प्रथमच आंबेडकरी गीत गायले. वामनदादांसमोर मी रात्रभर गाणे गायले. मी सुरुवातीपासूनच राजकीय भूमिका घेतल्यामुळे मी उथळ आशयाची गाणी गायली नाहीत. माझे गाणे ऐकल्यावर वामनदादांनी त्यांना मिळालेला पुरस्कार मला बहाल करून टाकला. वामनदादांना माझ्या वडिलांचे कलेतील योगदान माहीत होते. त्यांच्या कामाची त्यांना जाणीव होती. त्यांनी मला आंबेडकरी चळवळीची गाणी गाण्याची सूचना केली. नंतर मी काही दिवस वामनदादांसोबत गायलो. वामनदादांमुळे चांगल्या लोकांचा संपर्क आला. चळवळ समजू लागली. चळवळीसाठी कलेचं योगदान काय असावे, कलेचे चळवळीत महत्त्व कळू लागले. माझी मोठी बहीण नुकतीच बामसेफ या संघटनेसाठी काम करू लागली होती. बहिणीच्या आग्रहामुळे बसपाच्या कॅडरकॅम्पला गेलो. त्यानंतर माझा वैचारिक प्रवास अधिक जाणतेपणाने सुरू झाला. माझ्या वैचारिक भूमिका स्पष्ट झाल्या. कलेच्या माध्यमातून त्या चळवळीत भरीव योगदान देण्याचा गांभिर्याने विचार करू लागलो. १९९७ साली औरंगाबादचे बसपा कार्यकर्ते मुकुंद सोनावणे, पंडित बोर्डे, वलीभाई, सिद्धार्थ पाटील आणि डॉ.सुरेश माने यांनी माझा कार्यक्रम ऐकला. तेव्हा त्यांच्यासमोर मी कांशीराम यांच्यावर गाणे गायले.

सारा बहुजन कांशीरामने जगाया है
मनुवादी विचार को ललकारा है!
समता, शांती, बंधुत्व हमारा नारा है
छोडो सत्ता की चाबी भारत हमारा है!

बहुजन समाज पार्टीसोबत वाटचालीबद्दल सांगताना राहुल अनविकर म्हणतात, "२००४ साली औरंगाबादला मायावतींच्या समोर गाणे म्हणण्याची पुन्हा संधी मिळाली. मायावतींनी स्टेजवर बोलावून घेतले आणि "बसपासाठी गाणार का?" असे विचारले. मी होकार दिला." मग नागपूरच्या सभेत मायावती यांच्या उपस्थितीत राहुल अनविकर यांनी दीड तास कार्यक्रम सादर केला. बसपाच्या सभेत सर्वाधिक वेळ मिळविलेले राहुल अनविकर हे प्रथम गायक ठरले. त्यांनी त्यांच्या गाण्यातून लोकांत उत्साह, जोश आणि आंबेडकरी चळवळीची चेतना निर्माण केली. मायावतींचा विश्वास आणि आदर त्यांना मिळाला. मायावती यांच्या सूचनेनुसार राहुल अनविकर यांनी बसपाच्या प्रचारासाठी दिल्ली, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश आणि देशभर भटकंती केली. २००४ साली उत्तरप्रदेश सरकारचा 'कलारत्न' हा पुरस्कार त्यांना मोठ्या सन्मानाने प्रदान करण्यात आला.

आज फिर से बहुजनने भीमजी को खोया है
सारी जगा कर कोम निले चादर में सोया है!

कांशीराम यांच्या मृत्यूनंतर त्यांनी रचलेले हे गाणे अनेकांच्या डोळ्यांत अश्रू उभे करते. राहुल अनविकर यांची शब्दांवर हुकूमत आहे. लोकांशी सहज संवाद करत ज्या शैलीत ते गाणी सादर करतात त्यामुळे ते अगदी थेट लोकांच्या काळजाला भिडतात. त्यांचे शब्द मनामनात पोहोचतात. त्यांच्या शाहिरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा मराठी, हिंदी आणि उर्दू भाषेतील सहज संचार. त्यांच्या गाण्यात त्यांची स्पष्ट आणि ठाम राजकीय भूमिका दिसते. गाणे गाण्याची शैली कव्वालीकडे झुकणारी आहे. पण या प्रकारे ते जनतेच्या हृदयाची पकड घेतात. ते उत्स्फूर्तपणे जनसमुदायाशी संवाद साधतात. त्यांची गाणी लोकांत उत्साह, उर्जा आणि राजकीय चेतना निर्माण करतात. **(पान ५४ वर)**

शब्द शब्द वेचू या

‘रिंगण’ रुंदावणाऱ्या प्रत्येकीची कविता

डॉ. सुजाता शेणई

माधुरी मरकड

कमीत कमी शब्दात योग्य आशय-विषय पोहचवणारा साहित्य प्रकार म्हणजे कविता. विविध भावनांचा हुंकार असणाऱ्या कवितांचा प्रवास भक्ती संप्रदायातल्या आपल्या संत कवयित्रींपासून सुरू होतो. या प्रवासात अलीकडच्या कवयित्रींनी एक वेगळी झेप घेतली आहे. स्वतःबरोबर संघर्ष करत कवितेचं अनोखं विश्व उभं केलं. साहित्याच्या अभ्यासक डॉ. सुजाता शेणई यांच्या या सदरातून अलीकडच्या कवयित्रींच्या कवितेचा हुंकार काय आहे? काय सांगू पाहतेय त्यांची कविता? यावर चर्चा करण्यासाठी समारोपाच्या लेखात आपल्या भेटीला येत आहेत माधुरी मरकड.

कवयित्री माधुरी मरकड यांच्या ‘रिंगण’ या पहिल्या कवितासंग्रहाची दखल काव्यसमीक्षकांनी विशेषत्वाने घेतली कारण यातील कविता तेवढी सकस व विचारशील म्हणून वाचकांच्या समोर येते. या कवितासंग्रहाची अर्पणपत्रिका ‘रिंगण रुंदावणाऱ्या प्रत्येकीस’, अशी असल्याने कवयित्री स्वतःचं नातं जगभरातल्या स्त्रियांशी जोडते आणि प्रत्येकीनं आपलं रिंगण रुंदवावं अशी अपेक्षाही व्यक्त करते. महाराष्ट्रातून बावीस पुरस्कार ‘रिंगण’ला प्राप्त झाले असून सोलापूर विद्यापीठाच्या बी. ए. भाग १ च्या अभ्यासक्रमात कवितेचा समावेश करण्यात आला आहे. ‘धूळपावलांचा मागोवा’ या ग्रंथाचे संपादन केलेल्या व दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादन साहाय्य करणाऱ्या माधुरी मरकड यांचे विविध नियतकालिकांमधूनही लेखन वाचावयास मिळते. ‘रिंगण’ म्हणजे समाज आणि व्यवस्था यांनी स्त्रियांना आखून दिलेला परीघ होय. हा परीघ डोळसपणे पाहावा, त्यातील सत्यासत्यता तपासून पाहावी आणि स्वतःला न्याय देता देता समस्त स्त्री वर्गाला जागरुक करावं ही तळमळ या संग्रहातून दिसून येते.

‘रिंगण मुक्तीचा ध्यास हा स्त्रीच्या भूतकाळ आणि भविष्यकाळाचा दुवा आहे का?’, या संदर्भात कवयित्रीशी संवाद साधल्यानंतर कवयित्री म्हणते, “नैसर्गिकपणे जेव्हा एखाद्या ठिकाणी दडपशाही, हुकूमत, अन्याय चालत असतो, अशा ठिकाणी त्यातून बाहेर पडण्यासाठी त्या त्या घटकाची धडपड चालू असते. अन्यायग्रस्त स्त्री जातीसाठी मानसिक, शारीरिक गुलामीतून बाहेर पडण्याची धडपड ही नैसर्गिक उर्मी आहे. त्या प्रबळ नैसर्गिक उर्मीतून आपल्या भोवती काचणाऱ्या, टोचणाऱ्या, माणूस म्हणून जगणं नाकारणाऱ्या गोष्टीतून बाहेर पडणं, त्या विरुद्ध बंड करून उठणं आजची स्त्री करत आहे. आपल्या मागच्या पिढीनं खूप सोसलं, त्या मानानं पुढची पिढी ही कमी जाचाला सामोरी जाईल, हे पाहणं आजच्या सुजाण, सुशिक्षित आणि अशिक्षित असेल तरी स्त्रीचं कर्तव्य आहे, असं मला वाटतं. जाचक भूतकाळ सोडून थोड्याफार प्रमाणात का असेना पण सुसह्य भविष्यात जाताना अन्याय, अत्याचार, कर्मकांड, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, माणूस म्हणून आपलं जगणं नाकारणाऱ्या सगळ्या व्यवस्थेविरुद्ध बंड, या सगळ्यांचं रिंगण स्त्रीनं ओलांडावं. प्रत्येक आईनं तिनं सोसलेलं किंवा तिनं बालपणी, तरुणपणी जगलेलं बंदिस्त जीवन नाकारून ती तिच्या मुलीसाठी कुठल्या प्रकारचं जीवन तयार करून ठेवते, हे महत्त्वाचं. आजकालच्या सगळ्या सजग आया या पद्धतीनं रिंगण ओलांडतच आहेत, असा याचा अर्थ होतो. म्हणूनच रिंगण ओलांडतानाच्या या प्रक्रियेत स्त्रीचा मोठा वाटा आहे की जो भूतकाळातून शिकून नवा भविष्यकाळ सांधू शकतो.”

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला जन्माला आलेल्या म्हणजे आता पुरेशी जाण आणि समज आलेल्या मुलींनी स्वतःच्या जीवनाची वाटचाल, पारंपरिकता आणि आधुनिकता यांची पुरेशी सांगड घालत केली पाहिजे, असे कवयित्रीला वाटते. स्वतःच्या पतीचे प्राण परत आणणारी सावित्री तिला आदर्श मानताना, ‘एकाही पुरुषाने एकदाही केले नाही वटपौर्णिमेचे व्रत किंवा केला नाही उपवास’, याची जाण ठेवावी. सावित्रीबाई फुले यांनी लेकींनी शिकावं यासाठी स्वतःचं आयुष्य दावणीला बांधलं. शिकून मोठ्या झालेल्या मुली पाहताना कवयित्रीला प्रश्न पडतात, भरकटलोय की सावरलोय आम्ही?, शिकलोय, शिकून शहाण्या झालो आहोत की उतू-मातू लागलो आहोत?, भटकत आहोत की दीपस्तंभ बनत आहोत?, हे सारे प्रश्न म्हणजे आजचं वास्तव आहे. या वास्तवाला जातिभेद, धर्म, कर्मकांड यांच्या भिंती हातभार लावत आहेत.

या परंपरेच्या भिंतींना अमानुषी अशा हुंडाबळी, बलात्कार व अन्य अत्याचारांची जोड मिळत आहे. या साऱ्याची अस्वस्थता 'रिंगण'मधून दिसून येते.

एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुष समानतेच्या (फक्त कागदावर असलेल्या) सामाजिक वातावरणात जगतानासुद्धा स्त्रीच्या आदर्शत्वाची व्याख्या केली जाते, ही कवयित्रीची फार दुखरी नस आहे. आदर्शत्वाचे निकष अधोरेखित करताना ती समाजाच्या अपेक्षाच व्यक्त करते. जोपर्यंत शोषणाविरुद्ध ती तक्रार करत नाही तोपर्यंत ती आदर्श, समाजानं आखून दिलेल्या चौकटी रुंद करण्याचा प्रयत्न करत नाही तोपर्यंत ती आदर्श, चहा आणून देणारी व कप उचलणारी आहे तोपर्यंत ती आदर्श. या साऱ्याचा सारांश म्हणजे तिनं पुरुषी वर्चस्व मान्य करावं हा होतो. याचा तीव्र निषेध कवयित्री करताना दिसते.

स्त्रीच्या आदर्शत्वाची व्याख्या ही परंपरेला धरून आहे असं तरी खेदानं म्हणता येईल पण पुरुषत्वाची नवीन व्याख्या स्त्रीच्या शारीरिक मानसिक छळाला कारणीभूत ठरते आहे. बलात्कार करून मारणं, पेट्रोल टाकून जाळणं, ॲसिड फेकून विद्रूप करणं आणि स्त्रीचा आत्मसन्मान पायदळी तुडवणं. (आजही महाराष्ट्रात वैष्णवी हगवणेसारखी हुंडाबळी प्रकरणे होत आहेत, ही अतिशय दुःखदायक बाब आहे.) या साऱ्याचा एक दिवस अंत होईल अशी आशा कवयित्रीला वाटते कारण स्त्रीमधील शक्तिरूपा प्रकट होईल आणि तिच्या गळ्यात पुरुष नावाच्या दैत्याची नरमुंडमाळ असेल. हा तिचा विजय ठरेल पण तरीही ती विजयोत्सव करणार नाही,

कारण
तिच्या एका डोळ्यात असेल
आत्मसन्मानाचा विजय
अन् दुसऱ्यात मातेच्या ममतेचे अश्रू (पृ ३३)

स्त्रीवाद ही संकल्पना तुमच्या भूमिकेतून कशी सांगाल याला उत्तर देताना माधुरी मरकड म्हणतात, "स्त्रीवादाकडे झुकण्यापेक्षा मला माणूसवादी होणे जास्त महत्त्वाचे वाटते. मी स्त्री आहे आणि मी माणूस आहे मग तुम्ही फक्त मला माणसासारखे वागवा ही अतिशय बेसिक मागणी आहे. व्यवस्थेला किंवा पितृसत्तेला प्रश्न विचारताना पितृसत्ता जर माणसांनी बनलेली आहे आणि माणूस असण्याच्या सगळ्या फायद्यांवर ती हक्क सांगते तर मग स्त्रीला या सगळ्यांपासून ती वंचित का ठेवते? तुम्ही आम्हाला माणूस समजत नाहीत का?"

स्त्री ही कायमच प्रेम, वात्सल्य, करुणा यांसारख्या शाश्वत मूल्यांना जपत आली आहे.

जागतिकीकरणाच्या काळात पर्यावरणाच्या समस्यांना आपण गांभीर्यानं घेत नाही, ही फार मोठी चूक होते आहे याची दखल कवयित्री घेते. नदीच्या भूमिकेत शिरून कवयित्री आपल्याशी संवाद साधते. अवैध बांधकामं, कारखान्यांची वाढती संख्या यामुळे नदीच्या पात्राचा संकोच होतो. तिचं पाणी घरात घुसतं, कधी मनुष्यहानीही होते आणि माणसंच पुन्हा नदीला दूषणं लावतात. नदी बळी गेलेल्या प्रत्येकाची मी गुन्हेगार आहे असं मानते. मनुष्याची महत्त्वाकांक्षा आणि बेजबाबदारपणा याचा दोष स्वतः स्वीकारते. स्वतःलाच प्रश्न विचारते, 'खरंच मी आहे का दोषी?'

माधुरी मरकड यांची कविता पुरुषसत्ता नाकारू पाहते. त्यासाठी स्पष्ट आणि थेटही बोलते. कवयित्रीला स्त्री-पुरुष सत्तेतला विसंवाद नको तर संवाद हवा आहे. स्त्रीला चौकटीत बांधण्यापेक्षा तिच्या माणूस म्हणून असणाऱ्या स्वातंत्र्याला अबाधित ठेवा ही तिची मागणी आहे. नात्यांवर विश्वास तर आहेच. यातून टिकणारी कुटुंबव्यवस्थाही समाजाचा कणा आहे यावर कवयित्री भाष्य करते. सच्चेपणाचा सूर यातून दिसतो. या सच्चेपणातूनच कवयित्रीची आकाश कवेत घेण्याची इच्छा पूर्ण होईल.

कसे वाटावे अशक्य
जगी कोणतेच काम
डावा उजवा मिळून
घेती आकाश कवेत.

नवरात्र

जबाबदारीचं रेखीव कुबड
लादून बाईच्या पाठीवर
शांत, निवांत असतो
समाज, घरदार.
रूढी परंपरा मिरवायच्या,
जागवायच्या
नाचवायच्या,
तिच्याच जीवावर
लग्नसंस्थेने फुकटच्या
मोलकरणीची
व्यवस्था करून ठेवलेलीच आहे
तुझं आहे सगळं
तूच मालकीण आहेस..
तरी
प्रत्यक्ष नामधारीच असतो
सगळा मामला
नऊ दिवस देवी पूजून
उदो उदो करत
इतिकर्तव्यता संपल्याची
भावना असते
देवीसारखेच दागदागिने,
साजशृंगार
भरजरी वस्त्र
सगळे देऊ केले तरी
परवानगी नसते बाईला
देवीच्या हातातील शस्त्र
स्वतःच्या हातात घेण्याची.
शस्त्रधारी काली
हजम होत नसते पुरुषसत्तेला
आभास नि वास्तव
यातल्या सीमारेषा मुद्दाम
धूसर-धुवट केल्या आहेत
मेंढरं झालेल्या स्त्रियांचे मेंदू
चालत आहेत त्यावरून
हजारो वर्ष
कळपा कळपाने...

***सुजाता शेणई**, पुणे*
sujata.shenai@gmail.com

चहाचा इतिहास आणि विरासत

सुगंधा जोहर

विरासत माणूस आणि जनावर यांच्यामधला फरक अधोरेखित करते. विरासत हा सर्व मानव जातीचा वारसा असतो. तो कुणा एका वंशाच्या, धर्माच्या, जातीच्या, कुटुंबाच्या किंवा व्यक्तीच्या मालकीचा कसा नसतो हे एकदा समजून घेतलं की माणसं परस्परांतील जात, धर्म, वंशभेद ओलांडून माणूसपणाच्या वाटेवर आनंदानं प्रवास करतील. या अपेक्षेसह दुनियेचा सजग आणि डोळस प्रवास केलेल्या विदुषी सखीची ही छोटेखानी, अर्थगर्भ लेखमाला जरूर वाचा.

नमस्कार, हा लेख चहाचा इतिहास आणि वारसा मालिकेचा पहिला भाग आहे. सकाळी उठल्या उठल्या आपल्याला ज्या चहाची आठवण होते त्याचा हजारो वर्षांचा इतिहास आहे. आज आपण चहाच्या झाडांविषयी, चहाच्या विविध प्रकारांविषयी आणि चहा जगात केव्हा आणि कसा पसरला हे बघू. पुढील दोन भाग चहामुळे गेल्या चारशे वर्षात किती प्रचंड उलथापालथ झाली यावर आहेत.

चहाच्या बागा किंवा त्याचे फोटो बघितले तर आपला असा समज होतो की चहाची तीन चार फूट उंचीची रोपं असतात. तो आपला समज पूर्णपणे चुकीचा आहे. चहाची झाडं निसर्गात: प्रचंड मोठी असतात आणि ती शेकडो वर्षं जगतात. चहाच्या बागांमध्ये त्यांची पानं खुडणं सोपं व्हावं म्हणून त्यांना सारखं कापून लहान ठेवलेलं असतं.

चहाचा मूळ प्रदेश म्हणजे पूर्व हिमालयाच्या पर्वतरांगांच्या पायथ्याचा भाग. म्हणजेच आसामपासून थायलंडपर्यंतचा नकाशात दाखवलेला प्रदेश. १९९९ मध्ये शास्त्रज्ञांना ह्याच प्रदेशात म्हणजे म्यानमार आणि चीनच्या सीमेवरील घनदाट जंगलात १७०० वर्ष वयाचे चहाचे झाड सापडले ते १०८ फुट उंच आहे आणि खोड ४ फुटापेक्षा जास्त रुंद आहे.

चहाच्या मूळ प्रदेशातील लोक त्याच्या पानांचा हजारो वर्षांपासून कैक प्रकारे उपयोग करतात. आसामच्या सिंगो जमातीचे लोक तरतरीकरता चहा पितात, तर उत्तर म्यानमारमधले लोक त्याचे मसालेदार लोणचे बनवतात आणि थायलंडमध्ये चहाची कोवळी पान सॅलडमध्ये घालतात.

चिनी मान्यतेनुसार, त्यांचा पहिला राजा शानांग याने आजपासून ७३७ वर्षांपूर्वी चहाची पाने पाण्यात उकळून पिण्यास सुरुवात केली. चहाच्या पानांचे सर्वात जुने म्हजेच २३०० वर्षांपूर्वीचे अवशेष २०१६ मध्ये चीनच्या जेनिंग शहाराजवळ मिळाले. ही झाली राजे आणि सरदारांची गोष्ट. चीनच्या सर्वसाधारण लोकांमध्ये मात्र ही सवय त्याच्या ८०० वर्षांनंतर म्हणजे आजपासून १५०० वर्षांपूर्वी पसरली ती भारतीय बौद्ध भिक्कुंमुळे; ज्यांनी बौद्ध धर्माचा चीनमध्ये प्रसार केला. बौद्ध भिक्कू खूप वेळ ध्यान करण्याकरता चहा प्यायचे. त्यांच्याबरोबर चहा चीनच्या कानाकोपऱ्यात गेला आणि लोक चहाचे शौकीन झाले.

आपल्याला फक्त काळा आणि हल्ली हिरवा चहा माहीत झाला आहे; पण चहाचे पिवळे, पांढरे, उलोंगपुर-एह वगैरे बरेच प्रकार आहेत जे चहाची पाने तोडायच्या वेळचे त्यांचे वय आणि त्यानंतर त्यांच्यावर काय प्रक्रिया केली आहे यावरून ठरतात.

जो पांढरा चहा मुख्यत: चीनी बादशहाला नजरणा देण्याकरता बनवला जायचा त्यावर सर्वात कमी प्रक्रिया केली जाते आणि या चहाकरता फक्त पानाच्या कळ्या घेतल्या जातात. असे म्हणतात, याकरता पर्वतावरील मोठ्या झाडांची पानं माकडांकडून तोडली जायची.

चीन, पूर्व आशियातिल जपान, कोरिया आणि पूर्व अफ्रिकेत लोकप्रिय असलेला हिरवा चहा म्हणजेच आजचा ग्रीन टी हा

चहाचा सर्वात जुना प्रकार. त्यावर सर्वात कमी प्रक्रिया केली जाते. आज इंडियासहित सर्व जगात पॉप्युलर असलेला काळा चहा १७ व्या शतकात मंचुरियनमधून येऊन पुढील ३०० वर्ष चीनवर राज्य करणाऱ्या किंग राजांच्या राजवटीत त्यांच्याकरता पहिल्यांदा काळा चहा बनवला जाऊ लागला आणि तो राज्यभर पसरला. इंग्लंडमध्ये काही लोक ग्रीन टी प्यायचे पण १८ व्या शतकातच त्यात होणाऱ्या भेसळीनंतर ब्रिटीश लोक काळ्या चहाकडे वळले.

काळ्या आणि हिरव्या चहामधली चव असलेला उलोंग किंवा युलोंग चहा जगातील सर्वात महाग चहा आहे. हा चहा चीनवर १०व्या शतकापासून १४ शतकापर्यंत राज्य करणाऱ्या सॉन्ग राजांची खास पसंत होती. त्यांच्या सॉन्ग झोंग नावाच्या राजाला विशेषत: हाउलोंग चहा इतका आवडायचा की त्याने त्यावर ११९७ मध्ये एक मोठं पुस्तकच लिहिलं होतं.

२०१८ मध्ये चीनच्या फुजियान प्रांतातील हुई हिल्सच्या डाहांकपाओ चहाच्या बागेतील एक किलो इंपीरियल रेडरोब टी ९ कोटी २८ लाख रुपयांना विकला गेला होता. त्यावेळी १ किलो सोन्याची किंमत फक्त १ कोटी ४८ लाख रुपये होती.

त्या नंतर, येतो पुर-एह चहा जो युनानमध्ये खास तिबेटकरता बनवला जातो. शतकानुशतके, विटांच्या आकारात दाबून पॅक केलेला हा चहा मजूर पाठीवर लादून युनान प्रांतातून तिबेटला न्यायचे. २०१५ मध्ये पश्चिम तिबेटमध्ये सापडलेल्या १८०० वर्ष जुन्या चहाच्या अवशेषांनी हा चहाचा व्यापार किती प्राचीन आहे हे सिद्ध केलं.

मध्य आणि पश्चिम आशियातील लोकांना चहाची सवय १८०० वर्षांपूर्वी, चीनमधून रोमला चहा घेऊन आलेल्या व्यापाऱ्यांनी लावली. मध्य आशियातील लोकांना चहा इतका आवडला की ते स्वतः चहा प्यायले आणि फक्त रेशमी कपड़ा युरोपियन व्यापाऱ्यांना विकायचे. आठव्या शतकानंतर चिनी सम्राटांनी या मध्य आशियातील चहाच्या सवयीचा फायदा घेतला आणि त्यांना चहा विकून आपल्या देशासाठी घोडे विकत घेतले.

जपानमध्ये चहा आठव्या शतकात बौद्ध धर्माचे शिक्षण घ्यायला चीनला गेलेल्या बौद्ध भिक्कू कुकाई आणि साईचो घेऊन आले. पण जपानमध्ये चहा लोकप्रिय केला भिक्कू एसईनी. त्यांनी जपानमध्ये चहाच्या बागा लावल्या. आज जपानी संस्कृतीची निशाणी महणून सुप्रसिद्ध चहा समारोहाचे नियम ठरवले १६ शतकातील चहा मास्टर सेन नौ रियूनी.

युरोपमधील चहाचा पहिला उल्लेख व्हेनिसच्या जॉन बॅटिस्टाच्या १५५९ च्या पुस्तकात आढळतो, ज्याची माहिती त्याला तुर्की व्यापाऱ्याकडून मिळाली होती. युरोपमध्ये चहा पहिल्यांदा ॲमस्टरडॅम शहरात १६१० मध्ये जावाहून आला. जावामध्ये चीनशी असलेल्या व्यापारी संबंधांमुळे खूप आगोदरपासून चहा प्यायला जायचा. पुढील १० वर्षांत, चहाने फ्रेंच राजा १४व्या लुईसकट अनेक श्रीमंत लोकांच्या हृदयावर कब्जा केला.

१७०० वर्ष वयाचे १०८ फुट उंचीचे चहाचे झाड

त्यांची चहाची तहान भागवण्याकरता १६१८ पर्यंत पॅरिससह अनेक युरोपियन शहरांमध्ये टी रूम्स म्हणजेच चहाची हॉटेल उघडली होती.

१६१८ मध्ये चीनी बादशाह जो हाँग जोहने रशियन झार मायकेलला पाठवलेल्या नजराण्याबरोवर रशियामध्ये चहाचा प्रवेश झाला. तिथल्या थंडीमुळे तेथील लोक ताबडतोब त्याच्या प्रेमात पडले. इतके की १६९९ पर्यंत हजारो उंटांचे काफिले एक वर्षापेक्षा जास्ती प्रवास करून रशियात चहा नेऊ लागले होते. तेथील थंडीचा मुकाबला करण्याकरता रशियन सतत चहा प्यायचे आणि तो केवहाही तयार मिळावा याकरता त्यांनी एक खास समोवर नावाचे भांडे बनवले. आपल्या एका कल्पक इंडियनने या समोवरचा गरम पाण्याचा बंब म्हणून इंडियात विकला जो आपल्याला १९८० च्या दशकापर्यंत सर्व इंडियन घरात दिसत होता. चहा रशियामधून त्याच्या प्रभाव क्षेत्रात असलेल्या पोलंड जॉर्जिया, बेलारूस आणि लॅटविया वगैरे परदेशात गेला.

आता वळू या इंग्लंडकडे जिथल्या चहाच्या प्रेमामुळे १७ व्या शतकापासून २० व्या शतकापर्यंत जगात प्रचंड बदल झाले. इंग्लंडमध्ये चहा पोहोचला कपूरथल्याची राजकन्या कॅथरीन ऑफ ब्रेगांजा आणि इंग्लंडचा राजा चार्ल्सच्या लग्नातील हुंड्यामधून. या हुंड्यात चहाबरोबर सोन्याची नाणी आणि मुंबईची बेटं पण होती.

लग्नानंतर कॅथरीनने चहा प्यायला, चार्ल्सने सोन्याची नाणी स्वतः ठेवली आणि मुंबईची बेटे आणखीन सोन्याच्या नाण्यांच्या बदल्यात ईस्ट इंडिया कंपनीला दिली. मुंबई आणि चहाचे हे नाते आहे. १९ व्या शतकात इंग्लंडचा व्यापार भारतात उगवलेल्या अफूचे चीनमध्ये केलेल्या स्मगलिंगबरोबर आणखी वाढला; १६३८ मध्ये ही इंग्लंडमध्ये पोहोचलेली चहा पिण्याची सवय १६९९ मध्ये दूध आणि साखर घालून चहा पिण्याची परंपरा सुरू होईपर्यंत. तोपर्यंत फक्त शाही दरबारापुरता मर्यादित होती. त्या नंतरच्या २० वर्षांत लोकांना हा गोड चहा इतका आवडला की, १६९९ मध्ये ६००० किलो चहा विकत घेणाऱ्या इंग्लंडने १७५०

मध्ये हे आकडे वाढून ५० लाख पाउंड किमतीचे २१ लाख ५० हजार किलो चहा खरेदी केला. १७८४ मध्ये सरकारने चहावरील कर कमी करून १२.३० टक्के केला. त्या नंतर इंग्लंडमध्ये चहाचा महापूरच आला.

ज्या मसाल्यांच्या शोधात इंडिया आणि आशिया खंडात आलेली ईस्ट इंडिया कंपनी मसाल्याच्या चहाचा व्यवसाय करायला लागली. पुरुषांच्या दारूच्या व्यसनामुळे त्रस्त इंग्लंडच्या बायकांना, तेथे नव्याने उघडत असलेल्या कारखान्याच्या मालकांना चहाने मिळणाऱ्या उर्जेमुळे चहा हवासा झाला होता. त्यात पुन्हा उकळलेल्या पाण्यात बनलेला चहा पाण्यातील किटाणू मारून कॉलरा, टायफॉइडसारख्या आजारांपासूनही बचाव करत होता. या सगळ्यामुळे १९ व्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमधील तमाम जनता चहाबाज झाली होती. इतकी की इंग्लंडमध्ये रात्रीच्या जेवणातल्या चहाला अजुनसुद्धा ईवनिंग टी किंवा संध्याकाळचा चहा म्हणतात.

आता अमेरिकेला जाऊ या. १६५० मध्ये न्यूयॉर्कला पहिल्यांदा आलेला चहा बाकी जगाप्रमाणेच लवकरच लोकप्रिय झाला. १७६८ पर्यंत अमेरिकेच्या १३ वसाहतींमधील ६.३० लाख लोक ईस्ट इंडिया कंपनीकडून ४.३० लाख किलोपेक्षा जास्त चहा विकत घ्यायला लागले होते.

पण त्या नंतर इंग्लंडच्या संसदेने अमेरिकेच्या वसाहतींवर मनमर्जीने कर लादायला सुरुवात केली जे अमेरिकन लोकांना मान्य नव्हते. पण संसदेने त्यांचे ऐकले नाही आणि मामला बिघडला. वैतागलेल्या अमेरिकन लोकांनी चहासकट इंग्लंडहून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला. पण तरीही जेव्हा डिसेंबर १७७३ मध्ये, इंग्लंडची चहाची जहाजे जबरदस्तीने बॉस्टन बंदरात पोचली तेव्हा चवताळलेले लोक १६ डिसेंबरला संध्याकाळी जहाजावर चढले आणि त्यांनी सर्व चहा समुद्रात बुडवला आणि अमेरकेचा स्वातंत्र्यलढ्याची तुतारी फुंकली. इतिहासात ही घटना बोस्टन टीपार्टी म्हणून ओळखली जाते. पण तरीही अमेरिकेचे चहाप्रेम संपले नाही. आज अमेरिका जगातून ५६०० कोटी डॉलर किमतीचा चहा विकत घेते.

आता पाळी आहे उत्तर आफ्रिकेची. तेथील मोरक्को देशात चहा १७१० मध्ये इंग्लंडच्या रानी ॲनने तेथील सुलतान मौली इस्माईलना दिलेल्या भेटीच्या स्वरुपात पोचला. पण १८५३ पर्यंत मोरोक्कोमध्ये लोकप्रिय झाला नाही. १८५३ मध्ये जेव्हा रशियाने तुर्की साम्राज्याचा भाग असलेल्या क्राइमियावर आक्रमण केले तेव्हा तुर्कीला पाठिंबा देण्याऱ्या ब्रिटनच्या चहा घेऊन येणाऱ्या जहाजांना त्या बाजूला जाणे धोक्याचे वाटले. हा चहा त्या जहाजांनी मोरोक्कोमध्ये स्वस्तात विकला आणि तेव्हापासून मोरोक्कन लोक चहाप्रेमी झाले. आज, जगात मोरोक्कोचा पुदीना घातलेला ग्रीन टी त्याच्या खास चवीमुळे पिणाऱ्यांच्या नेहमी लक्षात राहतो.

चहा आणि भारत यांच्यातील संबंधांबद्दल बोलण्यापूर्वी, चहाच्या वेगवेगळ्या नावांचे काय रहस्य आहे ते जाणून घेऊ या.

चीनमध्ये फुजियन प्रांत सोडून बाकी प्रांतात चहाला चा म्हणतात. फुजियन प्रांतात मात्र चहा ला ते किंवा टी म्हणतात. गोऱ्या लोकांची चहाशी ओळख फुजियन प्रांतात झाल्यामुळे ते त्याला फुजियन नावाच्या अपभ्रंशाने म्हणजेच टी, ते किंवा थे नावाने ओळखायला लागले आणि जगाच्या ज्या ज्या भागात चहा त्यांच्याबरोबर जहाजातून गेला तेथे त्याला त्याचे त्यापैकीच एक नाव झाले. जेथे चहा चीनी लोकांबरोबर पोचला तेथे तो चा किंवा चहा झाला.

आता पाळी इंडियाची. आपल्या आसाममध्ये नैसर्गिकरीत्या आसलेल्या चहाच्या पानांचा चहा तेथील सिंगफो लोक १२ व्या शतकापासून फलक नावाने पितात. तर इंग्रज फादर म्हणतो की त्याने १६९० मध्ये सूरतच्या चीनशी व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याच्या घरी चहा घेतला होता. याचा अर्थ चहाची आपली ओळख चीनी लोकांकडून झाली म्हणूनच चहाला आपण चाय या नावाने ओळखतो.

इंडियाच्या इतर भागांची मात्र चहाशी ओळख नव्हती. ती झाली इंग्रज राजवटीत. १८९० पर्यंत जस्टिस रानड्यांसारखे इंग्रजांना भेटणारे लोक चहा प्यायला लागले होते. त्यांच्याबरोबरच त्यांच्या घरी चहा पोहोचला.

पहिल्या महायुद्धात युरोपला गेलेले लाखो भारतीय सैनिक तेथे चहाबाज झाले. याच सुमारास मुंबई, कोलकाता यांसारख्या शहरांत सुरू झालेल्या इराणी कॅफेनी तरुणाईची ओळख चहाशी केली ज्यामुळे भारतीय लोकांचा चहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागला.

दुसऱ्या महायुद्धात भारताबाहेर चहा पाठवणे अशक्य झाल्यामुळे चहा कंपन्यांनी भारतातच चहाचा बाजार वाढवण्याचे ठरवलं आणि त्यांनी भारतीय लोकांना चहाकडे आकर्षित करण्यासाठी रेल्वेस्थानकांवर फुकट चहा दिला आणि इथे लोकं चहा पिऊ लागले. इतका की आज हा आपल्या जीवनाकरता आवश्यक झाला आहे, त्याच्याशिवाय आपला दिवस सुरूच होत नाही. आज इंडिया जगातील दुसरा सर्वात मोठा चहा उत्पादक देश आहे पण त्यातील ८०% उत्पादन आपण इंडियातच वापरतो.

तर असा आहे जगात पसरलेल्या चहाच्या सवयीचा इतिहास.

चहा इतिहास आणि वारसाच्या दुसऱ्या भागात चहामुळे करोडो लोकांना गुलामगिरीचे आणि बंध-मजुरीचे नरकमय जीवन कसे जगावे लागले ते पुढील भेटीत पाहू.

सुगंधा जोहर, *पुणे*

sugandha.johar@gmail.com/ मोबा. ९८८१३५२३४५

(पान ९ वरून) अशी नावं खास करून घ्यावी लागतील. त्यांच्या चित्रांमध्ये युरोपियन संस्कारांच्या बरोबर भारतीय वास्तवाचं चित्रण देखील होत होतं. १९३७ साली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बॉम्बे आर्ट सोसायटीतर्फे होणाऱ्या प्रदर्शनांमध्ये अमृता शेरगिल या पंजाबच्या चित्रकार महिलेला तिच्या 'ग्रुप ऑफ यंग गर्लस्' या चित्रासाठी पारितोषिक मिळालं. त्यातून तिचं काम जोमानी सुरू झालंच, पण आधुनिकतेचा संस्कार भारतीय चित्रकलेमध्ये निश्चितपणे उमटल्याची ती खूण होती.

आधुनिकतेच उद्गार या काळात अनेक प्रकार होत होते, इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन (IPTA) ही नाट्यसंस्था १९५०मध्ये स्थापन झाली होती. सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोन ज्यांच्या मनात उत्कटपणे विराजत होता, अशा सरदार जाफरी, मुल्कराज आनंद, बलराज सहानी, दीना गांधी, शांता गांधी यांनी यात पुढाकार घेतला होता. सरदार जाफरी, मुल्कराज आनंद यांचा पुरोगामी लेखकवृंद तर होताच, पण याच विचारांनी भारलेले अभिनेते ही या ई.पी.टी.ए.मध्ये सामील झाले होते.

देश स्वतंत्र झाल्यावर नव्या आधुनिक विचारांनी समाजाची जडणघडण करण्याचे हे प्रयोग होते.

चित्रकला क्षेत्रात कला दालन उघडण्याची कल्पना ही हळूहळू विकसित होत होती. बाल छाबडा, केकू गांधी ही नावं या संदर्भात महत्त्वाची होती.

आधुनिक चित्रकार : प्रोग्रेसिव्ह किंवा प्रगतीशील वा पुरोगामी चित्रकारांच्या ग्रुप नंतर 'मॉडर्नस्' वा 'आधुनिक' अशा चित्रकारांचा एक ग्रुप निर्माण झाला. त्यांनी युरोपमधल्या चित्रविश्वाचा स्पंदनं आत्मसात केली. शिवाय व्यक्तिगत आत्माविष्काराला प्राधान्य दिलं. रंग आणि आकार आणि रेषा यांच्या अंतरंगात उमटणारं विश्व त्यांना आपल्या कलेत दाखवायचं होतं. याबद्दल चित्रकार सूझा यांचे शब्द इथे सांगायला हवेत. "Our art has evolved over the years of its own, volition, out of our own balls and brains."

दुसऱ्या महायुद्धातनंतरच्या कौतुकाचा आविष्कार : दुसऱ्या महायुद्धातल्या संहाराच्या भयानी पुष्कळ जर्मन लोक इथे आले होते. युद्ध संपल्यावर बहुतेक जण परत गेले. परंतु वॉल्टर लांघमार, रुडॉल्फ व्हॉन लेडन आणि औद्योगिक व्यवसायात गुंतलेला एमॅन्युएल श्लेसिंगर हे तिघे मात्र कला प्रेमामुळे इथेच राहिले. कंपोझर वा रचनाकार वॉल्टर कॉफ्मन देखील इथे राहिला आणि झुबिन मेहताच्या वडिलांबरोबर-मेहेली मेहतांबरोबर बॉम्बे चेंबर म्युझिक सोसायटी त्यांनी स्थापन केली.

देश सोडून कलाप्रेमाखातर भारतात राहून इथल्या चित्रकारांच्या कलाविश्वात सृजनशील प्रेरणा देण्याची ही आंतरिक उत्कट आसक्ती पाहताना मन थक्क होतं. अशी निर्मितीशील घटना आणखी कुठे, कशी, तेव्हाप्रमाणेच आताही आढळते का, ते शोधण्याची ऊर्मी मनाला व्यापून टाकले.

१९५० नंतर चित्रकारांचं जागतिक कलेशी, कलाकारांशी, संस्कृतीशी पुष्कळ जवळचं नातं निर्माण होत गेलं. परंतु लांघमार, लेडन आणि श्लेसिंगर यांच्या आंतरिक उत्तेजनामुळे युरोपमधल्या कलाविश्वाशी इथल्या चित्रकारांचा विलक्षण दुवा निर्माण झाला, हे निर्विवाद सत्य आहे.

या तिघांबद्दल व्यक्तिगत माहिती, त्यांच्या कामाचा छानसा आढावा यशोधरानी घेतला आहे. तो मुळातून वाचणं अतिशय आनंददायक आहे. त्यात मुंबईच्या आधुनिक आणि सर्वसंग्राही स्वरूपाचं फार चांगलं भान येतं. किंबहूना या आधुनिकतेची, सर्वांगीण मोकळेपणाची सुरुवात कशी झाली त्याचा अंदाज येतो.

कोणत्याही कलेच्या विकासासाठी त्या विशिष्ट मातीतले संस्कार, आकृतिबंध नि त्यांची मनोमन मुरलेली जाणीव, ही जितकी अस्सलपणे आवश्यक असते, तितकीच उघड्या डोळ्यांनी, संवेदनाशील मनानी विकसनाच्या सूत्रांशी बाहेरच्या कलेची स्पंदनं अनुभवणं हेही नवनिर्मिती साध्य करणारं असतं. मुंबईच्या सर्वांगीण स्वरूपात पन्नासच्या दशकापासून आजतागायत आंतर-बाह्य संस्कारांची ही देव-घेव सुरू आहे, असं दिसून येतं.

लांघमार, लेडन, श्लेसिंगर या त्रिमूर्तींनी अशा आंतर-बाह्य देवघेवीसाठी खूप मदत केली. यात विशेष उल्लेख अमृता-शेरगिलचा करायला हवा. तिच्या चित्रकलेला, तिच्या कलाविश्वात अवतरण्याला पुष्कळ विरोध झाला. १९३९ साली तिच्या कलेला ॲवॉर्ड देऊन सन्मानित केलं, तेव्हा बॉम्बे आर्ट सोसायटीचे पुष्कळ सदस्य सोसायटी सोडून गेले. तेव्हा लेडन आणि लांघमार यांनी सोसायटीत सदस्य म्हणून प्रवेश केला. खजुराहो आणि कोनार्क इथल्या देवळांमधले उत्तान शृंगार दाखवणारे फोटो अकबर पद्मसीनी काढले, तेव्हा त्याला न्यायालयीन सजा भोगावी लागली होती. पण लेडन, लांघमार यांनी त्याच्या बाजूनी उभे राहून त्याला मदत केली (एम्.एफ.हुसेनवर अशी वळ गेल्या काही वर्षात येऊन गेली. त्यानंतर ते दुबईला गेले. या समाजाला मोकळा आत्माविष्कार अजूनही मानवत नाही, ही खेदाची गोष्ट आहे.)

(प्रस्तुत लेखन देविका सिंग यांचं आहे. यशोधरानी ते योग्य संदर्भात उद्धृत केलं आहे. 'मार्ग' या मासिकाच्या अंकात 'मॉडर्न एशियन स्टडीज' Vol 47, No 1, 2013 हा तो संदर्भ आहे.)

हुसेन, सूझा, रझा, आरा, गाडे : आधुनिक चित्रकारांच्यात एफ्. एन्.सूझा यांचा खास उल्लेख करावा लागेल. अत्यंत मनस्वी आणि मुक्त अशा मनोवृत्तीचे सूझा यांच्या अशांत आयुष्यातल्या दोन गोष्टी महत्वाच्या दिसतात. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना जे.जे.स्कूल ऑफ आर्टमधून काढून टाकण्यात आलं. त्यानंतरच त्यांचं चित्रं 'द ब्लू लेडी' हरमन् गोट्झ

यांनी विकत घेतलं. आजही बडोदा म्यूझियमच्या संग्रहात ते चित्र आहे. गंमत म्हणजे आपल्या आईच्या शिवणकामाच्या फळीवर हे चित्र रंगवलेलं आहे. एका बाजूला आर्थिक चणचण, दुसऱ्या बाजूला चित्रातलं उत्कट सौंदर्य आणि त्यानंतर त्या कृतीला मिळालेलं आर्थिक महत्त्व, ऐतिहासिक महत्त्व हा एक विलक्षण संगम दिसतो.

कॅथलिक सूझाला चर्चमधली ढोंगी आणि खोटी वर्तणूक यांचा इतका संताप होता, की त्यानी चेहऱ्याचं मानवी रूपच बदलून टाकलं. कपाळात डोळ्यांचं स्थान गेलं. भुवयांमधून निघालेल लांब, सरळ नाक मोठ्या दातांपर्यंत येऊन पोचलं. किंबहुना त्याच्या चित्रांची ती एक खूणच बनून गेली. आपण पिकासोच्याही पुढे गेलो आहोत, अशी जाणीव त्याला होत राहिली.

आधुनिक औद्योगिकरणामुळे निर्माण झालेलं माणसाचं विरूप, कुरूप आणि संगतीहीन अंतर्मन आधुनिक भारतीय संस्कृतीमध्ये उमटवणारी सूझाची चित्रकला मूलभूत वेगळेपणामुळे उठून दिसली.

एम्.एफ्.हुसेन हा इथल्या समाजाला अधिक माहीत असलेला चित्रकार, त्याच्या चित्रांमध्ये सामान्य स्त्री-पुरुषांची चित्रं, 'फार्मरस् फॅमिली'सारख्या चित्रात खास करून दिसणारी 'मराठी विमेन' हे असंच लक्षणीय चित्र. 'जमीन' हे त्यांचं चित्र आधुनिक भारताचं प्रतीक असल्यासारखं वाटतं. आपल्या या चित्रांमधल्या माणसांच्या आकृतीबद्दल हुसेन यांनी म्हटलं आहे, "How can I go abstract when there are 600 & million people around me in India?" भारतातल्या जनतेचं हे अस्तित्त्व कलाकार, लेखक यांच्यापासून कामगार नेते आणि राजकीय पुढारी यांच्यापर्यंत कुणालाच विसरता येणार नाही.

प्रगतीशील चित्रकारांच्या ग्रुपमधले के.एच्.आरा यांच्या चित्रांमध्ये एक वेगळंच रसायन जाणवतं. निर्लेप पण करुणामय अशा त्यांच्या नग्न स्त्रियांच्या चित्रांकडे पाहिल्यावर त्यांचं भावनाशील अंतःकरण त्यातून डोकावताना दिसते. आयुष्याची सुरुवात इतरांच्या मोटर गाड्या स्वच्छ करणारी व्यक्ती या भूमिकेत केल्यानंतर ते ज्या उंचीला पोहोचले, चित्रकार म्हणून जे सौंदर्य त्यांनी रंगवलं. ते पाहिल्यावर त्यांचा आदर, कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. संत मुक्ताबाईच्या अभंगातली आकाशात उडणारी, सूर्याला गिळून टाकणारी मुंगी आठवत राहते. (मुंगी उडाली आकाशी, तिने गिळीले सूर्यासी) त्यांच्या छोट्या घरात टप्प्या टप्प्यानी त्यांनी रंगवलेलं 'मराठा बॅट्ल' हे चित्र त्यातला मानवतेचा आविष्कार आणि त्यातली आंतरिक लय यामुळे विलक्षण वाटते. १९४४ साली या चित्राला गव्हर्नरचं बक्षीस मिळालं. लेडननी त्यावर लिहिलं आहे, "This painting gives a tantastic view of a swaying battle line disappearing into the dust in which a hundred figures are marshalled into a pervading zhythm."

मानवी जीवनामधला छाया-प्रकाशाचा खेळ वास्तवतेच्या रंग-रेषांमधून दाखवणारे चित्रकार पाहिले, की त्या तुलनेनी एस्.एच्.रझा यांच्या चित्रांमध्ये अमूर्तातलं मूर्ताचं प्रतिबिंब शोधताना आनंदाचा गूढरम्य अनुभव येतो. निसर्ग चित्रांपासून (Landscape) सुरुवात करून नंतर त्यांचा प्रवास ज्या रंगांच्या आणि आकृतींच्या दिशेनी होत गेला, तो अवर्णनीय आहे. त्यांच्या जन्मभूमीचे-राजस्थानचे रंग त्यात आहेत. त्यात अंतर्गत ऊर्मी आहेत, त्याचबरोबर त्यातून पुननिर्मिती साधण्याची ताकद आहे. लहानपणचं शाळेत जाताना होणाऱ्या प्रवासातलं अरण्यदर्शन, नदीच्या प्रवाहाबरोबर विणले गेलेले मनाचे धागे, त्यातून जाणवलेले पृथ्वीच्या गाभ्यातले निर्मितीचे अनंत कंद, (जर्मिनेशन, ट्री, वॉटर, इमर्जन्स) हे सर्व रझांच्या चित्रांचं वैभव आहे. (एक उल्लेख करावासा वाटतो, तो म्हणजे रझा फाउंडेशन या संस्थेतर्फे नव्या कलेसाठी, उद्योन्मुख कलाकारांसाठी त्यांनी एक निधी उभा केला. अशोक वाजपेयी हे त्यांचे कविमित्र त्याची उत्तम तऱ्हेनं जोपासना करत आहेत.)

एच.ए.गाडे हे रझांचे मित्र. नागपूरच्या स्कूल ऑफ आर्टमध्ये ते बरोबर शिकत होते. निसर्गचित्रण हे त्यांचं वैशिष्ट्य. त्यांच्या काही चित्रात भारतीय वास्तवाचं चित्रण आढळतं. 'मॅन ऑन डॉकी' किंवा 'वीमेन विथ हाउसेस्' अशा चित्रांमध्ये हे वास्तव दिसून येतं. (१९१७-२००१)

शिल्पकार बाक्रे : सदानंद बाक्रे हे या ग्रुपमधले शिल्पकार. जहॉगीर आर्ट गॅलरीच्या स्थापनेची कामगिरी ज्यांनी केली, त्या कावसजींचं त्यांनी केलेलं शिल्प हे त्यांच्या कलेच महत्त्वाचं उदाहरण म्हणता येईल. आपले चित्रकार मित्र के.एच.आरा यांच्या सहृदय, सौम्य आणि प्रेमळ व्यक्तित्वाचं हुबेहूब दर्शन देणारं त्यांच्या डोक्याचं शिल्प हे खासच म्हणावं लागेलं. बॉम्बे आर्ट सोसायटीच्या जागेत ते आजही विराजमान झालेलं दिसतं. लेडनचं बाक्रे यांनी केलेलं / काढलेलं/ चित्र/शिल्प / शिल्प/त्यांचं विचारीगंभीर पण प्रेमळ व्यक्तिमत्त्व अचूक उभं करतं. बाक्रे यांचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या आधीचे शिल्पकार म्हात्रे, फडके, करमरकर यांच्या पुढचा टप्पा त्यांनी गाठला. व्यक्तिगत आत्माविष्कार त्यांनी शिल्पाकृतींमध्ये व्यक्तकेला. पुढे ते लंडनला गेले. परंतु तिथे त्यांचा मनोमेळ साधेना तेव्हा ते परत महाराष्ट्रात कोकणातल्या रत्नागिरीला आपल्या खेड्यात जाऊन राहिले, प्रोगेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपची निर्मिती, वृद्धी, त्यातली जवळीक आणि व्यक्तिस्वातंत्र्य हा एखाद्या चित्रफितीसारखा माझ्या डोळ्यासमोर येत राहतो, असं त्यांनी म्हटलं आहे.

कलाकार आणि संयोजक : बाक्रे यांच्या नंतरचे शिल्पकार आदि दावियेरवाला यांचा उल्लेख यशोधरानी केला आहे, तो त्यांनी आपली वेगळी वाट कशी शोधली, या संदर्भात. प्रोग्रेसिव्ह

प्रतिभावंत कलाकारांच्या नंतरच्या पिढीतले कलाकार या संदर्भात इतर चित्राकारांचाही तिनी उल्लेख केला आहे, त्यांची वैशिष्ट्यं, त्यांचं थोडक्यात चरित्र हे देखील दिलं आहे. प्रोगेसिव्ह कलाकारांचं सूत्र पुढे नेत असतानाच व्यक्तिगत निर्मितीच्या जाणिवा त्यांनी कशा घडवल्या, चितारल्या हे तिनी लिहिलं आहे. त्यांचा तपशील इथे देणं केवळ अशक्य आहे. परंतु त्या पिढीतले चित्रकार आणि बाल छाबडा, केकू गांधी यांच्यासारखे संयोजक ऊर्फ सहप्रवासी, तसंच अकबर पद्मसी, तय्यब मेहता, गायतोंडे, क्रिशन खन्ना, रामकुमार असे प्रतिभावंत चित्रकार यांची फार चांगली ओळख तिनी करून दिली आहे. कलेचा १९ व्या शतकापासून सुरू झालेला इतिहास २१ व्या शतकापर्यंत तिनी दाखवला आहे. हे लेखन अत्यंत अप्रतिम आणि मन-बुद्धी-कल्पना यांना आनंद आणि प्रेरणा देणारं आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाच्या जोडीला कलेचा असा आंतरिक आणि बाह्यरूप दाखवणारा प्रवास संवेदनशील रसिक आणि उत्सुक प्रेक्षकांना फारच सुंदर दर्शन देतो. आधुनिक कलेचं, कलाकारांच स्वरूप उभं करतो.

मैत्रीची वेगळी मिती : यशोधराची पुस्तकं पुष्कळ आहेत. मी त्यातली दोन वाचली, एक 'पेंटेड वर्ल्ड ऑफ वारलीज्' आणि दुसरं 'मेकिंग ऑफ मॉडर्न आर्ट इन इंडिया'. ते देखील मी पूर्ण वाचू शकले नाही. माझा व्यवसाय संगीतकाराचा. गाण शिकवणं, रियाज करणं, आमच्या ग्वाल्हेर गायकीचा विचार करणं हे माझे नित्याचे उद्योग सांभाळून यशोधरा दालमियासारख्या साक्षेपी आणि सखोल चिंतन, मनन करणाऱ्या, कलाविश्वाचं वास्तव पण सुंदर दर्शन घडवणाऱ्या लेखिकेचं लेखन वाचायचा मी विचार केला, ते मात्र फार चांगलं झालं. भारतातल्या कलाविश्वाचे ऐतिहासिक दर्शन घेताना माझ्या कलाप्रेमी मनाला दिलासा मिळाला, प्रेरणा मिळाल्या.

गेली पन्नास-साठ वर्ष यशोधरा आणि मी अतिशय जवळच्या मैत्रिणी आहोत. पण तिचा बायो-डेटा मी कधीच वाचला नव्हता. तिच्या पुस्तकांशी आणि व्यक्तित्वाच्या मूळबंधांशी माझी प्रथमच ओळख झाली. कलांकडे, कलाकारांकडे, संगीताकडे पाहताना एका वेगळ्याच ममत्वाचा माझ्या मनामध्ये प्रवेश झाला. वाचन-मनन-लेखन यांचं सारसर्वस्व मला गवसलं.

नीला भागवत, *मुंबई*
neela.bhagwat@gmail.com

(पान १३ वरून) प्लेनरी आणि समांतर सत्रांमधून घेतलेल्या साक्षींवरून हे डिक्लेरेशन थेट तयार झाले. कॉर्पोरेट नियंत्रणापासून दूर आणि स्त्रीवादी, समुदायाच्या नेतृत्वाखालील भविष्याकडे सत्तेची पुर्नकल्पना करण्याची निकडीची गरज ही संमेलनाच्या घडामोडीतून दिसून आली.

या घोषणापत्रातील प्रमुख मागण्यांचा थोडक्यात सारांश येथे आहे:

- राष्ट्रीय शेतकरी धोरणानुसार 'शेतकरी' म्हणून फक्त मालकी हक्काची जमीन असणाऱ्या महिलांचा समावेश नव्हे तर शेतीसंलग्न उपजीविकांमाधल्या महिलांचा समावेश असावा
- लिंगभाव, जात, धर्म, वर्ग यावर आधारित विषमता व हिंसाचाराचा तीव्र विरोध
- आदिवासी आणि वन-रहिवासी महिलांच्या वनाधिकारांची ओळख आणि संरक्षण
- सर्व योजनांमध्ये लिंगभाव निहाय आकडेवारी
- वनाधिकार कायदा (FRA), २००६ आणि आदिवासी, जंगलात राहणाऱ्या व वनोत्पन्नावर अवलंबून असलेल्या महिला शेतकऱ्यांसाठी PESA ची पूर्णपणे अंमलबजावणी
- शेतमजूर, स्थलांतरीत शेतकरी महिलांसाठी वेतन कायदा आणि सोयीसुविधांविषयीची अंमलबजावणी
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीची योग्यरीत्या तरतूद
- शेतकरी कुटुंब व ग्रामीण भागातील तरुणांसाठी शैक्षणिक समावेश
- एकल महिला, विधवा आणि आत्महत्या प्रभावित कुटुंबातील महिलांना आधार
- समुदाय आधारित मानसिक आरोग्य सेवा
- केवळ जमीन मालकच नव्हे तर प्रत्यक्ष शेतीची कामे करणाऱ्यांची शेतकरी म्हणून नोंदणी
- कॉर्पोरेट जमीन ताब्यावर निर्बंध घालण्याबाबत अडथळे
- महिलांच्या नेतृत्वाखालील पर्यावरणस्नेही शेतीच्या उपक्रमांचा विस्तार
- वन-रहिवासी आणि पशुपालक महिलांना प्राथमिक हक्कधारक म्हणून मान्यता

सामूहिक नेतृत्वाच्या दिशेने : राष्ट्रीय महिला किसान मंचची स्थापना/निर्मिती

संमेलनाच्या सर्वात महत्त्वाच्या फलितांपैकी एक म्हणजे राष्ट्रीय महिला किसान मंचची स्थापना! जी देशभरातील महिला शेतकऱ्यांचे नेतृत्व बळकट करण्यासाठीचा सामूहिक मंच राहील. ही काही वरवरची कल्पना नसून ती संपूर्ण संमेलनात झालेल्या सखोल, राज्यस्तरीय विचार विनिमयाचे फलित होते.

त्यांच्या प्रादेशिक आव्हानांवर चिंतन करण्यासाठी, प्राधान्य द्यावयाच्या मुद्द्यांचा क्रम स्पष्ट करण्यासाठी आणि महिला शेतकरी प्रतिनिधींची निवड करून राष्ट्रीय अजेंड्यात या चिंता मांडण्यासाठी प्रत्येक राज्य गट एकत्र आले. प्रत्येक राज्याने आपला कृती आराखडा सादर करण्यासाठी व राज्याचे नेतृत्व करणाऱ्यांची

ओळख करून दिली व ही प्रक्रिया शेवटच्या प्लेनरी सत्रात संपली. वातावरण उल्हासाने भरलेले होते कारण हे फक्त कोणासाठी कोण बोलत आहे याबद्दल नसून कोण अजेंडा ठरवत आहे याबाबत ते होते. अर्थातच ही जागा महिला शेतकऱ्यांसाठी असल्याने विविध राज्याच्या आदिवासी, समुद्रकिनाऱ्यालगत आणि दुष्काळग्रस्त भागातील महिला नेतृत्वाची भूमिका घेत पुढे सरसावल्या.

महिला किसान मंचची स्थापना ही एक ऐतिहासिक बदलाची घटना आहे. ती फक्त महिला शेतकऱ्यांना शेती कसणाऱ्या म्हणूनच नव्हे तर राज्यकर्ते, बैठकीत मांडावयाचे विषय तयार करणाऱ्या आणि चळवळी उभ्या करणाऱ्या म्हणून देखील ओळखले पाहिजे हे ठामपणे सांगते.

संमेलन संपत येत असताना, एका बदलाची जाणीव होऊ लागली ती म्हणजे फक्त सहभागींच्या भाषेतच नव्हे तर कल्पनेतही बदल जाणवू लागला. जंगलांच्या परिघापासून ते मच्छीमारांच्या बंदरांपर्यंत, ऊसाच्या फडापासून ते बीजबँकांपर्यंत महिला सहभागी होण्याची वाट पाहत नाहीत. त्या नेतृत्व करत राहतात.

मकामचे गेल्या दशकातील काम दर्शवते की स्त्रीवादी शेतकी राजकारण हे शेतकऱ्यांच्या चळवळींचा भाग राहिलेला नाही. ते कोणत्याही अर्थपूर्ण परिवर्तनासाठी केंद्रस्थानी असते. दुसरे राष्ट्रीय महिला किसान संमेलन हे इथेच संपणारी चर्चा नसून ती पुढे सातत्याने कार्यरत राहणारी चळवळ आहे. भारतातील शेतीचे भविष्य कोणत्याही बोर्डरूममध्ये लिहिले जाणारे नसून ते शेतात आणि त्यांची लागवड करणाऱ्या महिलांकडून लिहिले जाईल याची आठवण करून देते.

संमेलनातील एका बॅनरवर लिहिले होते: जमीन, जंगल, औरत: सबका अधिकार है. (जमीन, जंगल, स्त्री: सर्वांना अधिकार आहेत.) ही फक्त एक घोषणा नाही. ही सातत्याने चालू राहणारी एक क्रांती आहे!

गार्गी मांगुळकर, *पुणे*
gargiepm@gmail.com
श्रुती वाघमोडे, *पुणे*
shrutiwaghmode.ss@gmail.com
निऋती चव्हाण, *पुणे*
nirutichavan24@gmail.com

(पान ४५ वरून) राहुल अनविकर कांशीरामसाहेबांच्या राजकीय सिद्धांताचे गाणे म्हणतात. त्यांची गाणी म्हणजे 'बसपाची जाहीर सभा' असते. त्यांच्या गाण्याशिवाय महाराष्ट्रात बसपाची सभा क्वचितच झाली असेल!

या कलंदराच्या आयुष्यात हृदयविकाराचे दोन झटके आले. पण त्यांच्या गायकीचा बाज आजही तितकाच प्रभावी आणि टवटवीत आहे. हा आवाज सोशल मीडियाच्या माध्यमातून आजही सर्वदूर पोहोचतोय. काळाच्या शिलालेखावर तो कायमचा कोरला गेला आहे. त्या आवाजाला आता कधीच मरण येणार आहे. तो अक्षुण्ण स्वरूपात जनतेला नेहमीच प्रेरणा देत राहील. त्यांच्या 'गुलामी का टूट गया जाल' या गाण्याने तर संपूर्ण आंबेडकरी चळवळीत नवा जोश भरून टाकला आहे. अगदी महाराष्ट्रच नाहीतर हैद्राबाद, तेलंगणा, तामिळनाडू, छत्तीसगड, पंजाब, उत्तर प्रदेश अशा सर्व राज्यात राहुल अनविकर यांची गायकी दुमदुमली आहे. याचे श्रेय जितकं त्यांचं तितकंच ते त्यांची गाणी लिहिणाऱ्या प्रतापसिंग बोदडे यांचंसुद्धा आहे. हे इथे नमूद करणे आवश्यक आहे. बोडदे यांच्या लेखणीतून उतरलेल्या गाण्यांचा आशय राहुल अनविकर यांच्या आवाजातून नेमका पोहोचतो. परदेशातही त्यांचे चाहते आहेत. तिथले तरुण 'मन चंगा' हे गाणं गातात. अमेरिकेच्या एका दौऱ्यात हे गाणे तिथे खूप गाजले होते. तिथल्या लोकांनी खूश होऊन राहुल अनविकर यांच्यावर डॉलर उधळले. इतकी लोकप्रियता मिळवूनही राहुल अनविकर यांचे पाय जमिनीवर आहेत. ते म्हणतात, "माझी कला बाजारू नाही. ती डॉ. आंबेडकर यांचे राजकीय मिशन पूर्ण करण्यासाठी आहे." त्यांचा हा दृष्टिकोन त्यांना वेगळेपण देऊन जातो. चळवळीत गायकांच्या गर्दीत हा एक वेगळा गायक ठरतो.

असा हिंमतबाज कलाकार सतत जनतेचे वैचारिक मंथन घडवत असतो. त्याचे गायनरुपी मिशन त्याच्यावर कुणी लादलेले नसते तर ते त्याने स्वतः स्वीकारलेले असते. या ध्येयवादी जगण्याची किंमत सुद्धा व्यावहारिक जीवनात अपरिहार्यपणे चुकवावी लागते. राहुल अनविकर यांनी कोणतीही तक्रार न करता ती चुकवली आहे. देशभरच्या भटकंतीमध्ये त्यांचं कुटुंब विस्कटून गेलं. जीवनसाथी सोडून गेली. एकटेपण वाट्याला आले. पण त्याची त्याने पर्वा केली नाही. त्यांनी त्यांच्या आशयसंपन्न गायकीचा कव्वालीनुमा बाज जपला. त्यातले बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांचे वैचारिक तत्त्वज्ञान त्यांनी जोपासले आणि सहजपणे जनतेपर्यंत नेले. आंबेडकरी कलावंत म्हणून कुणाच्या मंचावर गेलं पाहिजे आणि कुठे नाही गेले पाहिजे हे तत्त्व त्यांनी कसोशीने पाळले.

राहुल अनविकर हे सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान असलेले कलाकार आहेत. त्यांनी अभावग्रस्त समुदायांच्या आकांक्षा सातत्याने त्यांच्या गाण्यातून मांडल्या आहेत. समष्टीच्या समग्र कल्याणाचे स्वप्न त्यांनी पाहिले. त्यांचे गाणे म्हणजे मानवी उत्कर्षाची आभाळगीते आहेत. राहुल अनविकर हे वामनदादांच्या नंतर देशभर प्रचंड फिरलेले गायक आहेत. चळवळीतला गायक हा प्रथम चळवळीचा कार्यकर्ता असतो. त्याची वाटचाल-त्याचे

भवितव्य चळवळीशी जोडलेलं असतं. चळवळीचं बहरणं, विस्तारीत होणं, संकुचित होणं किंवा विखंडीत होऊन कुंठित होणं या सगळ्या उतार चढावांचे परिणाम अशा समर्पित कार्यकर्त्यांच्या जीवनावर होत असतात.

राहुल अनविकर या सगळ्या अनुभवातून तावून सुलाखून निघाले आहेत. ते ठामपणे मांडतात, "डॉ. आंबेडकर यांचं राजकीय मिशन पूर्ण करणं हेच माझं जीवितध्येय आहे आणि मरेपर्यंत मी तेच करत राहणार!" हा त्यांचा निर्धार या कलाकाराला एक वेगळी उंची देतो. वाट चुकलेल्या, अवडंबर माजवणाऱ्या किंवा संधीसाधूपणा करणाऱ्या आंबेडकरी नेतृत्वावर ते आपल्या गाण्यातून फटकारे मारतात. त्यांना आरसा दाखवतात. याचा परिणाम सुद्धा या मनस्वी कलाकाराला वेळोवेळी भोगावा लागला आहे. पण त्यांनी त्याची कधी पर्वा केली नाही. ते त्यांच्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत.

राहुल अनविकर यांची गझल गायन शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचा आवाज बहुआयामी आहे. गजल, कव्वाली, शाहीरी, पोवाडा, प्रेमगीत अशा सर्व ढंगाची गाणी ते सहज म्हणतात. त्यांच्या स्वरात सर्व रसांचा मेळ आहे. त्यांचे शब्द थेट हृदयात घुसतात, अंगावर शहारे आणतात. कधी तर ऐकणाऱ्याला नृत्य करायला भाग पाडतात. अशा प्रकारे ते लोकांच्या मानसपटलावर कायमचे छापले जातात. असं म्हणता येईल की गाण्यांच्या माध्यमातून उत्पीड़ितांच्या अभिव्यक्तीचा (Pedagogy of oppressed) सिद्धांत राहुल अनविकर यांनी आंबेडकरी चळवळीत रुजवला आहे.

आंबेडकरी चळवळीतील सांस्कृतिक योद्धा म्हणून त्यांचं कार्य मोठं आहे. त्यांना लोकांचा चांगला प्रतिसाद मिळतो. त्यांची कला जनतेच्या हृदयाची धडकन बनलीय. पण त्यांचे मिशन अजून अपूर्ण आहे. बहुजन समाजाला शासनकर्ती जमात बनवण्याच्या ध्येयासाठी राहुल अनविकरसारख्या अव्वल कलाकाराने आपले सर्वस्व पणाला लावले आहे. ते ध्येय कधी पूर्ण होईल हे माहीत नाही. पण म्हणून राहुलसारखे कणखर कलाकार हताश होत नाहीत. ते नव्या जोमाने पुढची वाट चालतच राहतात.

(हा लेख आणि चित्रफिती 'Influential Shahirs, Narratives from Marathwada' (मार्गदर्शक शाहीर, मराठवाड्याची गीते-कथने) या मालिकेतील असून इंडिया फौंडेशन फॉर द आर्ट्स तर्फे राबवण्यात येणाऱ्या संग्रह व वस्तूसंग्रह कार्यक्रमाचा भाग आहेत. पीपल्स अर्काइव्ह ऑफ रुरल इंडियासोबत राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पास गोइथ इन्स्टिट्यूट/ मॅक्स मुलर भवन दिल्ली यांचे आंशिक अर्थसाहाय्य लाभले आहे.)

केशव वाघमारे, *पुणे*
Kshavwaghmare14@gmail.com

(पान ३० वरून) रेंगाळायला मला आवडायचं. ह्या रेंगाळण्यामधे साहित्य, कला, नाटक आणि नाटकबाह्य चर्चा-गप्पा भरभरून व्हायच्या. ह्या गप्पांना-चर्चांना कुठलाही विषय वर्ज्य नसायचा. ह्यात होणाऱ्या चर्चा-गप्पा निव्वळ निरर्थक असतात असं मला वाटत नाही. उलट माणूस म्हणून एकमेकांना समजून घ्यायला, नातं निर्माण व्हायला त्या मदतच करतात. नाटकाच्या आणि जगण्याच्या घडामोडीला त्या पूरक असतात असच मला वाटतं. एक शिक्षक म्हणून त्यांच्या बरोबर सुरू झालेल्या नात्याला, काळाच्या ओघात, मैत्रीच्या नात्यापर्यंत पोहोचायला, ह्या चर्चा-गप्पा कारणीभूत असू शकतात असं मला वाटतं.

आम्हा दोघांच्या मैत्रीचा मध्यवर्ती बिंदू म्हणजे 'नाटक-रंगभूमी'. 'या भूमीवर आनंदानी, आनंदासाठी, आपल्याला वाटतं ते करून पाहावं, प्रेक्षकांच्या बरोबरीने आनंद वाटून घ्यावा, धडपडावं-पडावं, शोध घ्यावा, आणि परत, नवं नाटक करायला उभं राहावं.' हा एवढाच साधा-सरळ हेतू, आम्हा दोघांमध्ये, अगदी समान होता. एकमेकांच्या बरोबरीनं किंवा स्वतंत्रपणे, 'रंगभूमीशी' इमान राखत काम करत राहणं, आणि हेतू साध्य करणं, हा आमच्या मैत्रीचा आशय होता. खूप आदर होता मला त्यांच्याबद्दल, प्रेम होतं आमचं एकमेकांवर, पण म्हणून, आमचा हा मैत्रीचा प्रवास सुखा-समाधानाचा-समृद्धीचा वगैरे अजिबात नव्हता. खाच-खळगे होते, मतभेद होते, हट्ट होते, परखड असण्याचे आग्रह होते, क्वचित प्रसंगी अबोलाही होता,आणि हे सगळं जे होत होतं, ते वैयक्तिक आकसापोटी किंवा द्वेषापोटी होत नव्हतं, तर नाटक करण्यामागचा हेतू, आणि मैत्रीचा आशय, ह्या मुद्द्यांशी आपण प्रामाणिक राहावं, ठाम असावं, ह्या कारणासाठी ते होत होतं.

'जागर'मध्ये सुरुवातीला मला माधव वझे आणि वासुदेव पाळंदे यांचा धाक वाटायचा. कारण दोघंही वयानी, ज्ञानानी मोठेच होते. पण जस जसा दोघां बरोबरचा सहवास वाढत गेला, प्रेमाची ऊब जाणवायला लागली तस तशी त्यांच्यातल्या थोरलेपणाची जाणीव व्हायला लागली. साधारण वीस बावीस वर्षांपूर्वी, 'गुरुजी' म्हणजे वासुदेव पाळंदे सर गेले. आता परवा, म्हणजे बुधवारी, सात तारखेला, 'सर', म्हणजे माधव वझे सर गेले. दोन थोरली माणसं आता 'जागर'मध्ये नाहीत. पण ह्या दोन थोरल्या माणसांच्या विचारांचा खजिना 'जागर'च्या गाठीशी आहे. आणि त्या विचारांना धरून काम करत राहणं हीच त्यांना खरी श्रद्धांजली असणार आहे!

धन्यवाद!

गजानन परांजपे, *पुणे*
gajaparanjape@gmail.com

संवाद - स्पंदनं... चलो मुंबई...

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद

अमोल केरकर

पन्नास वर्षांपूर्वी स्त्री मुक्ती चळवळीला पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेबरोबर संघर्ष करावा लागेल याचे भान होते. तसेच वर्ग, वर्ण, जात यांचे वर्चस्व राबवणाऱ्या यंत्रणांशी संघर्ष करणाऱ्या समाजविभागांशी आपल्याला जोडून घ्यावे लागेल याचाही समज होता. पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेमुळे विशेषाधिकार मिळालेल्या पुरुषांशी संघर्ष करत असतानाच या विचारांचे वाहक असणाऱ्या स्त्री-पुरुषांशी संवाद करून त्यांचे प्रबोधन करायचे अशी भूमिका चळवळीने घेतली. या ५० वर्षात या भूमिकेचे फलित म्हणून तयार झालेले अनेक पुरुष कार्यकर्ते स्त्री मुक्ती चळवळीचा भाग झाले आहेत. या चळवळीत ते सक्रिय आहेत. त्यांची वेब मीटिंग ४ मे रोजी घेण्यात आली. सेफ्टी ऑडिटची मोहीम स्त्रियांना आपलीशी वाटत आहे. या मोहिमेत सामील होण्याचे आवाहन पुरुष कार्यकर्त्यांना करण्यात आले. घरगुती हिंसा, व्यसनाधीनता, घरकामात पुरुषांचा सहभाग, कुटुंबांतर्गत लोकशाही, निर्णयप्रक्रियेत स्त्रिया व मुलांना स्थान, विखारी मर्दानगी, पारलिंगी व्यक्तींचे प्रश्न, मुलग्यांवरील अत्याचार, आदिवासींमध्ये लोप पावत चाललेली समानता, युवकांवर हिंदुत्वाचा होणारा परिणाम अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. लैंगिक हिंसेवर पुस्तिका काढावी, १३ ते १७ वयोगटातील मुलांचा सहभाग वाढवावा, सकारात्मक पुरुषत्त्व या विषयावर युवकांमध्ये काम करावे, कॉलेजमध्ये कार्यक्रम करावेत, सर्व विभागवार परिषदांमध्ये 'स्त्री चळवळीत पुरुषांचा सहभाग' या विषयावर मेळावे घ्यावेत, महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेला पूरक ठरेल अशी एखादी पुरुष कार्यकर्त्यांची परिषद डिसेंबरमध्ये घ्यावी अशा अनेक सूचना आल्या.

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या सुकाणू समितीची प्रत्यक्ष बैठक ६ मे रोजी पुणे येथे झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सेफ्टी ऑडिटची मोहीम १५ मे ते ३० जून या काळात पूर्ण करण्यासाठी मोहिमेला गती देण्याचे ठरले. त्यासाठी मोहिमेची संकल्पना, प्रश्नावली, पाहणी चालू असताना काय करावे व काय करू नये याची यादी तयार करून कार्यकर्त्यांना द्यावी असे ठरले. कार्यकर्त्यांची वैचारिक तयारी करून घेण्यासाठी विभागवार कार्यशाळा जूनपासून घेण्याचे ठरले. विभागवार परिषदा ऑक्टोबरमध्ये घेण्यासाठी महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागांची जबाबदारी सुकाणू समितीच्या सदस्यांवर सोपवण्यात आली. महाराष्ट्रात कुठेही सामाजिक आपत्ती आली तर संघटनांची जोडणी करून प्रतिसाद संघटित करावा असे ठरले. यासाठी स्थानिक लोकांकडून तपशील मिळवणे, पोलिसात गुन्हा नोंदवणे, पाठपुरावा करणे, सत्यशोधन अहवाल तयार करणे, मुंबईतून कायदेशीर मदत मिळवणे याची चर्चा झाली. आर्थिक सहभागासाठी शंभर रुपयाचे कुपन काढावे व प्रत्येक जिल्ह्यासाठी एक हजार कुपने छापावीत असे ठरले. मोहिमा, कार्यशाळा व इतर कार्यक्रमांचा खर्च स्थानिक पातळीवर करावा असे ठरले. परिषदेत भाग घेण्यासाठी प्रवेश मूल्य रुपये १००/- भरावे लागेल. २०, २१, २२ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे परिषद होईल. तेथील तीन दालने, एक सभागृह व भोवतालची मोकळी जागा यांचा वापर विनामूल्य करण्यासाठी प्रतिष्ठानच्या संचालकांकडून सहयोग लाभला आहे. तीन दिवसात सहा सत्रे व शेवटच्या दिवशी आझाद मैदानावर रॅली घेण्याचे ठरले. उद्घाटन व समारोप ही सत्रे सर्वांसाठी असतील. या तीन दिवसात सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येईल.

महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेतर्फे दिनांक ९ मे रोजी चिपळूण येथे सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत 'मनुस्मृति नको, संविधान हवे' या विषयावर प्रबोधन कार्यशाळा घेण्यात आली. सर्वसामान्यांच्या डोक्यात ठाण मांडून बसलेल्या, उतरंडीवर आधारित जुनाट कल्पनांना सोडून लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांवर आधारित संविधानाला बळकटी देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या कार्यशाळेत डॉ.लता प्र.म., सुरेश सावंत, ॲड.असुंता पारधे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ६५ शिबिरार्थी सामील झाले. ११ मे रोजी याच विषयावर कुडाळ येथे संपूर्ण दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला ॲड.मिहीर देसाई, डॉ. लता प्र. म., प्रा. प्रतिमा परदेशी व सुरेश सावंत यांनी मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक संसाधनांचा एक भाग म्हणून युट्युब चॅनेल तयार करून त्यावर युवकांचा पॉडकास्ट प्रसारित करण्यासाठी ११ मे रोजी ३ तासांची एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यात प्रत्येकी दोन युवकांची मुलाखत निवेदकाने घेण्यासाठी ६-६ जणांच्या गटाची नोंदणी करण्यात आली.

सेफ्टी ऑडिटच्या मोहिमेने या काळात चांगलीच प्रगती केली आहे. ११ तारखेला औरंगाबादमध्ये झालेल्या मीटिंगमध्ये शहरात सेफ्टी ऑडिट करण्याचे ठरले. १४ मे रोजी नागपूर येथे झालेल्या मीटिंगमध्ये सार्वजनिक ठिकाणी तसेच सरकारी ऑफिसमध्येही स्त्रियांसाठी शौचालय नसण्याचा मुद्दा चर्चेत आला. १७ मे रोजी नागपूर येथे सेफ्टी ऑडिटच्या कामासाठी पाच-सहा लोकांचे

गट तयार करून शक्य असेल तिथे एकाच ठिकाणी दिवसा व रात्री दोन्ही वेळा पाहणी करण्याचे ठरले. रात्रीच्या ऑडिटसाठी जमल्यास पुरुषांना गटात सामील करावे अशी चर्चा झाली. सुरक्षिततेच्या दृष्टीने आयत्यावेळी अनोळखी व्यक्तींना पाहणीच्या कामात सामील करून घेऊ नये असे ठरले. रेल्वे स्टेशन व बस स्टँड, तसेच मेट्रोचे मेन स्टेशन व मेन बस स्टँड इत्यादी सकट साधारण दहा-बारा ठिकाणचे ऑडिट करण्याचे ठरले. १९ मे रोजी मुंबई, ठाणे व नवी मुंबई येथील कार्यकर्त्यांसाठी सेफ्टी ऑडिटची संकल्पना, प्रश्नावली समजून घेणे व पुढील नियोजन यासाठी ऑनलाईन मीटिंग झाली. त्याच दिवशी धाराशिव येथे वेब मीटिंग झाली. जिल्ह्यातील दहा बस स्थानकांची पाहणी करण्यासाठी कार्यकर्त्यांचे गट तयार करून त्यांचे प्रशिक्षण करण्याचे ठरले. २० मे रोजी अहमदनगर, २१ मे रोजी अमरावती व २२ मे रोजी बीड येथे या विषयावर कार्यकर्त्यांच्या मीटिंग झाल्या. अमरावती येथील मिटींगला वेगवेगळ्या संघटनांच्या तालुक्याच्या ठिकाणच्या महिलाही उपस्थित होत्या हे वैशिष्ट्य! रात्रीच्या सेफ्टी ऑडिटबद्दल विशेष चर्चा झाली. शेवटची बस चुकली तर ऑटो रिक्षात बसणेही सुरक्षित वाटत नाही. तिथे राहायची सोय नाही असे महत्त्वाचे मुद्दे पुढे आले. हेल्पलाइनचा अनुभव कधी चांगला तर कधी वाईट! मेळघाट भागातही काम करण्याचे ठरले. बीड जिल्ह्याच्या मिटिंगमध्ये प्रत्येक तालुक्यातील समविचारी संघटना एकत्र येऊन त्यांचे गट करून काम करण्याचे ठरले.

स्त्री आणि पुरुष या दोन लिंगओळखींबरोबर समाजातील ट्रान्स समुदायांनाही समाजाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या मूळ प्रवाहात आणणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने एलजीबीटीक्यू+ समुदायांबरोबर काम करणाऱ्या संघटना महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेत सामील झाल्या आहेत. १८ मे रोजी क्वीयर - ट्रान्स समुदायांच्या प्रश्नांवर आणि मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी एक ऑनलाईन मीटिंग घेण्यात आली. या समुदायातील काही व्यक्तींनी समाजात वावरताना त्यांना येणारे अनुभव मांडले. वस्तूतः लहानपणीपासूनच व्यक्तींना स्त्री किंवा पुरुष या साच्यात बसवण्याच्या अट्टाहासामुळेच हे प्रश्न उद्भवतात हे लक्षात आले. समाजाचा या समुदायांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा झाली.

कामगार संघटनांबरोबर २५ मे रोजी श्रमिक, दादर येथे झालेल्या प्रत्यक्ष बैठकीला आयटक, एचएमएस, विडी कामगार संघटना, एमएसईबी कर्मचारी संघटना, भारतीय महिला फेडरेशन, सर्व श्रमिक संघ, कामगार एकता कमिटी, पुरोगामी महिला संघटना, बँक ऑफ महाराष्ट्र एम्पलॉइज युनियन, मुंबई महानगरपालिका कचरा वाहतूक युनियन यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. केवळ कार्यक्रमासाठी एकत्र न येता पुढेही एकजूट टिकवली पाहिजे, विचारसरणी वेगळी असली तरी स्त्रीमुक्तीच्या विचारावर एकत्र व्यवहार करत राहिले पाहिजे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. ट्रेड युनियन संघटना स्त्री चळवळीच्या सुरुवातीच्या काळापासून मित्र संघटना असल्यामुळे व मोठ्या प्रमाणात स्त्रिया त्यांच्या सदस्य असल्यामुळे त्यांचा परिषदेतील व इतर मोहिमांमधील सहभाग महत्त्वाचा आहे.

सेफ्टी ऑडिटच्या मोहिमेने जोर धरल्यामुळे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातही मीटिंग्ज किंवा प्रत्यक्ष पाहणी झाली. २६ मे रोजी नागपूर स्टेशनची पाहणी करण्यासाठी गेलेली टीम लोहमार्ग पोलीस स्टेशनमध्ये पोहोचली. तेथे ९७ पुरुष व ३३ महिला पोलीस यांच्यासाठी मिळून एकच टॉयलेट होती. कपडे बदलण्यासाठी व्यवस्था नाही. ही पोलिसांची अवस्था! सर्वसामान्यांबद्दल काय बोलायचे? २७ मे रोजी संगमनेरच्या एस.टी. आगाराची पाहणी सुरू झाली. २९ मे रोजी नव्या मुंबईची सेफ्टी ऑडिटची प्रत्यक्ष मिटिंग झाली. मोहिमेची आखणी करण्याचे काम सुरू झाले. ३० मे रोजी 'माहेर' व 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संघटनांचे कार्यकर्ते अजनी रेल्वे स्टेशनला पोहोचले. हे महिला रेल्वे स्थानक आहे. येथे एकूण १८ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. स्टेशन मास्तर महिला असून त्यांनी सर्व प्रश्नांना व्यवस्थित उत्तरे दिली. रात्री नऊ ते सकाळी पाच वाजेपर्यंत या स्टेशनवर ट्रेनचा थांबा नाही. महिलांचे प्रसाधनगृह असुरक्षित आहे. हिरकणी कक्ष नाही. रात्री महिला पोलीसची ड्युटी स्थानकात नाही. पोलिसांकरता किमान सुविधाही नाहीत. अपंगांसाठी किंवा पारलिंगी लोकांसाठी वेगळी व्यवस्था नाही. हे आपल्याकडील लहान रेल्वे स्टेशनचे प्रातिनिधिक चित्र आहे. अर्थव्यवस्थेच्या आकाराचा ढोल बडवणाऱ्यांनी देशातला सर्वसामान्य माणूस काय अवस्थेत राहात आहे ते डोळे उघडून बघण्याची वेळ आली आहे.

अमोल केरकर, *मुंबई*

विद्या बाळ अध्यासन प्रकल्प दोन अंतर्गत स्त्री चळवळ आणि मी यांविषयी विविध क्षेत्रातल्या लोकांचे फेमिनिस्ट पॉड कास्ट मिळून साऱ्याजणी मासिकाच्या यू ट्यूब चॅनेल वर आहेत. ते शेअर करा, लाईक करा आणि यू ट्यूब चॅनेल subscribe करायला विसरू नका.

लिंक - https://youtube.com/@miloonsaryajani

QR code -

प्रतिनिधी यादी

हे मासिकाचे विस्तारित कुटुंबच आहे. प्रतिनिधी म्हणजे मासिकाच्या विस्तारित कुटुंबाचे घटक. प्रतिनिधी विनामानधन काम करतात. आपणही 'साऱ्याजणी'च्या संदर्भातील कामासाठी त्यांच्याशी संपर्क साधू शकता आणि वर्गणीही देऊ शकता.

महाराष्ट्र प्रतिनिधी
सरिता आवाड :
मो. ९८३३९८७५६८

अहमदनगर
प्रज्ञा हेन्द्रे-जोशी :
मो. ९८५००७५४४३

अकोला
दीप्ती जोशी :
फोन : ०७२४/२४२१६१३
मो. ९४२३१५०५१५

अमरावती
शोभा रोकडे :
मो. ९९६०९३७७६९

आंबेजोगाई
अरुंधती पाटील :
मो. ९४२२७४४१६६

औरंगाबाद
सुलभा खंदारे :
मो. ९४२२२०११२१
प्रतिभा अहिरे :
मो. ९२८४१९६३०४,
७२१९१३१३६८

बेळगाव
मनीषा सुभेदार :
फोन : ०८३१/२४०३९३८
मो. ९३४२५४१८८६

बीड
हेमलता पाटील :
फोन : ०२४४२/२२२४२०
मो. ९८२२६३११४४

बारामती
सीमा गोसावी :
मो. ९८५०९३४३४२

चिखली, जि.बुलडाणा
सत्य प्रयागबाई कुटे :
मो. ९८८१३१०२५८

बेंगळुरू
नीता जाधव :
मो. ९८४५०६६१७३

चाळीसगाव
वैशाली निकम :
मो. ९४२१५१२५३३

चंद्रपूर
गीता देव्हारे-रापुरे :
मो. ९९७५३४९५५५

गोवा (पणजी)
उज्ज्वला आचरेकर :
मो. ९४२११५७९४६

हैदराबाद
शुभांगी परळीकर :
मो. ९२९६०५०००२
फोन : ०४०/२४६०८५६६

जळगाव
शमा सुबोध :
मो. ९३७३०३५५३५

भडगाव, जि. जळगाव
गौतम बाविस्कर
मो. ९८२२९५२८५८
क्रांती सोनवणे
मो. ७७७५०२३२३१

कऱ्हाड
सविता मोहिते :
मो. ९८२२४०३७७१
(वेळ : सां ५ ते ६)

कोल्हापूर
उज्ज्वला हिरकुडे :
मो. ९८९०८३८६५५
समिक्षा फराकटे :
मो. ८००७१९०१०५

इचलकरंजी, जि. कोल्हापूर
प्रियंका म्हेत्रे :
मो. ७२४९८९२०८४

पो. जुगुळ, ता.अथणी, जि. बेळगाव
पो. खिद्रापूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
गंगा नर्सिंग होम
डॉ. राजश्री पाटील
मो. ८०८८२११२५२ /
८८८४००६००९

पद्मानगर, लातूर
शैलजा बरूरे :
मो. ९४२३७१४५३४

लातूर
उषा भोसले :
मो. ८८०६२२५६४३

महाबळेश्वर
नीता भिसे :
मो. ९४२०७७१५४३

मालगुंड
अस्मिता रुग्गे :
फोन : ०२३५७/२३५०१३
मो. ९६२३६९९१५४

मुंबई
मुलुंड
रजनी करंदीकर :
मो. ९८९२४७३३२७

विलेपार्ले (पू.)
विनिता हाटे :
फोन : ०२२/२६१३०६४२
(वेळ : सायं. ८ नंतर)

वाशी (नवी मुंबई)
शरयू देशपांडे :
मो. ९३२५००१९६२

वाशी - बेलापूर, नवी मुंबई
अजित मगदूम :
मो. ७५०६०६७७०९

नागपूर
सुभाष तुलसीता :
मो. ९३७१५९९९२३
वर्षा पतके थोटे (शब्दाली) :
मो. ७५५८४१९७६५

नाशिक
मेधा वैजापूरकर :
फोन : ०२५३/२५३०१०३
सायली आचार्य :
मो. ८४२१३८२०८३

पुणे
सुनीता भागवत (स्वारगेट) :
मो. ९४२२३१०३७८
दिलीप फलटणकर
(बाणेर-बालेवाडी) :
मो. ९८८१४१९७९६
मीरा कुलकर्णी (पाषाण) :
मो. ९४२२१८९२६४
अनुराधा आटोळे
(टिंगरे नगर)
मो. ९१४५२८८३२८

हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे
तरुजा भोसले :
मो. ९५६१०९३८३८

दौंड, जि. पुणे
अरुणा मोरे :
मो. ९८५००१४५७३

केडगाव, ता. दौंड, जि. पुणे
शोभा वाईकर :
मो. ९११२७३९४१८
पुरंदर जि. पुणे
अजरुद्दीन नदाफ :
मो. ९१३०५७६६९६

नंदुरबार
गौतम वाघ
मो.९६९९९७८३२२

परभणी
ज्योती चौंडे :
मो. ९०९६५०५१७६

निपाणी
शोभा तळेकर :
मो. ८३१७४६६३१५

सफाळे जि. पालघर
स्वाती भोईर :
मो. ८१०८३२२३९९

सावंतवाडी
अर्चना वझे :
फोन : ०२३६३/२७२८२८
श्वेतल परब
मो. ९४२३३०१८९२

मालवण
वैशाली पंडित :
फोन : ०२३६५/२५२९९२
मो. ९४२२०४३०२५

कणकवली
शमिता बिरमोळे :
फोन : ०२३६७-२३२९०९/२३२५०७

सिंधुदुर्ग जिल्हा
अर्पिता मुंबरकर :
मो. ९४२०२६११९६

सोलापूर
सरोजनी तमशेट्टी :
मो. ९९६०१०३२९४

सोलापूर मोहोळ, ग्रामीण
डॉ. स्मिता पाटील
मो. ७०२०५४८३०६
(वेळ : सकाळी ९ ते ११ व संध्या. ६ ते ९)

सोलापूर शहर व जिल्हा
डॉ.अस्मिता बालगावकर
मो. ९०२११०८६८६

सांगली
छायाश्री जाधव :
फोन : ०२३३/२३७६८६१
मो. ९८६००४९८८०

सांगली जिल्हा
सोनिया कस्तुरे :
मो. ९३२६८१८३५४
नामदेव कस्तुरे :
मो. ९४२२४१०८५४

तासगाव, जि. सांगली
मिनल कुडाळकर :
मो. ९४२३८७२४१६

सातारा
श्रीकांत के. टी. :
फोन : ०२१६२/२३२०६०
मो. ९८२२०६४८००

खटाव, जि. सातारा
मोहन घाडगे
मो. ८६०००८९००९

सातारा जिल्हा
कुंदा गुणवंता अशोक लोखंडे
मो. ७७०९६५५२५१

उस्मानाबाद
कमल नलावडे :
मो. ९८९०९५२८४७

नांदेड
अनघा जोशी मुधोळकर :
मो. ९४२२४३४४४०

रिसोड, जि. वाशिम
चाफेश्वर गांगवे :
मो. ९०९६६७५००१

यवतमाळ
आशा देशमुख :
मो. ९४२३४३६०४३
मंगला सरोदे :
फोन ०७२३२/२४२८२९

शिंदखेडा, जि. धुळे
संदीप गिरासे :
मो. ९४२३४९४५१५

परदेशातील प्रतिनिधी

VIDWANS SHAILA :
10, Inverness Drive, Kendall Park, **NJ** 08824
Email : Shaila@vidwans.com

ADITI KELKAR HATE :
Flat no. 410, Burj I Nahada Tower, I Nahada 1, P. O. Box No. 341235 Dubai, **UAE.** PH. 971-4-2389467, Mobile- 971-56-1798331
Email : aditikelkar21@gmail.com

JYOTI KANITKAR :
13228 Stable Brook Way, **Herndon**, VA20171
Phone no : 703-478-2680
Email : jyoti@kanitkar.com

खालील ठिकाणीही 'मिळून साऱ्याजणी'ची वर्गणी स्वीकारली जाईल.
(१) हिराचंद नेमचंद वाचनालय : १३४, मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३००१. फोन : २७२६६२०
(२) साधना : ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे - फोन : २४४५९६३५

आमचे वितरक :
पूनम एजन्सी - २४४९६६८, बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई - २३८५७०१२.

प्राईड परेड

MIST LGBTQ फाउंडेशन, इतर समलैंगिक समूह आणि स्वयंसेवी संस्था यांनी आयोजित केलेल्या पुणे प्राईड परेडमध्ये मिळून साऱ्याजणीही सहभागी आहे. त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या हस्ते जून अंकाचं प्रकाशन करताना गीताली आणि अर्चना झेंडे

सतरंगी प्लॅटफॉर्म प्रस्तुत मानसरंग प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य आणि लैंगिकता यावरील दीर्घांक
Where Is SSS? **नाटकानंतर नाटकातील कलाकारांची विशेष भेट**

आलोक राजवाडे यांच्याबरोबर गीताली आणि रमेश धनोकर

सिद्धा आंधळे, दिग्दर्शक जमीर कांबळे यांच्याबरोबर अर्चना झेंडे आणि गीताली

डावीकडून कादंबरी शेख, दीप्ती जोशी, सुनील कुलकर्णी यांच्याबरोबर गीताली

License to post without prepayment of postage No.: **WPP - 34**
Registered RNI No. MAHMAR/2000/02001 Declaration No SDO/Pune City/ SR/11/2021
Postal Regd. No. PCW/043/2024-2026
Published & Posted on 1/07/2025
Posting at PSO, Pune GPO - 411001

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार
आणि डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार प्रदान सोहळा

डावीकडून विनोद कुलकर्णी, विद्याधर अनासकर, राजीव बर्वे, शिवाजी कदम, गीताली, रावसाहेब कसबे, जीवनगौरव पुरस्कार प्राप्त लेखक लक्ष्मण गायकवाड, मिलिंद जोशी आणि सुनीताराजे पवार

संवेदनशील, सर्जनशील आणि नवोदित लेखकांना लिहितं करण्यासाठी ...

रेऊ कथा स्पर्धा २०२५

मागील २० वर्षांपासून 'मिळून साऱ्याजणी' आणि का.स.वाणी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त सहकार्याने 'रेऊ कथा स्पर्धा' घेतली जाते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ही स्पर्धा जाहीर करत आहोत. का.स.वाणी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिवंगत डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या आजीचे नाव 'रेऊ' होते. डॉ. वाणींचे आपल्या आजीशी खूप जिव्हाळ्याचे नाते होते. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा आयोजित केली जाते. महाराष्ट्रातील, देशातील आणि देशाबाहेरील कथालेखकांपर्यंत पोहचावं आणि नव्या लेखकांचा शोध घ्यावा हा या कथास्पर्धेचा मूळ हेतू आहे. ही स्पर्धा 'ती' आणि 'तो' या पलीकडचे सर्व 'ते' या सर्वांसाठी खुली आहे.

स्पर्धेसाठीचे नियम -

- स्पर्धकांचा कथासंग्रह प्रकाशित झालेला नसावा.
- कथा पूर्णपणे स्वतंत्र हवी आणि स्पर्धेसाठी कथेची मूळ प्रत पाठवावी.
- हस्तलिखित परत पाठवणे शक्य नसल्याने कथेची छायाप्रत स्वतःजवळ ठेवावी.
- कथा फुलस्केपवर पुरेसा समास सोडून कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरात लिहिलेली किंवा टाईप केलेली असावी. तसेच, पाकिटावर 'रेऊ कथा स्पर्धा' असा उल्लेख करावा.
- कथा इमेलनेही पाठवता येईल. शक्यतो युनिकोडमध्ये टाईप करून पाठवावी.
- कथा जास्तीत जास्त ३००० शब्दापर्यंत असावी.
- स्पर्धेबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. संपादकांचा निर्णय अंतिम राहील.
- बक्षीसपात्र कथा 'मिळून साऱ्याजणी' मध्ये प्रसिद्ध करण्यात येतील, या कथांना वेगळे मानधन मिळणार नाही.
- कथेच्या सुरुवातीच्या पानावर स्वतःचे नाव, पत्ता व दूरध्वनी किंवा मोबाइल क्रमांक लिहावा.
- कथा १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आमच्याकडे पोचाव्यात. स्पर्धेचा निकाल जानेवारी २०२६ च्या अंकात जाहीर केला जाईल.
- ज्यांना स्पर्धेचा निर्णय समजून घ्यायची इच्छा असेल त्यांनी कथेसोबत रु.१००/- ची मनीऑर्डर केली तर जानेवारी २०२६ चा अंक त्यांच्या पत्त्यावर स्वतंत्रपणे रवाना केला जाईल.
- पाच उत्कृष्ट कथांची निवड केली जाईल. निवड केलेल्या कथांना प्रत्येकी रु.२५००/- पारितोषिक देण्यात येईल.

स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा आणि बक्षीसाचे मानकरी व्हा!

कथा पाठवण्याचा पत्ता : 'मिळून साऱ्याजणी', फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, नचिकेत को-ऑप. हौ.सोसायटी, प्रभात रोड, गल्ली नं. ४, एरंडवणा, पुणे ४११००४.

संपर्क नं.: ८००७८१४००५
इमेल : saryajani@gmail.com